

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. १२२८
REFBK-0010861

# मराठी साहित्यदर्शन ४

प्र. के. अत्रे

अ. वि. गृह प्रकाशन पुणें

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २५५८० वि: [illegible]
क्रमांक ९२२८ नों: दि: २५/५/५२

अ. वि. गृह प्रकाशन

# मराठी साहित्य-दर्शन

पुष्प चौथें : आचार्य प्र. के. अत्रे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १०८६१

संपादन व प्रस्तावना
डॉ. चारुशीला गुप्ते
एम.ए., पीएच्. डी.

REFBK-0010861

किंमत दोन रुपये

अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २.

: प्रकाशक :
दि. दा. गांगल,
अ. वि. गृह प्रकाशनासाठीं
१७८६ सदाशिव पेठ, पुणें २

★

प्रथमावृत्ति, मे १९६०
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

★

: मुद्रक :
दि. दा. गांगल,
लोकसंग्रह छापखान्यासाठीं,
१७८६ सदाशिव पेठ, पुणें २.

# प्रकाशकाचें निवेदन

मराठी साहित्य-दर्शनाचें हें पुष्प वाचकांच्या हातीं देण्यांत आम्हाला धन्यता वाटत आहे. मराठी साहित्यांतील थोर लेखकांच्या वाङ्मयाचा परिचय थोडक्यांत करून द्यावा असा त्याच्या मागचा हेतु आहे. मराठींतील नामवंत साहित्यिकांचें विपुल लेखन अनेक ग्रंथांच्या द्वारें, मासिकें, साप्ताहिकें, वृत्तपत्रें व रेडिओ इत्यादि विविध माध्यमांच्या द्वारें प्रकाशित होत असतें. ग्रंथालयांत किंवा ग्रंथागारांत पाऊल टाकलें कीं, एखाद्या लेखकाचींसुद्धां असंख्य पुस्तकें आढळून येतात. तेव्हां अशा स्थितींत कोणतें पुस्तक वाचूं व कोणतें नको, याचा संभ्रम माणसाला पडतो व त्यामुळें तो थोडासा गोंधळूनहि जातो. याशिवाय एखाद्या लेखकाच्या सर्व ग्रंथांचें वाचन व परीक्षण करणें प्रत्येक व्यक्तीला शक्य नसतें—निदान सध्यांच्या यांत्रिक-युगांत तेवढी सवडहि सर्व व्यक्तींना मिळतेच असें नाही. परंतु नामवंत लेखकाच्या सर्व वाङ्मय-प्रकारांचें दर्शन घडावें, ही इच्छा मात्र व्यक्तीच्या ठिकाणीं असते. अशा इच्छेची पूर्ति या मालेच्या द्वारें होईल अशी आम्हांस खात्री वाटते.

मराठींतील कांही नामवंत साहित्यिकांचा या दृष्टीने परिचय करून द्यावा, अशा हेतूनें मालेचा प्रारंभ करण्यांत आला आहे. नामवंत साहित्यिकांच्या विपुल वाङ्मय-भांडारांतून निवडक व उत्कृष्ट, शिवाय त्यांत साहित्यिकानें लिहिलेले शक्यतों सर्व तऱ्हेचे वाङ्मय-प्रकार यावेत या हेतूनें आम्ही संपादकांना विनंती केली व ती त्यांनीं मान्य केली, याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत. मराठी साहित्यप्रेमी वाचकांना ही माला अर्पण करून हें निवेदन पूर्ण करतों.

एप्रिल १९६० } व्यवस्थापक,
अ. वि. गृह प्रकाशन, पुणें २.

# चार शब्द

प्रतिभासंपन्न नाटककार, नामवंत विनोदी लेखक व धडाडीचे पत्रकार या नात्यानें महाराष्ट्रांतील साहित्यिकांत प्रल्हाद केशव अत्रे यांचें स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांना अमाप लोकप्रियता मिळाली असल्यामुळें त्यांच्या वाङ्मयाचा आस्वाद न घेतलेला महाराष्ट्रीय वाचक सहसा आढळणार नाहीं. त्यांच्या नाटकांचे कित्येक प्रादेशिक भाषेंतहि अनुवाद झाले असल्यामुळें त्यांच्या इतर भाषीय वाचक वर्गाची संख्याहि बरीच मोठी आहे.

आचार्य अत्र्यांच्या साहित्यसेवेला काव्य-लेखनानें सुरुवात झाली. 'गीतगंगा' नांवाच्या त्यांच्या काव्यसंग्रहावरून त्यांना 'भावकवि' म्हणून ओळखूं लागलेल्या मराठी रसिकांना त्यांनीं आपल्या विडंबनात्मक काव्यानें आश्चर्याचा एक गोड धक्का दिला. समकालीन कवींच्या कांहीं विशिष्ट वृत्ति-प्रवृत्तींवर खोंचदार व परिणामकारक विडंबनें लिहून त्यांनीं मराठी काव्यक्षेत्रांत विडंबन काव्याचें एक नवेंच दालन उघडलें व तें समृद्धहि केलें.

कथालेखक म्हणून आचार्य अत्रे फारसे प्रसिद्ध नसले तरी गंभीर व विनोदी अशा दोन्ही तऱ्हेच्या अनेक कथा त्यांनीं लिहिल्या आहेत. याखेरीज त्यांची 'चांगुणा' नांवाची करुणरम्य छोटी कादंबरी व कित्येक परिणामकारक चित्रपटकथाहि प्रसिद्ध आहेत. ब्रँडीची बाटली व इतर गोष्टी, साखरपुडा, वामकुक्षी आणि बत्ताशी व इतर कथा, असे त्यांचें चार कथासंग्रह आतांपर्यंत प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांनीं लिहिलेली 'वाळूची बायको' ही विनोदी कथा आणि 'समुद्राची देणगी' व 'पाठीवरचे वळ' या दोन करुणकथा मराठी साहित्यांत अविस्मरणीय झाल्याशिवाय रहाणार नाहींत.

रंगभूमीच्या पडत्या काळांत साष्टांग नमस्कार, घराबाहेर, उद्यांचा संसार, लग्नाची बेडी, वंदेभारतम्, भ्रमाचा भोपळा अशीं अनेक गंभीर व विनोदी नाटकें लिहून आचार्य अत्रे यांनीं मराठीं रंगभूमीला सांवरून धरलें. बांधेसूद मांडणी, चटकदार संवाद, आटोपशीरपणा, सामाजिक दोषांवर विदारक टीका व उत्कृष्ट स्वभावदर्शन या विशेषांमुळें तसेंच विषय, विचार व विनोद या त्रिगुणांमुळें त्यांच्या नाटकांनीं मराठी रसिकांचीं मनें केव्हांच आकृष्ट केलीं आहेत. आचार्य अत्रे यांची गडकऱ्यांवर अनन्यसाधारण भक्ति आहे. त्यामुळें त्यांच्या नाट्यलेखनावर गडकऱ्यांच्या नाटकाची कांहींशी छाप पडलेली दिसते.

मानवी जीवनासंबंधींच्या असीम निष्ठेंतून आचार्य अत्रे यांचें साहित्य निर्माण झालें असल्यामुळें त्याचें स्वरूप विधायक आहे. जीवन सत्य, शिव आणि सुंदर करण्यास साहित्यासारखें दुसरें प्रभावी साधन नाहीं असें त्यांचें स्पष्ट मत आहे. त्यामुळें त्यांच्या लेखनांत नेहमीं चांगल्याचें कौतुक आणि वाईटाचा धिक्कार आढळून येतो.

आचार्य अत्रे यांच्या बौद्धिक कुतुहलाची झेंप मोठी असल्यामुळें त्यांच्या व्यक्तित्वाला एक प्रकारची विलक्षणता आलेली आहे. मनुष्य स्वभावांतील वा कृतींतील कोणतीहि विसंगति त्यांना सहन होत नाहीं. अशा विसंगतीवर ते विनोदाच्या द्वारां अतिशयोक्तिपूर्ण टीका करतात. मार्मिकतेबरोबरच मर्मभेदकता हा त्यांच्या विनोदाचा स्थायीभाव आहे. त्यांचा विनोद प्रभावी आहे. तथापि त्यांत विद्वत्तेमुळें कोल्हटकरांच्या विनोदांत दिसून येणारी क्लिष्ट चमत्कृति किंवा गडकऱ्यांच्या विनोदांतील कोट्यांची आतषबाजी नाहीं. उलटपक्षीं तो साधा, आधुनिक वळणाचा व खुसखुशीत असल्यामुळें सर्व सामान्य वाचकाच्याहि आटोक्यांतील आहे. आतांपर्यंत त्यांच्या व्याख्या-नांनीं व विनोदी साहित्यानें समाजाच्या वेगवेगळ्या थरांतील व्यक्तींच्या स्वभावांत असलेल्या दोषांचें दर्शन घडविलें आहे व जनतेचें रंजन तसेंच उद्बोधनहि केलें आहे.

गेलीं कित्येक वर्षे आचार्य अत्रे यांनीं वृत्तपत्र व्यवसायाचा लढाऊ पेशा पत्करला आहे. ते या व्यवसायाकडे नेहमीं नव्या दृष्टिकोनांतून व आत्म-विश्वासानें पाहतात, त्यामुळेंच आज त्यांच्या 'नवयुग' साप्ताहिकानें व 'मराठा' दैनिकानें लोकप्रियतेचा उच्चांक गांठला आहे. आतांपर्यंत आचार्य अत्र्यांनीं नवयुगांतून अनेक राजकीय व सामाजिक विषयांवरील अग्रलेख, प्रसिद्ध व अप्रसिद्ध व्यक्तींची शब्दचित्रें, मृत्युलेख तशींच अनेक आल्हादक स्थलवर्णनें व प्रवासवर्णनें लिहिली आहेत. राजकारणातील नव्या शक्ति, नवे वैचारिक प्रवाह व नव्या प्रवृत्ति यांचा वेध घेणारी आधुनिक दृष्टि आचार्य अत्र्यांजवळ असल्यामुळें त्यांचें राजकीय विषयावरील लेख प्रभावी तसेंच चुरचुरीत झाले आहेत.

आचार्य अत्रे यांना साहित्यक्षेत्रांत श्रेष्ठ स्थान लाभलें आहे. तथापि ते केवळ साहित्यिकच नाहींत. साहित्य हें त्यांच्या बहुरंगी व्यक्तिमत्वाचें एक अंग आहे. जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्यें त्यांनीं आतांपर्यंत या ना

त्या निमित्तानें संचार केला आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणें साहित्य, राजकारण, समाजकारण, शिक्षण, नाटच, वृत्तपत्रसृष्टि, चित्रपटसृष्टि अशा विविध क्षेत्रांत त्यांनीं अनेकविध स्वरूपाचें कार्य केलें आहें. हें कार्य करतांना त्यांना जीवनाचीं विविध अगें पहावयास मिळालीं आहेत. अनेक उत्कट, भव्य व रोमांचकारी अनुभूति लाभल्या आहेत. मानवी मनाचें असंख्य चित्रविचित्र नमुने जवळून निरखतां आले आहेत. विनोदी आणि दुःखद, हृदय उचंबळून आणणाऱ्या, तशाच मनाला सुन्न करून सोडणाऱ्या उदात्त अन् क्षुद्र अशा घटनांचें त्यांनी जवळून दर्शन घेतलें आहे. या सर्व अनुभवांच्या परिपाकाचा त्यांच्या साहित्यांत आढळ होतो. त्यांच्या एवढें विविधतापूर्ण लेखन महाराष्ट्रांतील फारच थोडचा लेखकांनीं केलें असेल.

आचार्य अत्रे यांना नाविन्याची आवड आहे. त्यामुळें मानवी जीवनांतील साऱ्या घडामोडींकडे व त्यापासून मिळणाऱ्या अनुभवांकडे ते स्वागत दृष्टीनें पहातात. हल्लीं जरी त्यांच्या लेखणीनें छंदोबद्धतेचा आश्रय सोडला असला तरी स्वभावांतील अनिवार संवेदनशीलता, सहृदयता व सर्वस्पर्शी रसिकता, या गुणांमुळें त्यांचे गद्यलेखनही अनेकदां काव्यात्मकतेच्या परिसरांत वावरतांना दिसतें.

अस्सल मराठमोळ भाषाशैली हें आचार्य अत्रे यांच्या वाङमयाच्या लोकप्रियतेचें आणखी एक महत्त्वाचें कारण आहे. मराठी भाषा व महाराष्ट्रीय संस्कृति यांच्यावर त्यांची मनस्वी श्रद्धा आहे. त्यामुळेंच त्यांच्या लेखनांत मराठी मनाचें प्रतिबिंब पहावयास मिळतें. त्यांची भाषा सोपी, सरळ असून प्रसंगवशात् ती ठसकेबाज बनते. कृत्रिमता किंवा दुर्बोधता हे दोष त्यांच्या लेखनांत चुकूनहि आढळणार नाहींत. वैचारिक संपन्नता, प्रवासामुळें वाढलेली चतुरस्रता, नव्या जुन्या श्रेष्ठ साहित्याच्या परिशीलनाच्या मनोज्ञ खुणा आणि खेळकर नर्म विनोद यांमुळें त्यांचें कोणतेंहि लेखन अत्यंत चित्तवेधक वाटतें.

आचार्य अत्र्यांसारख्या थोर व सिद्धहस्त लेखकांच्या गुणसंपन्न साहित्याची वाचकांना ओळख व्हावी हा हेतु प्रस्तुत लेखांच्या संकलनामागें आहे. येथें समाविष्ट केलेले लेख, नाटच, वाङमय, विनोद, समाजकारण, राजकारण अशा अनेक विषयांवरील आहेत. त्यांच्या परिशीलनानें विद्यार्थीवर्गात श्रेष्ठ दर्जाच्या साहित्याबद्दल अभिरुचि निर्माण होईल व ते या छोटचा पुस्तकाचें आपुलकीनें स्वागत करतील अशी मला आशा वाटते.

मुंबई,
२८ मार्च १९६० — सौ. चारुशीला गुप्ते.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | लोकमान्य टिळक आणि मी ... ... | १ |
| २. | सार्वजनिक जीवन ... ... ... | ११ |
| ३. | महाराष्ट्राचें बालविकासी फूल : साने गुरुजी ... | ३४ |
| ४. | जग काय म्हणेल ? ... ... ... | ४९ |
| ५. | ' कमला ' काव्याचा कलावंत गेला ... | ६१ |
| ६. | नभोवाणीवर अ. ब. कोल्हटकर . ... | ६८ |
| ७. | मला पडलेलें विलक्षण स्वप्न ... ... | ७७ |
| ८. | मी विडंबनकार कसा झालों ? ... ... | ८५ |
| ९. | चांगुणेचें बालपण ... ... ... | ९९ |
| १०. | मी कोण आहें ? ... ... ... | १०६ |

# आचार्य अत्रे यांचें साहित्य

**नाटकें**

सांष्टांग नमस्कार
घराबाहेर
उद्यांचा संसार
लग्नाची बेडी
भ्रमाचा भोपळा
पराचा कावळा
मी उभा आहें
वंदे भारतम्
जग काय म्हणेल?
पाणिग्रहण
कवडीचुंबक
एकच प्याला
गुरुदक्षिणा
वीरवचन

**कथा**

बत्ताशी
कशी आहे गम्मत
ब्रँडीची बाटली
मूर्खांचा बाजार
निशिगंध
साखरपुडा
वामकुक्षी
हास्यकथा—१–२

**काव्य**

झेंडूचीं फुलें
गीतगंगा
पंचगव्य

**इतर**

मी कसा झालों?
सिंहगर्जना
चित्रकथा
पत्रकार अत्रे
हंशा आणि टाळ्या
महात्मा फुले
मराठी माणसें, मराठी मनें
समाधीवरील अश्रु
साहित्ययात्रा
भ्रमंति
मुद्दे आणि गुद्दे
पंचामृत
चांगुणा
मोहित्यांचा शाप
अत्रे उवाच
ललित वाङमय
स्वराज्याचा अरुणोदय
वसंतसेना
दलितांचे बाबा
शिव्या आणि ओंव्या
ब्रह्मचारी
मोरूची मावशी

**अनुवादित**

आब्राहम लिंकन
व्यक्तिविचार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 26650 वि.
क्रमांक 12240 नों: दि: 25/9/60

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
बा. क्र. 90६९

# १

# लोकमान्य टिळक आणि मी

[स्वतःच्या बालवयांतील एक हृदयस्पर्शी स्मृति आचार्य अत्रे यांनीं येथें दिली आहे. एका अत्यंत संवेदनक्षम मनावर, भोंवतालच्या बदलत्या राजकारणाचा आणि लोकमान्यांसारख्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा झालेला हा खोल संस्कार या लेखांत स्पष्ट दिसून येतो.]

* * *

सदतीस वर्षांपूर्वींची गोष्ट. त्या वेळीं सासवड येथील इंग्रजी शाळेमध्यें दुसऱ्या इयत्तेंत मी शिकत होतों. दहा वर्षांचा होतों मी. आमच्या गांवांत इंग्रजी शाळा सुरू होऊन तीनचारच वर्षें झालीं होतीं. त्यामुळें मराठी चौथी इयत्ता पास झाल्यावर मी सरळ इंग्रजी शाळेंतच गेलों. ही इंग्रजी शाळा जर त्या मोक्यास आमच्या गांवांत निघाली नसती, तर मराठी सात इयत्ता पुऱ्या करून गांवचा कुलकर्णी किंवा तलाठी होण्याची माझी महत्त्वाकांक्षा होती !

खेडेगांवच्या मराठी आणि इंग्रजी शाळेमध्यें त्या वेळीं मुख्य एकच फरक आम्हांला दिसून आला. आणि तो म्हणजे मराठी शाळेमध्यें आम्हांला एकाच मास्तरांचा तोच तो वाढलेल्या दाढीचा कंटाळवाणा चेहरा वर्षभर पाहणें भाग पडे आणि इंग्रजी शाळेमध्यें आम्हांला एकाच वर्गाला शिकवायला निदान तीनचार तरुण तरुण मास्तर तरी येत. एक इंग्रजी शिकवायला, एक ड्रॉइंग आणि खर्डे दाखवायला, एक मराठी आणि इतिहास सांगायला आणि एक बाकीचे राहिलेसाहिले विषय भरडून टाकायला.

दिवसभर तीन-चार मास्तरांची ये-जा वर्गामध्यें होत असल्यामुळें एकाच मास्तराच्या सासुरवासाला कंटाळून मराठी शाळेमधून आलेल्या आम्हां मुलांना इंग्रजी शाळा म्हणजे त्या वेळीं केवढा विरंगुळा वाटत होता ! मागल्या तासाचे मास्तर जाण्यांत आणि पुढल्या तासाचे मास्तर येण्यांत निदान दहा-बारा मिनिटें तरी वाया जात. त्यामुळें प्रत्येक तासाचे शेवटीं आम्हाला वर्गांत हिंडावयाला, ओरडावयाला आणि हुंदडावयाला चांगलाच अवकाश मिळे.

त्यांतून आमचा वर्ग होता तिसऱ्या मजल्यावर एका बाजूला. दोन उंच, अरुंद आणि अंधारे जिने चढून आमच्या वर्गामध्यें मास्तर सहजासहजीं पोंचत नसत. आणि आलेच एखादे मास्तर लवकर तर ते धापा टाकीत खुर्चीवर बसत आणि मग पाण्याचा तांब्या भरून आणण्यासाठीं आमच्यापैकीं एखाद्या मुलाला खालीं तळमजल्यावर धावत जावें लागत असे. मग मास्तर पाणी पिऊन गार झाल्यावर पुढें आस्ते आस्ते शिकवायला सुरुवात होई.

तेवढ्यांत दहा-पंधरा मिनिटें सहजच निघून जात. आणि आम्हांला पाहिजे तेवढा विसांवा सहज मिळत असे. शिकण्याकडे त्या वेळीं आमचें लक्ष होतें कुठें ? मास्तर वर्गांत जास्तींत जास्त उशिरां येतील कसे आणि शक्य तेवढ्या लवकर वर्गांतून रवाना होतील कसे याच विवंचनेंत आम्हीं त्या वेळीं गुंतलेले असूं.

पण या आमच्या कार्यक्रमांत एके दिवशीं अचानक क्रांति घडून आली. सुभेदार नांवाच्या एका नवीन मास्तरांची आमच्या वर्गावर नेमणूक झाली. भोर संस्थानचे राहणारे होते ते. आणि आमच्या वर्गांतल्या एका मुलाचे जवळचे नातेवाईक होते. सव्वीस-सत्तावीस वर्षांचें वय असेल त्यांचें त्या वेळीं. उजळ रंग, तेजस्वी डोळे आणि त्यांच्या वयाला न शोभतील इतक्या ओठ झाकून टाकणाऱ्या मोठ्या मोठ्या मिशा. त्यांच्या मिशा बघून प्रथमदर्शनीं आमच्या मनांत एकदम दडसच बसली. पण त्यांनीं बोलावयाला सुरुवात केली मात्र—एकदम वर्गामधलें वातावरण बदलून गेलें.

त्यांची बोलण्याची पद्धति जलद आणि अस्थिर होती. पण त्यांच्या शब्दाशब्दामध्यें एक नवीन तऱ्हेचें आकर्षण आणि खेळकरपणा होता. "मित्रांनो—" आम्हांला उद्देशून ते म्हणाले, पायापासून डोक्यापर्यंत कांहीं

तरी गोड भावना विजेच्या फटकाऱ्यासरशी चमकून गेली. आमच्या छातींत कांहीं तरी 'थरंऽऽ' झाल्यासारखें वाटलें. एवढीशीं आम्हीं पोरटीं! अन् मास्तरांनीं आम्हांला 'मित्रांनो' अशी हाक मारावी! फारच चमत्कारिक वाटलें तें आम्हांला! शिवीगाळीखेरीज आणि धमकीखेरीज मास्तरांच्या तोंडून दुसरीं संबोधनें ऐकण्याची तोंपर्यंत मुळीं संवयच नव्हती आम्हांला! 'मित्रांनो!' बस्स, त्या एका शब्दानें सुभेदार मास्तरांनीं आमचीं मनें जिंकून टाकलीं! आम्हांला एकदम त्यांच्याबद्दल विलक्षण आपलेपणा वाटूं लागला. वर्गांत एकदम सामसूम शांतता पसरली. आमच्यांतलीं वडीलधारीं दंगेखोर पोरें जागच्याजागीं गारद झाली!

"आज मी नवीनच आलों आहें," मास्तर हसत हसत पुढें म्हणाले, "उद्यापासून आपण अभ्यासाला सुरुवात करूं. आज मी तुम्हांला हरिभाऊ आपट्यांच्या 'उष:काल' कादंबरीची गोष्ट सांगतो." वर्गात गोष्टी सांगणारे असे पहिलेच मास्तर होते ते! एकदम वर्गाचें रुक्ष स्वरूप बदलून त्याला घरांतल्या एकाद्या बैठकीचें जिव्हाळ्याचें स्वरूप आलें. तो तास कधीं संपला आणि दुसरा नि तिसरा तास कधीं सुरू झाला हें आम्हांला जसें कळलें नाहीं, तसे सुभेदार मास्तरांच्याही तें ध्यानांत आलें नाहीं. इतके आम्ही सारे त्या गोष्टीच्या आनंदांत रंगून गेलों होतों. पुढच्या तासाचे मास्तर वर्गाच्या दारापाशीं येऊन गेले आणि शिक्षकांच्या खोलींत जाऊन तणाणून झोंपले. त्यांना तरी आम्हांला शिकविण्याची कुठें हौस होती एवढी? आपला तास दुसऱ्या कोणीं मास्तरानें घेतला तर तें त्यांना नको होतें थोडेंच!

त्या दिवसापासून आमच्या वर्गाची चर्याच मुळीं बदलून गेली. सुभेदार मास्तर वर्गांत कधीं येतात आणि कधीं आम्हांला गोष्टी सांगतात असें सर्वांना होऊन जात असे. मराठी आणि इतिहास हे दोन विषय शिकविण्याचें काम त्यांच्याकडे आलें होतें; आणि हे दोनही विषय आम्हांला ते गोष्टीरूपानें शिकवीत. पण अशा कांहीं हातोटीनें कीं मराठी केव्हां संपे आणि इतिहास केव्हां सुरू होई किंवा इतिहास केव्हां संपे आणि मराठीला केव्हां प्रारंभ होई, हें आम्हांला मुळीं कळतच नसे. त्याखेरीज उरल्या-सुरल्या वेळांत हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्या ते हप्त्याहप्त्यानें आम्हांला सांगत.

त्यामुळें सुभेदार मास्तरांचा आम्हाला नादच लागला म्हणानात. शाळेंत येतांना आम्हीं त्यांच्याबरोबर यावयाचे. शाळेंतून जातांना आम्ही त्यांच्याबरोबर जावयाचे. दुपारीं आंघोळीला घाटावर त्यांच्याबरोबर. संध्याकाळीं खंडोबाच्या माळावर हिंडायलाही त्यांच्याबरोबर. आणि सुटीच्या दिवशीं तर सकाळपासून संध्याकाळपर्यंत मुक्कामच त्यांच्या घरीं. आमची आणि त्यांची ही वाढती गट्टी बघून कोणाच्या जर खरोखरच पोटांत दुखूं लागलें असेल तर तें आमच्या हेडमास्तरांच्या. त्यांचें नांव होतें झांबरे !

'झांबरे' हे आडनांव उच्चारल्याबरोबर ज्या रंगाची, ज्या रूपाची आणि ज्या चेहऱ्याची मूर्ति तुमच्या डोळ्यासमोर उभी राहूं शकेल, अगदीं तसेच होते हे आमचे झांबरे सर ! पूर्वीं हे रेव्हेन्यू खात्यामध्यें इंदापूर येथें मामलेदार कचेरींत हेडकारकून होते असें म्हणतात. तेथें हिशेबाची कांहीं-तरी भानगड केल्याचा त्यांच्यावर ठपका आल्यानें त्यांना नोकरींतून निघावें लागलें.

संस्थेनें या महापुरुषाची रवानगी सासवड गांवीं नवीन इंग्रजी शाळा स्थापन करण्यासाठीं केली. आणि तेवढें काम त्यांनीं खरोखरच उत्तम रीतीनें पार पाडलें यांत शंका नाहीं. तेव्हांपासून त्या शाळेच्या हेडमास्तर-पदावर त्यांचीच नेमणूक करण्यांत आली. झांबरे सर कोणता विषय शिक-विण्यांत तरबेज होते हें कांहीं सांगतां येत नाहीं. तथापि, गणित विषय हा त्यांचा हातखंडा होता अशी त्या वेळीं बोलवा होती. विशेषत: 'मेट्रिक सिस्टिम' मधले 'मिली–सेंटि-डेसी–मीटर–डेक्या–हेक्टो–किलो–मिरिया' हें कोष्टक ते मोठमोठ्यानें मुलांकडून परवाच्याप्रमाणें म्हणून घेत, हे माझ्या अद्यापही स्मरणांत राहिलेलें आहे. या कोष्टकापलीकडे त्यांनीं कोणाला कांहीं शिकविलें नाहीं.

शाळेमधील त्यांचा बहुतेक वेळ मुलांवर रागावण्यांत आणि मुलांना बदडण्यांत जात असे. त्यामुळें झांबरे सर म्हटलें कीं आमच्या अंगावर त्या वेळीं टरारून कांटाच उभा राहात असे. शाळेबाहेरचा त्यांचा वेळ गांवांतले एक श्रीमंत जहागिरदार होते, त्यांच्या तैनातीमधें आणि पंगतीला जात असे. जवळजवळ श्रीमंतांच्या आश्रयालाच ते होते म्हणानात ! त्यामुळें शाळेंतल्या पोरांप्रमाणें पोरांचे पालकही त्यांना चांगलेच वचकून असत. सुभेदार मास्तर

शाळेंत मुलांना जसजसे अधिकाधिक आवडू लागले, तसतसे झांबरे सर त्यांच्याकडे जातां-येतां आपले लाल बटबटीत डोळे वटारून बघूं लागले. पण सुभेदारांनीं कधीं ढुंकूनही त्यांच्याकडे पाहिलें नाहीं. मुलांना रोज रोज नवीन गोष्टी कायकाय सांगावयाच्या त्या नादांत ते गुंग असत.

एके दिवशीं पहिल्याच तासाला सुभेदार मास्तर वर्गांत आले. त्या दिवशीं त्यांचा चेहरा विशेष गंभीर दिसत होता. ते टेबलाजवळ येऊन उभे राहिले. नेहमींप्रमाणें त्यांनीं आमच्याकडे पाहिलें नाहीं. त्यांची दृष्टि खालीं जमिनीकडे वळलेली होती. क्षणभर ते कांहीं बोलले नाहींत. त्यांचे ओठ थरथर कांपत होते असें आम्हांला वाटलें.

थोडचा वेळानें ते हलक्या आवाजांत बोलूं लागले, "मुलांनो, एक अतिशय वाईट गोष्ट मला तुम्हांला सांगावी लागत आहे. आपल्या देशाचे आवडते पुढारी लोकमान्य टिळक यांना सरकारनें काल रोजीं सहा वर्षें काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली आहे—" बोलतां बोलतां सुभेदार मास्तरांचा कंठ भरून आला आणि ते थांबले. आमच्या काळजांत आम्हांला कांहीं तरी गलबलल्यासारखें वाटलें.

गळ्याभोंवतालच्या उपरण्याच्या टोंकानें मास्तरांनीं आपले डोळे पुसले आणि ते म्हणाले, "आज तुम्हांला शिकवितां येणें मला अगदीं अशक्य आहे. विशेषतः तुम्हांला आतां जें कांहीं सांगावयाचें होतें, तें इथें वर्गांत मला सांगतां येणें शक्यच नाहीं. तेव्हां संध्याकाळीं शाळा सुटल्यावर आंबुरशीच्या देवळाजवळ आपण जमूं!" असें म्हणून जड पावलांनीं मास्तर वर्गामधून निघून गेले आणि खालीं शिक्षकांच्या खोलींत दिवसभर पडूनच राहिले.

झांबरे सर त्या दिवशीं शाळेंत आले नव्हते तें बरेंच झालें. जहागिरदारांच्या वाड्यांत त्या दिवशीं 'प्रांता'ला मेजवानी होती. तेव्हां त्या मेजवानीच्या व्यवस्थेंत त्या वेळीं ते गढून गेले असल्यामुळें त्यांना शाळेला यावयाला कोठून सवड मिळणार? त्या दिवशीं अभ्यासाकडे आमचें लक्ष लागणें शक्यच नव्हतें मुळीं! विषण्ण मनानें आम्ही शाळा सुटेपर्यंत कसेबसे वर्गांत बसून राहिलों. पांच कधीं वाजताहेत आणि शाळा केव्हां सुटते आहे असें आम्हांला होऊन गेलें होतें.

शेवटची घंटा होतांच आम्ही वर्गांतील पंधरावीस पोरें काखोटीला दप्तरें मारून शाळेमधून जे तडक निघालों ते निरनिराळ्या वाटांनीं गांवा-बाहेर पडलों. सर्वांनीं एकत्र मिळून जावयाचें नाहीं असें आमचें आधीं ठरलें होतें. आंबुरशीचें देऊळ गांवाच्या ईशान्येला दोन मैलांवर एका ओढ्याच्या कांठी होतें. नवरात्रांत तेथें दर वर्षी जत्रा भरत असे. पण एरव्हीं त्या बाजूला गांवांतलें चिटपांखरूंसुद्धां फिरकत नसे. म्हणून मुद्दाम मास्तरांनीं ती जागा निवडून काढली होती.

कांहीं वेळानें आम्ही सारीं मुलें त्या देवळाशेजारच्या ओढ्यावर जमलों. सुभेदार मास्तर अजून आले नव्हते. त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बराच वेळ आम्ही त्या ठिकाणीं बसलों. सूर्य मावळत होता. आजूबाजूच्या शेतावर पिवळसर उन्हें अजूनही थोडीशीं रेंगाळतच होतीं. कांहीं वेळानें मास्तर तेथें येऊन पोहोंचले. त्यांच्याबरोबर वरच्या वर्गांतील दोनतीन प्रौढ मुलें होतीं. मास्तर येतांच आम्ही सारे उठून उभे राहूं लागलों; पण ' उठूं नका ' असें त्यांनीं आपल्या हातांनीं आम्हांला सांगितलें.

मास्तरांच्या भोंवतीं वर्तुळ करून आम्ही बसलों. आणि ते मधोमध उठून उभे राहिले. मावळत्या सूर्याच्या आरक्त प्रकाशाकडे रोखलेल्या दृष्टीनें पाहात गंभीर आवाजांत त्यांनीं बोलावयास सुरुवात केली. वर्गांत शिकवितांना किंवा गोष्टी सांगतांना ते नेहमीं आम्हांला जसे दिसत त्यापेक्षां कांहीं तरी निराळेच ते आम्हांला त्या वेळीं दिसले. त्यांच्या मुद्रेवर कांहीं तरी नवीनच तेज चमकत होतें. आणि त्यांच्या आवाजांत नवीनच कांहीं तरी सामर्थ्य प्रगट झालेलें होतें.

अर्धा-पाऊण तास ते बोलले असतील. पण तेवढ्या वेळांत लोकमान्य टिळकांच्या चरित्रामधल्या किती तरी स्फूर्तिदायक गोष्टी त्यांनीं आम्हांला सांगितल्या. त्यांचा एकेक शब्द आणि एकेक वाक्य घणाच्या घावांप्रमाणें आमच्या हृदयावर आदळत होतें. आणि सर्वांगांतलें रक्त पायापासून डोक्या-पर्यंत उसळ्या मारीत होतें. बोलणें संपविण्याच्या आधीं सूर एकदम चढवून ते म्हणाले, " लोकमान्य टिळकांनीं तुमच्यासाठीं एवढें सारें केलें ! तुम्ही त्यांच्यासाठीं काय करणार ? बोला ! आजपासून परदेशी मालावर तुम्ही

बहिष्कार घालणार कीं नाहीं ? यापुढें परदेशी टोप्या डोक्यावर ठेवतां कामा नये ! परदेशी साखर तुम्ही खातां कामा नये ! घ्या, शपथ घ्या—शपथ घ्या—शपथ घ्या."

आंबुरशीच्या ओढ्याच्या त्या ओसाडींत सुभेदार मास्तरांच्या त्या शब्दांचे गंभीर पडसाद मोठमोठ्यानें निनादले. 'शपथ घ्या ! शपथ घ्या !' अशीच चोहोंकडून गर्जना उठली. देऊळ तेंच म्हणालें, झाडें तेंच म्हणालीं, शेतांनीं तेंच सांगितलें आणि ओढा तेंच गरजला. आणि आभाळांत क्षितिजावर नुकताच उगवलेला एक ठळक तारा त्याच अपेक्षेनें टवकारून आमच्याकडे पाहूं लागला. आमचीं डोकीं भडकून गेलीं. डोक्यावरच्या टोप्या भराभर काढून आम्हीं ओढ्यांत भिरकावून दिल्या आणि मास्तरांच्या पायावर हात मारून परदेशी मालावर बहिष्कार घालावयाच्या एकजात सार्‍यांनीं शपथा घेतल्या.

हरिभाऊ आपट्यांच्या ऐतिहासिक कादंबर्‍यांतील पात्रांचें सामर्थ्य आणि आवेश त्या वेळीं आमच्या अंगांत संचारलेला होता. आयुष्यांतील एका अद्भुत अनुभवांतून आम्ही जात होतों. लोकमान्य टिळकांच्या नांवाची एका आवाजानें गर्जना करून आम्ही गांवाकडे चालूं लागलों. त्या आमच्या गर्जनेचे पडसाद किती वेळ तरी मागें घुमत राहिले होते. या वेळेपर्यंत अंधार चांगलाच पडला होता. आभाळांत किती तरी चांदण्या लुकलुक करूं लागल्या होत्या.

परत येतांना वाटेमध्यें आम्ही एकमेकांशीं फारसें बोललों नाहीं. जो तो आपल्या मनामध्यें हाच विचार करीत होता कीं, 'लोकमान्य टिळकांनीं देशासाठीं आज एवढा त्याग केला;—मी माझ्या देशासाठीं काय करणार ?' एक नवीनच प्रकाश आमच्या आयुष्यामध्यें निर्माण झालेला होता. या विचारांच्या तंद्रींत दिवें नाकें ओलांडून गांवठाणांत आम्ही कधीं शिरलों आणि घरापाशीं येऊन कसे पोचलों तें आम्हांला कळलेंच नाहीं !

अंगणांत मी पाऊल टाकतों न टाकतों तोंच "कुठें गेला होतास इतका वेळ ?" अशी वडिलांची गर्जना जेव्हां माझ्या कानांवर पडली तेव्हां कुठें मी शुद्धीवर आलों. समोर बघतों आहें तोंच आमच्या वर्गांतल्या दोन-तीन

मुलांचे वडील चिंतातुर आणि गंभीर चेहेरे करून आमच्या वडिलांशेजारींच ओसरीवर उभे असलेले मला दिसले. एका क्षणांत लख्खकन् सारा प्रकाश माझ्या डोक्यांत पडला. मी कांहीं वोलायच्या आधींच वडील माझ्या अंगावर धावले आणि अशी कांहीं झणझणीत कानशिलांत लगावली त्यांनीं माझ्या !

पण मी कांहीं वोललों नाहीं. प्राण गेला तरी कांहीं वोलायचें नाहीं अशी आम्हीं साऱ्यांनीं मुळीं त्या दिवशीं शपथच घेतली होती. माझ्या डोक्यावर टोपी नाहीं हें वघून तर वडील आणखीनच भडकले. त्यांनीं आणखीन् दोन धपाटे माझ्या पाठींत घातले. मी कळवळून मटकन् खालींच बसलों, पण तोंडांतून हूं का चूं काढलें नाहीं. लोकमान्य टिळक देशासाठीं सहा वर्षांचें काळेंपाणी सहन करणार, तेथें आपणांला पांचदहा धपाटे देशासाठीं सहन करावे लागले तर त्याचें काय मोठेंसें होणार आहे, असा मनांत त्यावेळीं विचार आला.

हें असें चाललें आहे तोंच झांबरे सर आमच्यापैकीं एका मुलाला फरपटून ओढीत ओढीत आमच्या घरांत शिरले. तो मुलगा मोठमोठ्यानें किंचाळत होता आणि झांबरे सर त्याच्या कानशिलांत फडाफड लगावून ओरडत होते, "थांब लेका, तुलाच सहा वर्षांच्या काळ्या पाण्यावर पाठवतों, नाहीं तर इथेंच मामलेदार कचेरीसमोर फांशीं देतों––" वडिलांनीं मला सोडून दिलें आणि ते नि इतर पालक झांबरे सरच्या भोंवतीं जमले. झांबरे सरच्या अंगांत त्यावेळीं दहा फौजदारांचें बळ जमा झालें होतें.

आपल्या भसाड्या आवाजांत ते ओरडून म्हणाले, "फार भयंकर आहेत हीं दुसऱ्या इयत्तेंतलीं पोरं ! आणि त्या सुभेदार मास्तरांची त्यांना फूस ! या––या पोरांनीं त्या टिळकांच्याप्रमाणें सरकारच्या विरुद्ध बंड करून काळेपाण्यावर जायचें ठरवलें आहे आज ! बघतां काय आणि पाहतां काय ?" माझे वडील अतिशय भयंकर नजरेनें माझ्याकडे पाहूं लागले. "सरकार-विरुद्ध तूं बंड करणार काय रे लेका ?" असें म्हणून दांतओठ खाऊन त्यांनीं असा काय रपाटा माझ्या बरगडींत लगावलाय म्हणतां ! मी एकाद्या कुत्र्याच्या पल्लाप्रमाणें केकाटत केकाटत स्वयंपाकघराकडे पळत सुटलों.

त्या दिवशीं सबंध रात्रभर माझ्या डोळ्याला डोळा लागला नाहीं. अंथरुणावर मी एकसारखा तळमळत पडलों होतों. सुभेदार मास्तर, वर्गांतलीं निरनिराळीं पोरें, लोकमान्य टिळक, हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्यांतील पात्रें, झांबरे सर, एडवर्ड बादशहा यांची अशी कांहीं गल्लत डोक्यांत होऊन गेली होती कीं विचारूं नका !

पहांटे पहांटे तर या स्वप्नांना अतिशय भयंकर स्वरूप प्राप्त झालें. मामलेदार कचेरीसमोरच्या उघड्या मैदानांत एक मोठी लाकडी चौकट उभारलेली असून तीवर आमच्या वर्गांतल्या साऱ्या मुलांना एकामागून एक फांशीं देण्याचें काम चाललें आहे. शेजारीं झांबरे सर अंगांत फौजदाराचा डगला आणि पगडी घालून अन् हातांत क्याटलाग घेऊन 'अमक्याला फांशीं द्या !' 'तमक्याला फांशीं द्या !' असे हुकूम ओरडून फर्मावीत आहेत. माझी जेव्हां पाळी आली तेव्हां एकदम मोठ्यानें मी चिकाळलों आणि झोंपेंतून जागा झालों.

अगदीं सकाळीं मी उठतों आहें न उठतों आहें तोंच वर्गांतला एक मुलगा घाबऱ्या घाबऱ्या धांवत माझ्याकडे आला. सुभेदार मास्तरांच्या घरासमोर राहणारा मुलगा होता तो. त्यानें रडक्या आवाजांत माझ्या कानांत सांगितलें कीं, काल रात्रीं झांबरे सरनीं सुभेदार मास्तरांना शाळेंतून काढून टाकलें असून गांवच्या जहागिरदारांनीं त्यांना गांव सोडून ताबडतोब बाहेर निघून जाण्याचा हुकूम दिलेला आहे.

काळजांत कुऱ्हाडीचा घाव बसावा तसें त्या वेळीं मला वाटलें. लोकमान्य टिळकांच्या काळेपाण्याइतकीच सुभेदार मास्तरांची ती हद्दपारी मला भयंकर वाटली. पायापासून डोक्यापर्यंत मी दुःखानें आणि रागानें थरथर कांपूं लागलों. जास्त विचार करावयाला वेळच नव्हता. आम्ही दोघे तसेच घाईघाईनें सुभेदार मास्तरांच्या घराकडे पळत सुटलों. वाटेंत दोनतीनदां मी ठेचाळलों देखील असेन.

आमच्या वर्गांतलीं पांच-सहा मुलें मास्तरांच्या दारासमोर माना खालीं घालून उभीं होतीं. 'मास्तर कुठें आहेत ?' असें धापा टाकीत आम्हीं त्यांना विचारलें. तेव्हां अर्ध्या तासापूर्वींच बैलगाडींत बसून मास्तर गांव सोडून निघन गेले असल्याचें त्यांनीं आम्हांला स्फुंदत स्फुंदत सांगितलें.

सारें जग आमच्या भोंवतीं फिरतें आहे कीं काय, असें त्या वेळीं आम्हांला वाटलें. मास्तरांच्या शून्य घराकडे पाहात किती तरी वेळ आम्ही तसेच रडत रस्त्यावर उभे होतों. त्या दिवशीं आमच्या वर्गापैकीं कुणीच शाळेंत गेले नाहीं. सुभेदार मास्तरांच्या निरनिराळ्या आठवणी फिरून फिरून एकमेकांना सांगत आम्ही तो सारा दिवस संगमेश्वराच्या देवळांत एकत्र बसून घालविला.

दुसरे दिवशीं शाळेच्या दाराशीं झांबरे सर एक लांबलचक छडी हातांत घेऊन मोठ्या विजयानंदानें उभे होते. आमचीच वाट पाहात होते ते. आम्ही कांहीं न बोलतां एकामागून एक हात त्यांच्यापुढें केले. आणि छडीचे फटकारे शांतपणें सहन करून संथ पावलांनीं आपल्या वर्गामध्यें जाऊन बसलों.

● ● ●

अनुक्रम २६६९० दि:
क्रमांक १२२० नों दि:

# २

## सार्वजनिक जीवन

[मराठींतील गाजलेल्या वक्त्यांत आ. अत्रे यांची गणना होते. साहित्य, समाजकारण व राजकारण यांवर त्यांचीं आतांपर्यंत शेंकडों व्याख्यानें झालीं आहेत. या व्याख्यानांच्या निमित्तानें महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेरही कित्येक ठिकाणीं जाण्याचा त्यांना योग आला आहे. अशा या निमित्तानें त्यांना जें ‘ सार्वजनिक जीवन ’ जगावें लागतें त्याचें हें जितकें विनोदी तितकेंच वास्तव चित्रण आहे.]

* * *

सकाळची सात वाजण्याची वेळ. ‘ टाइम्स ’ वाचीत मी बिछान्यावर लोळत पडलों होतों. माझा हा नेहमींचाच शिरस्ता आहे. इतक्यांत दाराबाहेरची घंटा वाजली आणि नोकर मला सांगायला आला कीं, “ कुणी तरी पांच-सात माणसं भेटायला आलीं आहेत.”

इतक्या सकाळीं कशाला येतात हीं माणसं दुसऱ्याला त्रास द्यायला कोणास ठाऊक, अशा त्रासिक नजरेनें मीं नोकराकडे पाहिलें नि ‘ बसव त्यांना दिवाणखान्यांत ’ असें अर्धवट शब्दांनीं आणि अर्धवट खुणेनें त्याला सांगितलें.

पांच मिनिटांनीं मी दिवाणखान्यांत गेलों. तो दिवाणखाना अगदीं भरून गला होता. पांच-सात कां चांगली आठ-नऊ माणसें होतीं. लांबून कोणत्या तरी जिल्ह्यांतून आलीं होतीं. बरोबर त्यांनीं माझ्या परिचयाचीं मुंबईतील दोनतीन माणसेंही आणलीं होतीं.

"आतांच उठला वाटतें?" त्यांपैकीं एक जण मुद्दाम हंसूं उकरून काढावें तसा चेहरा करून मी आंत येतांच म्हणाला.

मी कांहींच बोललों नाहीं.

"आम्हांला वाटलं, इतक्या लौकर तुम्ही उठलां असाल कीं नाहीं, कोणास ठाऊक!" पहिल्या माणसापेक्षां जास्त मोठ्यानें हंसून दुसऱ्यानें पृच्छा केली.

त्याला चांगलाच तडाखा देण्याचा विचार क्षणार्ध माझ्या मनांत डोकावून गेला. पण तो तसाच दाबून अगदीं थंड स्वरांत मीं विचारलें, "काय, विशेष कांहीं काम?"

"काम म्हणजे—तुमच्याकडे दुसरं काय काम असायचं?" तिसरा माणूस आणखी वरच्या पट्टींत हंसून बाहेरगांवाहून आलेल्या त्या माणसांपैकीं एकाकडे वळला व त्याला म्हणाला, "गणपतराव, कुठें आहे तुम्हीं आणलेलें पत्र?"

गणपतरावांनीं आपल्या शरीराची एक बाजू उंच करून कडोसरीला लावलेला एक मळकट रंगाचा घडीदार कागद बाहेर काढला. आणि त्याच्या घड्या साफ करून अन् त्याला जास्त सभ्य स्वरूप देऊन तो माझ्या हातांत ठेवला.

"रामभाऊंनीं आपल्याला पत्र दिलं आहे," दुसऱ्या एका माणसानें हलकेच खुलासा केला.

पत्राच्या तळाशीं केलेल्या लपेटदार मोडी सहीची गुंतावळ किलकिल्या डोळ्यांनीं सोडविण्याचा निष्फळ प्रयत्न करीत मी म्हणालों, "रामभाऊ? रामभाऊ कोण?"

त्याबरोबर गणपतराव चटकन् उत्तरले, "रामभाऊ कुलकर्णी, वकील हो! त्यांची न् तुमची फार दोस्ती आहे असं ते म्हणत होते."

"मुंबईला आले म्हणजे तुमच्याकडेच उतरतात—" दुसरा म्हणाला.

"परवां त्यांच्या मुलीचं लग्न झालं तेव्हां त्यांनीं तुम्हांला आमंत्रण धाडलं होतं बघा," तिसरा म्हणाला. "अन् तुम्हीही येणार होतां; पण आयत्या वेळीं तुमची कांहीं तरी भानगड निघाली. अन् तुम्हीं तार पाठविलीत. येतां येत नाहीं म्हणून. गांवकऱ्यांची फार निराशा झाली त्या वेळीं."

"असं असं, म्हणजे आपले रामभाऊ कुलकर्णी वकील म्हणतां होय? असे उंचेले गोरटेले आहेत, तेच ना?" कांहीं तरी बोलायचें म्हणून मी बोलून गेलों.

"अगदीं!" गणपतरावांचा दुसरा गांवकरी म्हणाला, "रामभाऊंना परवांच त्रेसष्टावं वर्ष लागलं!"

त्या माणसाच्या नाकाचा कडकडून चावा घ्यावा असें त्या वेळीं मला वाटलें.

इतक्यांत मुंबईकर माणूस कौतुकाचा वाजवीपेक्षां जादा आविर्भाव तोंडावर आणून हळूच पुटपुटला, "तुम्हांला किती, एकसष्टावें कीं बासष्टावें?"

"बासष्टावें—" मी शांतपणानें उद्गारलों. माझ्या वयाची त्यांनीं चालविलेली आगंतुक विटंबना मला अगदीं असह्य झाली.

"पण चेहऱ्यावर तर तुमची चाळिशीदेखील ओलांडलेली वाटत नाहीं. का हो शंकरराव?" दुसऱ्या एका मुंबईकरानें खुर्चीच्या दांड्यावर बऱ्याचशा कष्टानें बसलेल्या एका माणसाच्या पाठीवर थाप मारून त्याचें मत विचारलें. पण तो उत्तर द्यायच्या आंतच खुर्चीच्या दांड्यावरून खालीं निसटला.

तिकडे दुर्लक्ष केल्यासारखें करून माझ्या इतक्या परिचयाचे 'रामभाऊ कुलकर्णी' ही व्यक्ति कोण असावी, ह्याचा मी मनांतल्या मनांत विचार करूं लागलों. 'कुलकर्णी' आडनांवाच्या शाळेमधल्या अन् कॉलेजमधल्या सर्व वर्गबंधूंचे आणि त्यानंतर आतांपर्यंत भेटलेल्या सर्व माणसांचे चेहेरे आंतल्या 'रुपेरी पड्द्या'वर मीं चटकन् सरकवून पाहिले. पण त्यामध्यें हे 'त्रेसष्ट वर्षांचे रामभाऊ कुलकर्णी वकील' कांहीं मला आढळून येईनात. तेव्हां तो नाद सोडून देऊन मीं त्यांनीं मला लिहिलेलें तें पत्र स्वत:शीं वाचूं लागलों.

पहिल्याच संबोधनाशीं मी ठेचाळलों. "परमपूज्य देशकार्यधुरंधर साहित्य-मुकुट चिंतामणि भाऊसाहेब यांच्या चरणसेवेशीं—"

"भाऊसाहेब!" भातांत एकदम खडा लागावा तसा चरफडून मी मध्येंच थांबलों. "भाऊसाहेब कोण?—"

"तुम्हांला ते भाऊसाहेब म्हणतात—" गणपतरावांनीं मध्येंच हसून खुलासा केला.

" ठीक आहे, " मी मनांतल्या मनांत पुटपुटलों. बोलून चालून मी सार्वजनिक मालच कीं नाहीं ? तेव्हां कुणीही मला वाटेल तीं नांवें ठेवावींत—— भाऊसाहेब नाहीं तर दाजीसाहेब.

मी पुढें वाचूं लागलों, " आमच्या गांवीं सालाबादप्रमाणें श्री. काळ-भैरवनाथ ह्यांची वार्षिक जत्रा भरत असते. आजूबाजूच्या दहा कोसांतलीं दहा-वीस हजार माणसें जमत असतात. अशा प्रसंगीं आपल्यासारख्या थोर आणि विद्वान् देशभक्ताच्या तोंडून निघणाऱ्या ज्ञानामृताचा फायदा जनतेला मिळावा अशी सर्व गांवकरी मंडळींची इच्छा आहे. आपण या भागांत आजपर्यंत कधीं आलेले नाहींत. आपला लौकिक अनेक वर्षांपासून आमच्या कर्णरंध्रांवर आदळत आहे. आपणाला बघण्यासाठीं आणि आपलें व्याख्यान श्रवण करण्यासाठीं आम्ही सर्व मंडळी चक्रवाक पक्ष्याप्रमाणें डोळ्यांत तेल घालून अक्षरशः वाट पाहात आहोंत. आपण न आल्यानें हजारों लोकांची निराशा होईल. तरी आमच्या गांवीं या निमित्तानें आपली पायधूळ झाड-ण्याचे उपकार आमच्यावर करावेत. याच मुहूर्तावर एक मोफत वाचनालय आणि तालीम सुरू करण्याचा गांवकऱ्यांचा विचार आहे. वाचनालयाचें उद्‌घाटन तुमच्याच हस्तें करण्याचा आणि तालमीच्या इमारतीचा दगडही तुमच्याच करवीं बसविण्याचा मंडळींचा विचार आहे. आपण येणार असें गृहीत धरूनच आम्हीं आपलें नांव आमच्या जाहीरातींत आणि पत्रकांत जाहीर केलें आहे. इ. इ."

मी पत्र वाचीत असतांना मला बोलावण्यास आलेले ' गांवकरी मंडळी 'चे ते पांचसात प्रतिनिधि अत्यंत केविलवाणीं तोंडें करून माझ्या चेहऱ्याकडे बघत होते.

पत्र वाचून मी तें खालीं टेबलावर ठेवतों आहें, तोंच गणपतराव लगट-पणाच्या स्वरांत म्हणाले, " रामभाऊंनीं मला सांगितलंच आहे कीं माझं पत्र वाचल्यावर नाहीं म्हणायची भाऊसाहेबांची छातीच नाहीं——"

" माझें नांव भाऊसाहेब नाहीं, " मीं मध्येंच दुरुस्ती केली.

" तेंच तें——जे काय असेल तें."—— गणपतराव दांत विचकून मोठ्यानें हंसण्याचा प्रयत्न करीत म्हणाले.

" पुढल्या सोमवारपासून जत्रा सुरू होते." दुसरे एक गृहस्थ म्हणाले, " अन् शनिवारीं संपते. सहा दिवसांपैकीं कोणत्याही एका दिवशीं आपण आलां तरी चालेल."

" नाहीं-नाहीं. कोणत्याही दिवशीं कसें ?" तिसरे एक जण सात्त्विक आवेशाचा आव आणून म्हणाले, " यात्रेच्या पहिल्या दिवशींच साहेबांचं आम्हांला व्याख्यान ठेवायचं आहे. त्या दिवशीं तर खरी गर्दी जमणार. मागाहून गर्दी ओसरल्यावर साहेबांना तिथं कशाला न्यायचंच ?"

तो हातांनीं अभिनय करून पुढें कांहीं तरी ' चमत्कारिक ' बोलणार होता; पण त्यानें कसेंबसें स्वत:ला आवरलें. मींही सुटकेचा एक मोठा नि:श्वास टाकला.

" गांवकरी लोकांनीं तर आम्हांला साफ सांगितलंय " चौथा एक जण म्हणाला, " कीं साहेब जर आले नाहींत तर आम्हांला दुसऱ्या कोणाचीं मुळीं व्याख्यानं ऐकायचीं नाहींत. अहो, असतील दुसरे पुष्कळ व्याख्यान देणारे—पैशाला पांसरीभर ! त्यांना काय चाटायचंय !"

" गेल्या वर्षी पुण्याच्या शनिवारवाड्यासमोर साहेबांचं व्याख्यान होतं. काय गर्दी—काय गर्दी ! मी होतों ना तिथं. कसली सभा होती बघा—कांहीं आठवत नाहीं !—" डोकें खाजवीत पांचवा म्हणाला.

' अजून कोणाला कांहीं बोलायचं असल्यास बोलून घ्या ' अशा अपेक्षेनें मीं सर्वांच्या तोंडाकडे क्रमश: पाहिलें. पण त्यानंतर आतां मीं बोलावें अशी सर्वांची अपेक्षा दिसली. तेव्हां मला बोलायला संधि दिल्याबद्दल मनांतल्या मनांत त्यांचे आभार मानून मी म्हणालों, " तुमच्या रामभाऊ कुलकर्णी वकिलांना कळवा कीं म्हणावं, तुमचं पत्र पावलं. आभारी आहे. पण कामाच्या गर्दीमुळें यंदा कांहीं मला येतां येत नाहीं—माफ करा म्हणावं."

त्याबरोबर डोक्यावर पटई कोसळून पडावी असे सर्वांनीं चेहेरे केले आणि ते एकमेकांकडे मोठ्या दु:खानें बघूं लागले.

एक मुंबईकर म्हणाले, " आम्हीं तर या मंडळीला सांगितलं कीं, साहेब दुसऱ्यांना काय वाटेल ते म्हणोत; पण आम्ही तर त्यांना हात धरून घेऊन आल्याशिवाय राहणार नाहीं !"

"कामाची गर्दी तर साहेब आपल्यामागें नेहमीं असायचीच," तिसरे मुंबईकर म्हणाले, "पण तेवढ्यांतल्या तेवढ्यांत एका दिवसासाठीं सवड काढायची. दुसरें काय? शहरांतल्या लोकांना तर आपली व्याख्यानें ऐकायला नेहमींच मिळतात. त्यांना एक दिवस नाहीं आपलं व्याख्यान ऐकायला मिळालं तर त्यांचा कांहीं विशेष तोटा होणार नाहीं. खेडेगांवच्या लोकांसाठीं एवढी तसदी आपण घेतलीच पाहिजे—"

"तें सगळं खरं," मी वेडेवांकडें तोंड करीत म्हणालों, "पण मला मुंबईबाहेर जायला ह्या महिन्यांत मुळीं वेळच मिळणार नाहीं. त्याला मी तरी काय करूं?"

"आतां तुम्हीं असं म्हटल्यावर आमची कंबरच मोडली नाहीं का?" आपल्या ग्रामस्थ बंधूंकडे पाहात गणपतराव म्हणाले. सगळ्यांनीं त्यांच्या म्हणण्याला होकार देऊन कंबरा मोडल्याचा अभिनय केला. "म्हणजे गांवाला परत जायची आतां आम्हांला सोयच नाहीं राहिली. गांवकरी पायताणानंच आमचीं थोबाडं फोडतील!"

"असं करूं नका, साहेब!" दुसरा एक जण अगदीं पायां पडल्याचा अभिनय करून म्हणाला, "आम्ही एक दिवसापेक्षां जास्त तुमचा वेळ मुळींच घेणार नाहीं. तुम्ही इथून रविवारीं रात्रीं दहाला निघा. सोमवारीं सकाळीं दहाला तुम्ही आमच्या गांवांत पोंचाल. जेवण झाल्यावर दोन तास खुशाल विश्रांति घ्या. संध्याकाळचं व्याख्यान झालं तुमचं कीं तुम्हांला साडेसातच्या गाडीनं बसवून देतों, कीं मंगळवारीं सकाळीं सात वाजतां पुन्हां इथं आपले परत!"

"नाहींतर तुम्ही म्हणत असाल तर इथून तुम्हांला स्पेशल मोटारनं घेऊन जाण्याची आम्ही व्यवस्था करतों." तिसऱ्या गृहस्थानें सुचविलें.

"विमानाची सोय असती तर आम्ही विमानानें देखील तुम्हांला घेऊन गेलों असतों!" चौथा मोठ्यानें हंसून म्हणाला. त्याला सर्वांनीं खदखदां हंसून साथ दिली.

"पण काय वाटेल तें झालें तरी आम्ही तुम्हांला घेऊन जाणारच!" समेवर येऊन गणपतरावांनीं आपल्या मांडीवर जोरानें थाप मारली.

इतक्यांत दाराची घंटा जोरानें वाजली आणि कोणा तरी दोन गृहस्थांना घेऊन नोकर आंत आला.

दिवाणखान्यांत बसलेल्या माणसांकडे दुर्लक्ष करावयाला ही चांगली संधि आहे, अशा भावनेनें मीं आलेल्या गृहस्थांपैकीं एकाला डोळ्यांनीं खुणावून विचारलें, "काय हो, कां आलांत ?"

"यंदा गणपतीच्या उत्सवांत तुमचा कार्यक्रम ठेवावा अशी आमच्या चाळींतल्या सर्व लोकांची इच्छा आहे." तो बोलूं लागला.

त्याला मध्येंच थांबवून मी म्हणालों, "गणपतीला अजून पुष्कळ अवकाश आहे. पुढें बघूं. पुन्हां केव्हां तरी मला ऑफिसांत भेटा; नाहींतर पत्र टाका."

तेव्हां तो गृहस्थ पुढें कांहीं न बोलतां नमस्कार करून तसाच निघून गला. पण त्याच्याबरोबर आलेला दुसरा गृहस्थ मात्र तसाच रेंगाळत मागें राहिला. तेव्हां मीं आश्चर्यानें त्याला विचारलें, "काय हो, आपलं काय काम ?"

तेव्हां तो माणूस अर्धवट दांत विचकून म्हणाला, "मी इथं एक पत्र ठेवून गेलों होतों परवां. आपण वाचलंच असेल. आज रात्रीं आमच्या क्लबचें नाटक आहे. आपण अध्यक्ष आहांत. तेव्हां आपल्याला आठवण करून द्यायला आलों होतों."

"तुमच्या क्लबच्या नाटकाचा मी अध्यक्ष आहें ?" घेरी आल्यासारखे डोळे फिरवीत मी म्हणालों, "मला माहीत नाहीं."

"आपल्याकडून पत्राचं उत्तर आलं नाहीं म्हणून आम्हीं गृहीत धरलं कीं आपणाला आमची विनंति मान्य आहे." त्या गृहस्थानें अगदीं सरळ माझ्यावर चाल केली.

"हें पहा, मला तुमचा क्लबही माहीत नाहीं आणि नाटकही माहीत नाहीं," मी चिडून म्हणालों. "अन् शिवाय आज रात्रीं मला वेळही पण नाहीं."

"पण तुम्ही आला नाहींत तर लोकांची फार निराशा होईल," तो गृहस्थ लोचटपणें मध्येंच उद्गारला.

"होऊं द्या लोकांची निराशा झाली तर—" मी माघार न घेतां बोललों, "लोकांच्या सर्वच आशा सर्वकाळीं पूर्ण झाल्या पाहिजेत असं थोडंच आहे ?"

"पांच मिनिटें येऊन गेलां तरी चालेल," त्या गृहस्थांनीं शेवटचा खडा टाकून पाहिला.

त्याच्याशीं फार हुज्जत घालण्यांत अर्थ नाहीं, असा विचार करून मी म्हणालों, "ठीक आहे. जाईन डोकावून मी कुठल्या तरी अंकाच्या मधल्या सुट्टींत."

तो गृहस्थ खूष होऊन निघून गेला. मी समोर बघूं लागलों.

दोन संकटें मीं कशींबशीं टाळलीं; पण 'काळभैरवनाथा'च्या जत्रेचें जें संकट आधींपासून मला वेढा घालून बसलें होतें, तें कांहीं टळलें नव्हतें. उलट ते गळयांत पडण्याच्या अगदीं बेतांत आलें होतें.

"मग आमचं काय ठरलं?" गणपतरावांनीं आपला तगादा पुन्हां निकरानें सुरू केला.

"अहो आपलं काय ठरायचंय? आपलं ठरलंच!" एका मुंबईकरानें माझ्या वतीनें परस्पर उत्तर देऊन टाकलें.

"रविवारीं साहेबांना घेऊन जायला तुम्ही आपला माणूस पाठवा अन् त्यांना खुशाल घेऊन जा." दुसऱ्या मुंबईकरानें त्याला साथ दिली.

"चला, उठा!" तिसरा मुंबईकर आणखी पुढें जाऊन म्हणाला, साहेबांच्या पाठीमागं सतरा हजार कामं. त्यांना डोकें खाजवायला वेळ नाहीं. अन् आपण कशाला त्यांचा वेळ घ्या!—"

त्याबरोबर सगळे एकदम उठले.

गणपतराव म्हणाले, "मग आम्ही आज जातों संध्याकाळीं अन् ह्या किशाला ठेवून जातों इथं तुमच्यासाठीं."

"तुम्ही खुशाल जावा! मी अगदीं नक्की साहेबांना घेऊन येतों!" स्वयंसेवकाचा खादीचा मळकट गणवेश घातलेला खप्पड गालांचा किशा मोठ्या उत्साहानें किंचाळला.

मला निसटायला त्यांनीं कुठें फटच ठेवली नाहीं. दिवाणखान्यांतून बाहेर जातां जातां त्यापैकीं एकजण आठवण झाल्यासारखा चेहरा करीत मागें वळून म्हणाला, "अन् बरं का साहेब, आमच्या गांवांतल्या मुलांनीं बंगाल फंडासाठीं तुमचं एक नाटक करायचं ठरवलं आहे."

"अरे, त्याची कशाला परवानगी मागायची आहे?" मुंबईकरानें बोलायची तेवढीसुद्धां संधि गमावली नाहीं. "साहेबांनीं आपलं नाटक करायची साऱ्या जगाला मुळीं परवानगीच देऊन टाकली आहे—"

त्याच्याकडे दुर्लक्ष करून मी शांतपणें म्हणालों, "परवानगीबद्दल तुम्हांला पंचवीस रुपये द्यावे लागतील—"

"पण बंगाल फंडासाठीं नाटक आहे, साहेब" पहिला माणूस म्हणाला.

"बंगाल फंडाला मीं तुमच्या आधीं मदत केली आहे. तुम्हांला करायची असेल तर तुम्ही करा. तेवढ्यासाठीं माझ्या खिशांत पुन्हां तुम्ही कशाला हात घालताहांत!" मी किंचित् चिडून म्हणालों.

इतक्यांत पुढें गेलेले गणपतराव मागें वळून आंत आले आणि म्हणाले, "असं करा साहेब, तुम्ही या वेळेला आम्हांला फुकट परवानगी द्या. दुसऱ्या वेळेला आम्हीं तुमचं नाटक केलं तर पंचवीस काय पन्नास रुपये आम्ही देऊं तुम्हांला."

"हो साहेब!" बाकीच्या सगळ्या ग्रामस्थांनीं अगदीं 'कोरसां'त होकार दिला.

"बरं आहे—तुम्ही म्हणतां तर—"

ओठांतल्या ओठांत मी अर्धवटपणें पुटपुटलों. 'काळभैरवनाथ' वाले खूष झाले आणि मला नमस्कार करून निघून गेले.

'टाइम्स' वाचायचा तसाच राहिला होता. आठवड्याचा लेखाचा आरंभ त्या दिवशीं करायचें मीं ठरविलें होतें; पण सकाळ तर जवळ जवळ सगळी संपून गेली होती. 'लोक' या सामान्य नामाला मनांतल्या मनांत कांहीं तरी शिव्या पुटपुटत मी डोक्यांत असलेल्या कांहीं विचारांचीं सूत्रें गोळा करूं लागलों, तोंच पोष्टमननें दार खडखडावलें. एक मनिऑर्डर येणार होती ती आली असावी या आशेनें मीं दार उघडलें. पण पत्र किंवा मनिऑर्डर यांपैकीं कांहींच घेऊन पोस्टमन आला नव्हता. मीं विचारलें, "काय?"

अगदीं लाडिकवाण्या आवाजांत पोस्टमन म्हणाला, "आज आगला सिनेमा लागलाय त्या ह्या थेटरांत. पास पाहिजे होता."

"किती माणसांचा?" मीं निर्विकार मुद्रेनें विचारलें.

" चार ! " हाताचीं चार बोटें उडवीत पोष्टमन उद्गारला.

टेबलावर पडलेल्या कागदाचा एक कपटा फाडून त्यावर ' चार माण-सांचा पास ' मीं घाईघाईनें खरडला आणि पोष्टमनच्या हातांत टाकून दार एवढ्या मोठ्यानें लावलें कीं म्हटलें त्यापासून त्याला कांहीं बोध व्हावा. त्या पोष्टमनला काय वाटलें कुणाला ठाऊक ? दार बंद असल्यानें मला कांहीं त्याचा चेहरा पाहावयास मिळाला नाहीं.

रविवार उजाडावयाला कांहीं फार दिवस लागले नाहींत. किशानें तर सकाळपासून येऊन घरांत मुक्काम ठोकला. रविवारीं संध्याकाळीं परगांवला जावयाचें या विचारानें मी सकाळपासून अगदीं अस्वस्थ होऊन गेलों. त्यामुळें त्या विश्रांतीच्या दिवसाचें अगदीं वाटोळें होऊन गेलें. मनाला थोडीशी कांहीं तरी उसंत मिळाली असती, पण किशा यमदूतासारखा दिवसभर समोर वावरत होता. आणि मधून मधून आपल्या गांवचें ' राजकारण ' मिटक्या मारीत मला वर्णन करून सांगत होता.

रात्रीं नऊ वाजतां मी नोकराला टॅक्सी बोलवायला सांगितली. सुतळीनें करकचून आवळून बांधलेली एक छोटीशी वळकटी खांद्यावर भिरकावीत किशा माझ्या अगोदर टॅक्सींत जाऊन बसला आणि स्टेशनावर गाडी थांबतांच उडी मारून माझ्या आधीं बाहेर पडला.

" तिसऱ्या क्लासांत लई गर्दी होते. मी जाऊन माझी जागा पकडतों. तुम्ही तिकीट काढून आपल्या डब्यांत बसा. मीही आलोंच." असें घाईघाईनें बोलून किशा स्टेशनाबाहेर अंधारांत आणि गर्दींत एकदम अदृश्य झाला. मला त्याला जें कांहीं सांगायचें होतें तें तसेंच माझ्या तोंडांत राहिलें.

टॅक्सीवाल्याला पैसे देऊन मीं सेकंड क्लासचें तिकिट काढलें आणि प्लॅटफॉर्मावर जाऊन गाडीची वाट पाहात बसलों. गाडी उशिरानेंच आली आणि जी आली ती अगदीं भरून आली. अंधारांत सेकंड क्लासचा डबाही मला सांपडेना. शेवटीं गाडी सुटण्याच्या आधीं एक मिनिट एका डब्यांत मला वरची जागा कशीबशी मिळाली. किशाचा तर पत्ताच नव्हता. मी वर चढून माझी वळकटी सोडतों आहें तोंच गाडी सुरू झाली.

अर्धा-पाऊण तास झाला तरी मला कांहीं झोंप येईना. खालीं झोप-लेल्या माणसाला " दिवा विझवूं का ? " म्हणून विचारलें. तो म्हणाला,

" असूं द्या कीं ! " माझ्या वजनानें वरचा बर्थ तुटून आपल्या अंगावर पडणार या भीतीनें तो भेदरून गेल्यासारखा मला दिसला. तेव्हां जें कांहीं व्हायचें तें उजेडांतच झालेलें बरें या विचारानेंच दिवा विझवायला तो कबूल झाला नसावा.

सार्वजनिक जीवनामुळें माणसाच्या आयुष्याची होणारी परवड या विषयावरील निरनिराळ्या मुद्द्यांचा स्वतःच्या मनाशीं विचार करीत असतां केव्हां मला झोंप लागली तें कळलेंच नाहीं. पहांटे पांच वाजण्याच्या सुमारास कुठल्या तरी एका लहानशा स्टेशनावर गाडी थांबली होती. मला एक भयंकर स्वप्न पडत होतें.

आमचे एक लहानपणचे मारके मास्तर माझ्या हातावर सपासप छड्या मारून विचारीत होते, " जाशील का पुन्हा व्याख्यानाला ? –जाशील ? " आणि मी मोठमोठ्यानें किंचाळ्या मारून त्यांना सांगत होतों, " नाहीं– आतां नाहीं जाणार ! " इतक्यांत किशानें डब्याचें जोरजोरानें दार खडखड-वायला सुरुवात केली. मी दचकून जागा झालों. आणि घाईघाईनें खालीं उतरलों.

" साहेब, आलें स्टेशन, उतरा लौकर. नाहीं तर गाडी सुटेल ! " डब्याला जणु कांहीं आग लागली आहे अशा स्वरांत किशा बाहेरून ओरडत होता. मी माझें सामान घाईघाईनें बाहेरच्या अंधारांत फेकून दिलें आणि डब्यांतून प्लॅटफॉर्मवर उडी मारली.

बाहेर अजून चांगलाच अंधार पसरला होता. दोनतीन माणसें डोक्यावरून आणि अंगावरून उपरणीं घेऊन कुडकुडत उभीं होतीं. मी तो 'मी'च आहें, अशी त्यांपैकीं एकानें खात्री करून घेतली. आणि आपल्या उपरण्याखालून वाळलेल्या शेवंतीचा एक सुकलेला लहानसा एकपदरी हार झटकन् बाहेर काढला अन् घाईघाईनें माझ्या गळ्यांत घालून तो किरट्या आवाजानें ओरडला, " महात्मा गांधी कीं जय ! "

मी रागावून म्हणालों, " महात्मा गांधींचा इथें काय संबंध ? "

तेव्हां त्यानें चटकन् खुलासा केला, " कांहीं तरी ओरडाया पाहिजे, नगं का ? " त्या प्रश्नानें मी निरुत्तरच झालों.

मला जिथें जायचें होतें तें गांव स्टेशनापासून दहापंधरा मैल दूर होतें किशानें हार घालणाऱ्या माणसाला दरडावून विचारलें, "शिरपतराव, रामलालची मोटार घेऊन आलांत ना ?"

शिरपतराव विव्हळत विव्हळत म्हणाले, "अहो, कसची मोटार अन् काय घेऊन बसलां आहांत राव ? आठ दिवस झाले, रामलालची मोटार 'पंचर' होऊनशान पडली आहे. तवा पाटलाची गाडी घेऊनशान आलों. या विमाना-मोटारींचा कुठं काय भरंवसा असतो व्हय राव ? आपली पहिली बैलाची गाडी आहे तीच खरी !"

"अन् गांवाबाहेरून बावन बैलांच्या गाडींतून मिरवणूक काढायचं काय झालं ?" किशानें पुन्हा दुसरा प्रश्न केला.

"अन् ते कशाचं जमायचंय आतां ?" शिरपतराव आपल्या विव्हळ-ण्याचा सूर अधिक वाढवून म्हणाले, "त्या लाळंचा रोग झालाय ना समद्या बैलांना !"

पाटलाची गाडी जुंपून स्टेशनावरून निघायला चांगले आठ वाजले गाडीला तट्ट्या नव्हता. आंत चौघेजण दाटीवाटीनें कसे तरी आम्ही बसलों. खालून गाडीचे एकसारखे धक्के खात आणि वरून उन्हाचे चटके सोशीत आम्ही अकरा वाजायच्या सुमारास कसेबसे एका गांवठाणांत येऊन पोहोंचलों.

सकाळपासून माझ्या पोटांत कांहीं नव्हतें. आणि त्यांत वरून उन्हाचा मारा. त्यामुळें माझा जीव अगदीं कासावीस होऊन गेला. गांवाच्या बाहेर एक पिंपळाचा पार होता. त्यावर दहा-वीस माणसें डोक्यांवर उपरणीं बांधून आमची वाट पाहात बसलीं होतीं. त्यांत मला पूर्वीं भेटलेले गणपतराव आणि त्यांच्याबरोबर आलेली कांहीं माणसें यांचे चेहरे मीं ताबडतोब ओळखले.

"काय व्यवस्थित झाला ना प्रवास सगळा ?" सस्मित मुखानें माझें स्वागत करीत गणपतराव म्हणाले, "या, या, भाऊ या. असे मागें कां ?

आपल्या पडक्या दांतांचें प्रदर्शन करीत एक पांढऱ्या केसांचे 'बुटकेले आणि काळेले' गृहस्थ हात जोडीत पुढें आले. मला चिठी लिहिणारे रामभाऊ कुलकर्णी वकील ते हेच, हें मीं ताबडतोब ओळखलें.

"का, आतां तरी ओळख पटली का आमच्या रामभाऊंची ? " गणपतरावांनीं मला विचारलें. पण मीं उत्तर द्यायच्या आधींच रामभाऊंनीं

ताबडतोब खुलासा केला, " माझाच त्या बाबतींत थोडासा गैरसमज झाला. हे नाहीं, यांचे थोरले बंधु माझ्या वर्गांत होते."

" मला थोरले बंधु नाहींत--मीच थोरला !" मी थंडपणें म्हणालों.

पण रामभाऊंच्या चेहऱ्यावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. " असं, असं--म्हणजे ते तुमचे थोरले बंधु नव्हेत का ? आम्ही तर त्यांना तुमचे थोरले बंधूच समजत होतों." प्रसंगावधान राखून रामभाऊंनीं सरळ सारवासारव केली.

माझ्या मुक्कामाची व्यवस्था अर्थात् रामभाऊंच्या घरांत केली होती हें सांगावयाला नकोच ! एका अरुंद नि अंधाऱ्या बोळांत आणि एका पडक्या खिडाराजवळ रामभाऊंचा ' वाडा ' होता. रामभाऊंच्या घरांत पाऊल टाकलें नाहीं तोंच त्यांच्या निरनिराळ्या वयाच्या आणि निरनिराळ्या उंचीच्या सात-आठ पोरांचा माझ्याभोंवतीं गराडा पडला. ' हेच बरं का ते !' असें गंभीर चेहऱ्यानें आणि अर्थपूर्ण नजरेनें रामभाऊ प्रत्येकाला सांगत होते. मी येण्यापूर्वीं आपल्या पोरांजवळ रामभाऊंनीं माझी काय बदनामी करून ठेवली होती, याचा मला त्यांच्यापैकीं कोणाच्याही चेहऱ्यावरून थांगपत्ता लागेना.

आठ वर्षांखालचीं मुलें एकादा ' बाऊ ' पाहावा तशा भेदरलेल्या मुद्रेनें माझ्याकडे पाहात होतीं; तर बारा वर्षांच्या वरची मुलें सर्कशींतल्या पिंजऱ्यामधल्या वाघाकडे ज्या आदरानें पाहतात तशा दृष्टीनें मला न्याहळत होतीं.

" चिमे, तुझं तें पहिलीचं पुस्तक यांनींच लिहिलंय बरं का !" रामभाऊ आपल्या सातआठ वर्षांच्या ' चिमी ' नामक कन्यारत्नाला उद्देशून म्हणाले. चिमी आपल्या परकराचा सोगा दांतांत चावीत माझ्याकडे अचंब्यानें पाहूं लागली. जणू कांहीं पहिलीचें पुस्तक म्हणजे ' ज्ञानेश्वरी ' किंवा ' भगवद्-गीता ' च होती.

सकाळपासून मी शौचालाही गेलों नव्हतों किंवा तोंडही धुतलें नव्हतें. त्यामुळें शरीराच्या अन्तर्विभागांतून असे कांहीं चमत्कारिक संदेश माझ्या मेंदूपर्यंत चढत होते कीं, त्यांचें शब्दांनीं वर्णनही करतां येणें शक्य नव्हतें.

कानाभोंवतीं बोटें फिरवीत केविलवाणा चेहरा करून अखेर मी राम-भाऊंना म्हणालों, "मला जरा–ह्याला जाऊन यायचें आहे."

रामभाऊ एका पोराला हाक मारून म्हणाले, "सद्या, अरे आंतून तांब्या भरून आण." आणि नंतर विश्वामित्रासारखा हात उंच करून अनुनासिक स्वरांत ते हलकेच मला म्हणाले, "पलीकडच्या परड्यांत जा. हवी तितकी जागा आहे. कुठंही बसा !"

हातांत तांब्या घेऊन मी परड्याकडे जाऊं लागलों. तशीं रामभाऊंचीं दोन-चार मुलें माझ्यामागून येऊं लागलीं. डोळे वटारून जेव्हां मीं त्यांच्याकडे पाहिलें, तेव्हां तीं मागल्या मागें पसार झालीं.

एका पडक्या भिंतीच्या आडोशाला जागा हेरून मी बसलों. तो पलीकडून हातभर लांबीचा एक करंगळीएवढा जाड असा साप सळसळ करीत कोपऱ्यांतल्या बिळांत शिरला. त्या वेळेला माझी अशी घाबरगुंडी उडाली म्हणतां ! मग कसली शौचाला अन् कसलं काय ?

सर्व आटोपून परत आल्यावर रामभाऊंच्या एका पोरानें 'आंघो-ळीची तयारी आहे' असें नाकांतला शेंबूड फर्रकन वर ओढीत फर्माविलें. मी चोळणा नेसणारा. मजजवळ धोतर नव्हतें. तेव्हां रामभाऊंचेंच एक जुनेरें नेसून मी अंगणांत उघड्यावर एक बादलीभर गरम पाण्यानें आंघोळ केली.

रामभाऊंच्या त्या जुन्या धोतराला कैऱ्यांच्या चिकाचे काळे नि तांबडे डाग ठिकठिकाणीं पडलेले होते. आणि डिकेमालीचा त्याला असा कांहीं उग्र वास येत होता कीं कांहीं विचारूं नका ! माझ्या आंघोळीचें काम मी व्यवस्थित रीतीनें करतों आहे किंवा नाहीं यावर देखरेख करण्यासाठीं राम-भाऊंच्या मुलबाळांची पलटणच्या पलटण माझ्यासमोर उभी होती. आणि 'तिथं कोरडें राहिलय्' 'तें भिजलं नाहीं' असें त्यांपैकीं कांहीं जणें बोटें रोखून मधून मधून ओरडत होतीं.

आंघोळ संपतांच गणपतराव आणि त्यांचे सहकारी मला बोलवायला आले.

"वाचनालयाचा आणि तालमीचा समारंभ आतांच उरकून घेऊं," गणपतराव म्हणाले, "म्हणजे दुपारीं त्याचा त्रास नको !"

'काळभैरव' मोफत वाचनालयाचा उद्‌घाटन-समारंभ गांवच्या चावडींत भरविण्यांत आला. समारंभाला गांवांतील दहावीस प्रौढ माणसें आणि मराठीं शाळेंतलीं पांचपंचवीस पोरें होतीं. गणपतराव त्या वाचनालयाचे सेक्रेटरी होते.

"आजच्या अध्यक्षांची आपल्याला ओळख करून द्यायची म्हणजे सूर्याची ओळख एखाद्या काजव्यानें करून देण्यासारखें आहे." गणपतरावांनीं आपल्या प्रास्ताविक भापणांत ओरडून सांगितलें. "त्यांचें भाषण ऐकून हंसून हंसून तुमचीं पोटें फुटल्यावांचून राहणार नाहींत."

त्याबरोबर मराठी शाळेंतल्या सर्व मुलांनीं आपापलीं पोटें हातांनीं गच्च आवळून धरलीं आणि ओठ घट्ट मिटून 'बघूं तुम्ही आमचीं पोटें कशीं फोडतां तें' अशा आव्हानपूर्वक दृष्टीनें तीं माझ्याकडे पाहूं लागलीं. "ह्या वाचनालयाला अध्यक्षांनीं सक्रिय मदत करण्याचें कबूल केलें आहे." असें गणपतरावांनीं दडपून आपल्या भाषणाच्या शेवटीं जाहीर केलें.

श्रोतृवृंदाच्या बुद्धीचा वकूब आणि त्याच्या चेहऱ्यावर चमकणारें शहाणपणाचें तेज लक्षांत घेऊन मी माझें भाषण पांच-दहा मिनिटांतच कसेंबसें संपविलें, आणि खिशांतून एक दहा रुपयांची नोट काढून टाळ्यांच्या गजरांत ती गणपतरावांच्या हवालीं केली. त्यामुळें गणपतरावांना आणखी स्फुरण चढलें, आणि ते एकदम उठून ओरडले, "अध्यक्षांनीं आपलें साप्ताहिक पत्र वर्गणी न घेतां पांच वर्षेपर्यंत आमच्या वाचनालयाला फुकट पाठवून देण्याचें कबूल केलें आहे." श्रोत्यांनीं टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला, तेव्हां गणपतरावांच्या घोषणेला मान हलवून संमति देणें मला भागच पडलें.

तालमीचा दगड बसविण्याचा समारंभ शेजारींच होता. तेव्हां वाचनायाचा समारंभ आटोपतांच तेथल्या सर्व सामानासह व श्रोत्यांसह आम्हीं त्या जागीं स्थलांतर केलें. तो समारंभ तालमीचा आहे, हें सूचित करण्यासाठीं लाल सदरा घातलेला, सुजलेल्या कानांचा आणि आडमाप आकाराचा एक पहिलवान आधींपासून आणून त्या ठिकाणीं बसविण्यांत आलेला होता.

मीं गणपतरावांना विचारलें, काहो, इथें पाया खोदलेला दिसत नाहीं, नी तालमीच्या इमारतीचा दगडही पण दिसत नाहीं!"

तेव्हां गणपतराव हंसून म्हणाले, " तें आम्ही सर्व मागाहून करणार आहोंत. आज तुम्ही आपल्या भाषणांत ह्या ठिकाणीं पायाचा दगड पुढें बसविला जाणार आहे, एवढें जाहीर करून टाका म्हणजे झालं !"

वाचनालयाच्या समारंभांत गणपतरावांनीं जें भाषण केलें तेंच तालमीच्या समारंभांतही केलें व ' तालमीच्या इमारतीला अध्यक्षांकडून सक्रिय मदत होईल ' अशी बळकट आशा व्यक्त केली.

मी माझ्या भाषणांत म्हणालों, " माझा आणि तालमीचा किंवा ' तालीमबाजी 'चा कांहीं एक संबंध नाहीं. लहानपणीं माझ्या घरासमोर एक तालीम होती इतकेंच काय तें ! माझ्या आकारावरून तुमचा कांहीं तरी गैरसमज झालेला दिसतो आहे. आतां या ठिकाणीं हे जे गृहस्थ तुम्हांला बसलेले दिसत आहेत त्या ठिकाणीं तालमीच्या पायाचा एक भलाभक्कम दगड बसविलेला आहे, असेंच तुम्हीं समजावें."

त्याबरोबर सारे श्रोते आनंदानें टाळ्या वाजवूं लागले. माझ्या शब्दांचा अर्थ ध्यानांत न आल्यानें तो पहिलवानही हंसून टाळ्या वाजवूं लागला.

भाषण संपण्यापूर्वीं पुन्हा आणखी एक दहा रुपयांची नोट मीं गणपतरावांच्या स्वाधीन केली. सर्व समारंभ आटोपून मुक्कामाला यावयाला एक वाजून गेला. उन्ह डोक्यावर इतकें तापलें होतें कीं कांहीं सांगतां सोय नाहीं. जीव मधून मधून अगदीं घाबरा होत होता माझा.

एक फाटका जाळीदार मुकटा नेसून माझी वाट पाहात रामभाऊ पडवींत उभे होते. " या ! आतां जेवण करून खुशाल एक झोंप काढा ! पांच वाजेपर्यंत तरी तुम्हांला आतां कांहीं काम नाहीं." रामभाऊंनीं मला आश्वासन दिलें.

जेवतां जेवतां रामभाऊ अनेक विषयांवर वचावचा बोलत होते. पण माझें त्यांच्या बोलण्याकडे मुळींच लक्ष नव्हतें.

" आमच्या सौभाग्यवतीही क़विता करतात बरं का !" रामभाऊ मध्येंच एकदम म्हणाले. सीताबाईंनीं वाढतां वाढतां एवढ्या जोरानें मुरका मारला कीं त्यांच्या हातांतलें वरणाचें पातेलें खालीं पडतें कीं काय, असें मला वाटलें.

एक मोठा ढेकर देत रामभाऊ आपल्या बायकोबद्दल म्हणाले, " गांधीजींच्या मरणावर तिनं एक अशी फर्मास कविता केली आहे कीं, ती तुम्हीं स्वत:च ऐकली पाहिजे. गांधीजी वारल्यानंतर आमच्या गांवांत जी एक मोठी सभा भरली होती, तींत तिनें स्वत:च ती वाचून दाखविली अन् काय सांगावं साहेब-- " रामभाऊ मोठ्या कौतुकानें मिटक्या मारीत सांगू लागले, ' सारी सभा कीं हो ढळढळां रडायला लागली ! "

" शक्य आहे ! " असें म्हणून मी आमटीचा भुरका मारला. तोंच त्यांतल्या लाल मिरचीचा माझ्या जिभेला असा कांहीं चटका बसला, कीं माझ्या डोळ्यांत टचकन् पाणी उभें राहिलें. त्याचा रामभाऊंच्या मनावर इष्ट तो परिणाम झाला. मुकट्याच्या टोंकानें आपले डोळे पुशीत ते म्हणाले, " कांहीं म्हणा, पण गांधी हा फार मोठा माणूस होऊन गेला."

रामभाऊसारख्यानें ज्याअर्थीं गांधीजींना एवढें सर्टिफिकेट दिलें, त्या अर्थी गांधी हा खरोखरच कुणी तरी मोठा माणूस होऊन गेला असेल अशी माझी मनोमन खात्री पटली.

जेवण झाल्यावर वळकटी अंथरून मी तिजवर कुठें कलंडतों आहें, तोंच रामभाऊंचा वंशवेल पुन्हा माझ्याभोंवतीं वेढा घालून बसला. झाडून सगळ्यांनीं आपापल्या शाळेंतील वह्यांवर किंवा कागदाच्या तुकड्यांवर माझ्या स्वाक्षऱ्या घेतल्या. बंड्यानें आपल्या वर्गाच्या हस्तलिखितावर माझा अभिप्राय घेतला. सद्यानें ' यंदाच्या गणपतीच्या मेळ्यासाठीं विनोदी संवाद लिहून द्या ' असा तगादा लावला. यमीनें ' मला आवडणारें पुस्तक ' या तिच्या वर्गाच्या बाईनें लिहावयास सांगितलेल्या निबंधाचे मुद्दे माझ्याकडून लिहून घेतले आणि महाद्यानें ' लोकसत्ते ' मधलें चालू आठवड्याचें कोडें माझ्याकडून सोडवून घेतलें.

इतकें होतां होतां पांच वाजले. व्याख्यानाचें बोलावणें घेऊन किशा आणि त्याचे चारपांच स्वयंसेवक आले. कपडे करून मी, रामभाऊ, सौ. सीताबाई आणि वाटेंत आम्हांला येऊन मिळणारे दहावीस लोक असे आम्ही पायीं चालत चालत काळभैरवनाथाच्या देवळाकडे गेलों.

देवळासमोरच्या उघड्या पटांगणांत दोन-चार हजार लोकांची जत्रा भरली होती. निरनिराळ्या दुकानांचीं पालें औंडक-चौडक पडलेलीं होतीं

दोन-तीन रहाटगाडग्यीं मोठमोठ्यानें कराकरा आवाज करीत होतीं, फिरत होतीं. आणि त्यांच्या पाळण्यांत बसलेले लोक मोठमोठ्यानें ओरडत होते. एका बाजूला एक पोवाड्याचा फड बसला होता; तर दुसऱ्या बाजूला कोणीतरी एक दाढीवाला बावाजी एकतारीवर भजन करीत बसला होता.

साऱ्या पटांगणांत एवढा गलगा, गडबड आणि आरडाओरड चालली होती कीं, तो बाजार बघून माझी तर कंबरच खचून गेली! कुठून आपण या लचांडांत सांपडलों असें मला होऊन गेलें.

"तुमचें एकदां व्याख्यान सुरू झालें म्हणजे हें सगळें एकदम शांत होईल!" माझ्या चेहऱ्यावरून माझ्या मनांत काय विचार चालले असावेत याचा कयास बांधीत रामभाऊ म्हणाले.

एका वडाच्या झाडाखालीं लाकडाच्या फळ्यांचें व्यासपीठ बांधून तयार केलें होतें. शें-दोनशें माणसें व्यासपीठाभोवतीं विरळ वर्तुळ करून बसलेलीं होतीं.

मी गणपतरावांना जरा टोंचून म्हणालों, "तुम्ही तर बोललां होतां कीं व्याख्यानाला दहावीस हजारांची गर्दी होईल म्हणून—"

"दरवर्षी होते. विचारा यांना. काय हो, ग्यानवा?" आपल्या शेजारच्या एका माणसाचा दंड हलवून गणपतराव म्हणाले, "यंदा काय झालंय कोणास ठाऊक. रुपयांत दोन आणे गर्दी नाहीं!"

"त्या लाळंचा रोग झालाया ना जनावरांना!" ग्यानबांनीं यंदां जत्रा कां कमी त्याजवर आपल्या अकलेप्रमाणें प्रकाश टाकला.

"किशा! अरे जा अन् आणखी एकदां दवंडी पिटून या. म्हणावं व्याख्यानाला सुरुवात झाली." गणपतराव किशाच्या अंगावर खेकसून ओरडले. त्याबरोबर किशा "बघतां काय? जाना!" असें आपल्या स्वयंसेवकांच्या अंगावर ओरडला. पण आपल्या जागेवरून तोही हलला नाहीं आणि त्याच्या हाताखालचे स्वयंसेवकही हलले नाहींत.

होतां होतां तास दीड तासानें आणखी शें-दोनशें माणसें जमा झालीं. आणि मग सभेच्या कामाला सुरुवात झाली. कुस्त्या, बोथाटी, लेजीम इत्यादि आरंभींचे कार्यक्रम झाले आणि मी व्याख्यानाला उभा राहिलों.

तेव्हां सात वाजून गेले होते. चोहोंकडे अंधार पडला होता. आणि आजूबाजूचा गलगा पराकाष्ठेचा वाढलेला होता.

आजपर्यंत आयुष्यांत मीं नाना तऱ्हेच्या सभांपुढें व्याख्यानें दिलीं होतीं. पण त्या दिवशीची सभा बघून माझी तर अगदीं दांतखिळी बसली. मी बोलायला सुरुवात करणार तोंच शेजारीं बसलेले रामभाऊ हळूच पुटपुटले, "आज मजा आली पाहिजे, बरं का !"

रामभाऊंच्या टाळक्यावर चांगली एक थप्पड मारावी असें मला त्यावेळीं वाटलें. एक तासभर माझ्या तोंडाला येईल तें मी गुरासारखा ओरडत होतों. मी काय बोलत होतों तें मलाही कळत नव्हतें आणि श्रोत्यांनाही पण समजत नव्हतें. तरी पण ते मधून मधून टाळ्या वाजवीत होते.

भोंवतालचा खकाणा माझ्या नाकातोंडांत उधळत असल्यानें मी मधून मधून जोरानें खोकत होतों. तो माझा 'विनोद' आहे अशा समजुतीनें कांहीं श्रोते मोठमोठ्यानें हंसत होते. माझें व्याख्यान संपवून स्वत:ला आणि श्रोत्यांना शिव्या देत मी खालीं बसलों तेव्हां साडेआठ झाले होते.

रामभाऊंना मी म्हणालों, "आतां मला कांहीं जेवायचं नाहीं. सरळ मला आतां स्टेशनावर पोहोंचवा !" जसें कांहीं आपल्याला यांतलें कांहींच माहीत नाहीं असा चेहरा करीत रामभाऊ म्हणाले, "म्हणजे ? आतां तुम्ही जाणार ? मला वाटलं, इतक्या लांब आल्यासारखे दोनतीन दिवस तरी राहाल. आमच्या येथून चारपांच मैलांवर पांडवलेणीं आहेत. तीं पाहण्यासारखीं आहेत--"

'पांडवलेणीं गेलीं खड्डयांत !' असें मनांतल्या मनांत म्हणत मी गणपतरावांना म्हणालों, "गणपतराव, काय वाटेल तें झालें तरी आज रात्रीं मला परत मुंबईला गेलेंच पाहिजे !"

"पण मुंबईला जायला आतां गाडी कोणती ?--" रामभाऊंनीं शांतपणें विचारलें.

"म्हणजे ? मुंबईला जायला गाडी आतां नाहीं ?" मी घाबरून विचारलें. "नवाची गाडी तर कांहीं आतां सांपडणार नाहीं!" गणपतराव म्हणाले. "मघांशींच आपण निघायला पाहिजे होतें. पण तुमच्या व्याख्यानाला रंग भरला. मध्येंच तुम्हांला मला कांहीं थांबवितां येईना !"

" उद्यां सकाळची आठाची पॅसेंजर नक्की मिळेल तुम्हांला." रामभाऊ मला आश्वासन देत म्हणाले. " अन् तोंपर्यंत दुसरी गाडी मुळीं आहे कुठें ?"

झालें. निकाल लागला! म्हणजे पुन्हा रामभाऊंच्या घरांत जाऊन तेथल्या पोरवड्यांत रात्रभर मुक्काम करावा लागणार, या विचारानें माझ्या अंगावर अगदीं शहारे आले. रामभाऊंच्या फाटक्या धोतराचा डिकेमालीचा वास आठवला आणि ओकारी येते आहे असें वाटलें. कुंडलींतल्या ग्रहांना मनांतल्या मनांत शिव्या देत मुकाट्यानें मी रामभाऊंबरोबर गेलों.

रात्रीं जेवण झाल्यावर मी सौ. सीताबाईंच्या तडाख्यांत सांपडलों. असहकारितेच्या मोहिमेपासून तों देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत सर्व राजकीय चळवळींवर त्यांनीं रचलेलें आपलें कवित्व मला आळवून आळवून आणि विव्हळून विव्हळून म्हणून दाखविलें.

शेवटीं गांधीजींच्या मरणावरची ती कविता वाचायला त्यांनीं सुरुवात केली. पहिली ओळ त्यांनीं उच्चारली तोंच त्या हुंदके देऊन मोठमोठ्यानें रडायला लागल्या. रामभाऊंनीं तर हंबरडाच फोडला. आजूबाजूला सतरंजीवर लोळत असलेलीं आणि अर्धवट झोंपलेलीं मुलेंही जागीं होऊन किंचाळूं लागलीं. अशा परिस्थितींत आपण न रडतां तसेंच स्वस्थ बसून राहिलों तर तें हास्यास्पद दिसेल म्हणून मीही डोळ्यांना हातरुमाल लावून फुसफुसूं लागलों.

गांधीजींवरच्या सीताबाईंच्या कवितेचें वाचन संपण्याच्या सुमारास सांघिक आक्रोशाचा स्वर एवढा वाढला कीं, आजूबाजूच्या घरांतील लोक कांहीं तरी भलताच समज होऊन तेथें धांवत आले आणि तेही त्या आक्रोशाच्या कार्यक्रमांत सामील झाले. सीताबाईचें 'काव्य-रुदन' संपावयाला रात्रीचे दोन वाजले.

सकाळीं सहा वाजतां गणपतराव गाडी घेऊन येणार होते. पण बैलाच्या गाडीचा आवाज कानीं पडायच्या ऐवजीं मोटारच्या शिंगाचा आवाज ऐकूं आला. तेव्हां रामलालच्या गाडीचें पंक्चर दुरुस्त झालें असावें अशा समजुतीनें मी धडपडत उठलों.

तों गणपतराव दारांतून माझ्या नांवानें ओरडतच आले, "हे दुनाखे मास्तर आले आहेत साहेब, तुमच्याकडे."

ही काय नवीन बला उपटली आहे या विचारानें डोळे चोळीत चोळीत मी बघूं लागलों. त्या गांवापासून पंधरा मैलांवर असलेल्या दुसऱ्या एका गांवांतील 'ए. व्ही. स्कूल'चे दुनाखे हे हेडमास्तर होते. गणपतरावांनीं त्यांची माझी ओळख करून दिली. दुनाखे हंसून म्हणाले, "मी आपल्या एस्. टी. सी. क्लासांतला आपला जुना विद्यार्थी आहें. मुंबईच्या पत्त्यावर मीं आपल्याला एक पत्र पाठविलें होतें. आपल्याला मिळालें नाहीं वाटतें ?"

मी म्हणालों, "नाहीं बुवा. कां ?"

दुनाखे म्हणाले, "आज आमच्या शाळेचें गॅदरिंग आहे. आणि अध्यक्ष म्हणून मी आपलें नांव जाहीर करून बसलों आहें."

अहो, पण आत्तांच्या गाडीनें मला गेलें पाहिजे, दुनाखे. वास्तविक कालच रात्रीं जायचा—" अगदीं रडकुंडीला आलेल्या मुलांच्या स्वरांत मी बोलूं लागलों.

"तें काय वाटेल तें झालं तरी तुम्हीं आज आमच्या समारंभाला आलं पाहिजे साहेब" दुनाखे तितक्याच रडक्या आवाजांत गयावया करून म्हणाले. "तुम्हीं आलां नाहींत तर माझी अब्रू जाईल. तुम्ही समारंभाचीं आमंत्रणें स्वीकारतां आणि आयत्या वेळीं येत नाहीं, असा आधींच तुमच्याबद्दल गैरसमज पसरलेला आहे. त्यांत तुम्ही न येण्यानें भर पडेल. आमच्या सोसायटीचे प्रेसिडेंट छातीवर हात मारून म्हणाले, कीं तुम्हीं येणें शक्य नाहीं. त्यांच्याशीं मीं दहा रुपयांची पैज मारली कीं काय वाटेल तें झालें तरी मी त्यांना घेऊन आल्यावांचून राहणार नाहीं."

"तेव्हां मी आलों नाहीं तर दहा रुपयांचा तुम्हांला चट्टा बसेल हेंच ना तुमचें म्हणणें ?" मी खिशांतून दहा रुपयांची एक नोट बाहेर काढीत म्हणालों.

"तेवढ्यानें भागणार नाहीं, साहेब. कदाचित् माझी नोकरी गमवावी लागेल !" दुनाखे डोळ्यांत अश्रु आणून म्हणाले.

आदल्या रात्रीं अश्रूंच्या महापुरांत बुडतां बुडतां मी वांचलों होतों. म्हणून पुन्हा अश्रूंचें दर्शन होतांच मीं घाबरून दुनाख्यांना एकदम होकार देऊन टाकला. " बरें आहे, " मी म्हणालों, " एवढंच असेल तर मी येतों."

" आपल्याला आम्हीं यत्किंचितहि तसदी देणार नाहीं. म्हणूनच मोटार घेऊन आलों आहें. समारंभ झाला कीं संध्याकाळच्या गाडीला आपल्याला सरळ स्टेशनावर पोहोंचवतों." दुनाखे म्हणाले. त्यांच्या डोळ्यांतले अश्रुबिंदु पार नाहींसे झाले आणि त्यांच्या चेहऱ्याची कळी एकदम उमलली.

" बरं आहे साहेब, येतों." गणपतराव कोपरापासून हात जोडून म्हणाले, " आतां तुम्हांला आम्हीं मास्तरांच्या ताब्यांत दिलें आहे. आमच्या जबाबदारींतून आम्ही सुटलों. असाच दयालोभ ठेवा. अन् पुन्हा कधीं बोलावलें तर या !"

माझ्या जाण्यायेण्याच्या खर्चाचें काय असें मीं गणपतरावांना विचारण्याच्या आधींच स्वारी तडक पसार झाली.

रामभाऊंच्या घरांत आदला दिवस जसा गेला, तसाच तो दिवस दुनाखे मास्तरांच्या घरांत गेला. दुनाखे मास्तरांच्या पंचाला डिकेमालीचा वास येत नव्हता अन् त्यांची बायको कविता करीत नव्हती, एवढाच काय तो फरक. आतां मुंबईला आपण केव्हां पोंचणार, याचा विचार करावयाचेंच मीं सोडून दिलें.

दुनाखे मास्तरांच्या शाळेचा समारंभ संपल्यानंतर त्यांच्या संस्थेच्या ज्या प्रेसिडेंटनें मी येणार नाहीं अशी दुनाखे मास्तरांशीं पैज मारली होती, त्यांच्या ' जटाशंकर ' टॉकीज 'चें उद्‌घाटन दुसऱ्या दिवशीं रात्रीं त्यांनीं माझ्या हस्तें करून घेतलें. " इतक्या लांब तुम्ही आल्यावर तुम्हांला तसे आम्ही थोडेच सोडणार आहोंत ?" जटाशंकर परदेशी माझ्या गळ्यांत प्रेमानें हात घालून म्हणाले. मग माझी काय छाती होती ' नाहीं ' म्हणायची ?

बुधवारीं रात्रीं सिनेमागृहाचें उद्‌घाटन झाल्यानंतर गुरुवारीं दुपारीं एक थाटाची मेजवानी देऊन त्या संध्याकाळीं शेटजींनीं मला आपल्या मोटारींतून एका स्टेशनावर आणून सोडलें. शेटजींना कांहीं महत्त्वाचें काम असल्यामुळें ते कांहीं मेजबरोबर स्टेशनापर्यंत येऊं शकले नाहींत. दुनाखे मास्तरही आदल्या दिवसापासून कुठें तरी बेपत्ता झाले होते.

मुंबईपर्यंत तिसऱ्या वर्गानें जाण्याइतकेच पैसे माझ्या खिशांत उरले होते. गुरुवारीं रात्रीं मला कोणत्याही गाडींत जागा मिळाली नाहीं. जी गाडी यायची ती अगदीं भरून यायची. सबंध रात्र मीं स्टेशनावर तशी कुडकुडत घालविली. घसा बसला आहे, डोळे दुखताहेत, अंग ठणकतें आहे, अशा अवस्थेंत शुक्रवारीं रात्रीं साडेदहा वाजतां दादर स्टेशनावर येऊन पोहोंचलों.

बाहेर एक टॅक्सी नव्हती कीं व्हिक्टोरिया नव्हती. हमालाच्या डोक्यावर सामान देऊन मी रखडत रखडत अर्ध्या-पाऊण तासानें घरीं आलों. वाटेनें गणपतराव, रामभाऊ, सीताबाई, दुनाखे मास्तर, जटाशंकर यांना मनांतल्या मनांत काय काय शिव्या दिल्या असतील त्या इथें सांगतां येत नाहींत.

घरीं येऊन कोचावर मी अंग टाकतों आहें तोंच टेलिफोनची घंटा वाजूं लागली. रात्रीं अकरा वाजतां टेलिफोन करणारा हा महात्मा कोण, म्हणून मी चिडून टेलिफोन घेतला आणि 'कोण आहे ?' म्हणून दरडावून विचारलें.

तोंच माझा आवाज ओळखून दुसऱ्या बाजूनें कोणीतरी मोठमोठ्यानें बोललें, "साहेब का ? आतां इथं त्या हृयाचं व्याख्यान होतं; पण ऐन वेळीं ते कांहीं आले नाहींत. तेव्हां तुम्हीं यावं असं लोकांचं म्हणणं आहे. फार नाहीं–अर्ध्या तासासाठीं तुम्हीं आलांत तरी चालेल. सगळे लोक खोळंबून बसले आहेत."

मी कांहीं बोलण्याच्या आधींच "आलों मी आतां गाडी घेऊन" असें म्हणून त्या माणसानें टेलिफोन बंद देखील करून टाकला.

माझ्या डोळ्यांसमोर अंधारी आली.

"तुमबिन कौन सहारा, प्रभुजी !" शेजारच्या घरांतल्या रेडिओवरून आर्त स्वरांत कोणी तरी हें ध्रुवपद आळवीत होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत. •
अनुक्रम 28680 विः निबंध
क्रमांक 7226 नों दि: 28/8/80

३

# महाराष्ट्राचें बालविकासी फूल : साने गुरुजी

[एक प्रसिद्ध साहित्यिक, निष्ठावंत समाजसेवक व थोर जीवनवीर कै. सानेगुरुजी यांच्याविषयीं आ. अत्र्यांच्या मनांत नितान्त आदरभाव आहे. बाह्यत: कांहींशा विसंगत वाटणाऱ्या गुरुजींच्या जीवनाचें खरें मर्म उकलण्याचा प्रयत्न आचार्य अत्रे यांनीं आपल्या अनेक लेखांतून केला आहे. लहान मुलांबद्दल सानेगुरुजींना जें अपार वात्सल्य व जी असीम ममता वाटत असे. तिचें अत्यंत सुंदर विश्लेषण या लेखांत आहे.]

* * *

कांहीं फुलें सूर्याच्या प्रकाशानें फुलतात. कांहीं चंद्राच्या किरणांनीं उमलतात. सूर्यविकासी फुलें रात्रीं झोंपीं जातात; तर चंद्रविकासी फुलें दिवसा घट्ट डोळे मिटून बसतात. सानेगुरुजी हें असलेंच एक तऱ्हेवाईक फूल होतें. मी त्यांना बालविकासी फूल म्हणतों. लहान मुलें भोंवतालीं जमलीं कीं हें फूल आपोआप उमलूं लागे, हंसूं लागे, डोलूं लागे नि बोलूं लागे. पण मोठीं माणसें दिसलीं कीं हें फूल गपकन् आपले डोळे मिटून घेई किंवा ओशाळ्या नजरेनें खालीं पाहूं लागे, अन् ओठाच्या पाकळ्या घट्ट मिटून घेई. गुरुजी फक्त मुलांपुढेंच फुलत आणि मुलांशींच बोलत. केवळ मुलांच्याच भावनेनेंच ते विचार करीत. आणि त्यांच्याच भाषेंत बोलत. त्यांचें सारें लेखनच मुळीं मुलांशीं बोलणें होतें. मुलांना जोजवतांना आई जशीं गाणीं गाते, तसें गुरुजींचें सारें लिहिणें होतें. प्रीतीनें आणि ममतेनें ओथंबलेलें. सोपें

सोपें. गोडगोड अन् लाडकें लाडकें. गुरुजींचें वाङ्मय म्हणजे एक अखंड अंगाईगीतच आहे म्हणानात. म्हणूनच गुरुजींची सारी मैत्री मुलांशीं आणि त्यांच्या साऱ्या ओळखी आपल्या मुलांमध्यें. त्यांनीं आपल्या आठवणी आणि पत्रें विखरून ठेवलेलीं आहेत. मुलांनींच गुरुजींच्या आठवणी सांगाव्यात अन् लिहाव्यात. आपल्या आईशिवाय मनमोकळें करून उभ्या आयुष्यांत मोठ्यांशीं ते क्वचितच बोलले असतील. मोठ्यांच्या संगतींत त्यांचें मन आणि शरीर लाजाळूच्या लहानग्या पानांप्रमाणें एकदम संकोच पावत असे. मग मोठ्यांना तें कसें दिसणार अन् कसें समजूं शकणार? उलट मोठ्यांना त्यांचें वागणें, हंसणें अन् वागणें भारी चमत्कारिक वाटे. कामानिमित्त मोठ्यांशीं त्यांचा संबंध येई. त्यांच्यामधून त्यांना उठावें-बसावें लागे. त्यांपैकीं अनेकांशीं तर त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते; पण गुरुजींची आणि आपली मैत्री होती असें त्यांपैकीं फारच थोड्यांना म्हणतां येईल. गुरुजींची मैत्री आपली मुलांशींच. म्हणून अनेक वर्षे गुरुजींशीं परिचय असूनही त्यांच्यासंबंधीं सांगण्यासारख्या अशा आठवणी प्रौढांजवळ फारच थोड्या निघूं शकतील.

त्रेसाळीस सालापर्यंत गुरुजींचा अन् माझा संबंध मुळीं आलाच नाहीं. कांहीं कारणच नव्हतें. दोघांचेही मार्ग निरनिराळे. एवढेंच काय, पण तोंपर्यंत मीं त्यांना पाहिलेंही नव्हतें किंवा त्यांचें व्याख्यानसुद्धां ऐकलें नव्हतें. कॉंग्रेसच्या प्रचार-कार्यांतही त्यांची व माझी कधीं गांठ पडली नव्हती. एकदां दोनदां कुठेंतरी ते व्याख्यानाला येऊं शकले नाहींत, म्हणून त्यांची गैरहजेरी मला भरून काढावी लागली. एवढाच काय तो त्यांचा अन् माझा अप्रत्यक्ष संबंध आला. पुढें त्यांचा अन् माझा समक्ष भेटीचा जो प्रसंग आला तो जितका अनपेक्षित तितकाच अतिशय मौजेचा होता. ऑगस्ट आंदोलनाच्या काळांत कांहीं भूमिगत नेते अधून मधून माझ्या घरीं मुक्कामाला येत असत. एकदां अच्युतराव पटवर्धन असेच मजकडे असतांना त्यांना भेटण्यासाठीं म्हणून साने गुरुजी माझ्या घरीं आले. दुपारचा दीड-दोनचा सुमार असेल. अच्युतराव बाहेर गेले होते. एका वाटाड्यानें गुरुजींना आणून माझ्या घरीं पोहोंचविलें व तो निघून गेला. कोणाच्या घरांत आपण तुम्हांला नेत आहोंत हें वाटाड्यानें गुरुजींना सांगून ठेवलें असेल, अशी माझी कल्पना होती. पण गुरु-

जींना त्याबद्दल त्यानें यत्किंचित्‌हि सुगावा लागूं दिलेला नसावा, हें माझ्या लक्षांत यायला कांहीं फार वेळ लागला नाहीं. मी कोण आहें हें गुरुजींना माहीत असावें, अशा अपेक्षेनें अन् विश्वासानें मी गुरुजींशीं एखाद्या परिचिता-सारखा बोलूं लागलों. पण गुरुजींच्या तोंडावर त्याचा उलट परिणाम होत आहे असें मला आढळून आलें. मला ओळखल्याची एकही खूण त्यांच्या चेहऱ्यावर तर मला दिसेनाच. पण मी जसजसा अधिक मोकळेपणानें त्यांच्याशीं बोलूं लागलों, तसतसा त्यांचा निर्विकार चेहरा मला जास्त जास्त बुजल्यासारखा अन् गोंधळल्यासारखा दिसूं लागला. आरंभीं आरंभीं ते एखादा शब्द तरी बोलत; पण थोड्या वेळांतच ते निःशब्द हुंकारावरून नुसत्या मानेच्या होकारापर्यंत येऊन ठेपले. आतां काय करावें? मोठा चमत्कारिक प्रसंग होता तो. त्यांच्या अबोलपणामुळें मीच मनांतल्या मनांत जास्त वरमलों नि शरमलों. अच्युतराव येईपर्यंत गुरुजींना विरंगुळा वाटावा म्हणून कांहीं तरी वाङ्मयविषयक संभाषणांत त्यांना गुंतवून ठेवण्याचा जो मीं आगंतुक प्रयत्न केला, तो सपशेल माझ्या अंगावर उलटला आणि अगदीं वेड्यासारखी माझी स्थिति झाली. कुठून आपण ह्या भानगडींत पडलों असा क्षणभर जरा पश्चात्ताप झाला. "बरं आहे. मी जातों. अच्युतराव यतील इतक्यांत," मध्येंच संभाषण तोडून मी एकदम उठलों. त्याबरोबर माझ्या स्वरांतील तुटकपणाची भावना गुरुजींनीं ओळखली. सशासारखे आपले भित्रे आणि ओलसर डोळे किंचित् वर करून धैर्यानें त्यांनीं मला विचारलें, "क्षमा करा. मीं आपल्याला ओळखलें नाहीं." मीं हंसून जेव्हां त्यांना माझें नांव सांगितलें, तेव्हां गुरुजींच्या चेहऱ्यावर ज्या भावना एकदम प्रकट झाल्या त्यांचे वर्णन शब्दांनीं करणें अशक्य आहे. आपल्या दोन्ही हातांनीं त्यांनीं माझे हात दाबून घट्ट धरले. आणि मान खालीं वांकवून अन् सारें अंग घुसळून असें गमतीदार ते हंसले कीं कांहीं विचारूं नका. शब्द न बोलतां गुरुजींनीं आपलें सारें अंतःकरण एकदम मजपुढें उघडें केलें. त्यांत सगळा खुलासा अन् सगळी भरपाई आली. संकोचाचीं अन् अनोळखीपणाचीं टरफलें आपोआपच गळून खालीं पडलीं. गुरुजींच्या भाबडेपणाचें आणि जिव्हाळ्याचें तें विलक्षण तेज बघून मी दिपलों, थिजलों, कोसळलों, अन् जिंकलों गेलों. त्याच क्षणीं उभयतांच्या मनांत परस्परांबद्दल एक नाजुक

दुवा निर्माण झाला. गुरुजींचा आणि माझा तसा पुढें फारच थोडा संबंध आला. आम्ही वरच्यावर थोडा वेळ भेटलों असूं किंवा फारच थोडे बोललों असूं. पण त्यांना माझी फारच आठवण होई. मींहि त्यांच्या संबंधींची माहिती मिळेल त्याच्याकडून विचारून घेईं. अगदीं अखेरपर्यंत त्यांचे आणि माझे असे अगत्याचे नि जिव्हाळ्याचे संबंध होते.

गुरुजी सदैव कामांत असत अन् फिरतीवर असत. म्हणून पत्र लिहून किंवा भेटून त्यांचा विनाकारण वेळ घेणें मला आवडत नसे. पण तेच मला कधीं कधीं एखादें पत्र लिहीत असत. 'नवयुग'साठीं त्यांनीं कांहीं तरी लिहावें असें मला मनांतून वाटे. पण मी त्यांना तसें विचारण्याचें कधीं धाडस केलें नाहीं. पण त्यांच्याच तें लक्षांत आलें. कसें कोणास ठाऊक, एकदां त्यांनीं आपण होऊनच मला लिहिलें, "ठिकठिकाणीं मीं हिंडतों व व्याख्यानें देतों. त्यांचा सारांश तुमच्या 'नवयुग'साठीं लिहून पाठविण्याचें माझ्या मनांत आलेलें आहे; म्हणजे माझ्याही व्याख्यानांची नोंद राहील अन् तुमच्यासाठीं कांहीं लिहावें, असें वाटतें ती माझी इच्छाहि पूर्ण होईल." तें पत्र वाचून मला साहजिकच आनंद झाला. तसें मीं तावडतोब गुरुजींना कळविलें. पण पुढें कामाच्या गडबडींत गुरुजींना तें आपलें वचन कधींच पुरें करतां आलें नाहीं. गुरुजी 'नवयुग' वाचीत असतील कीं नाहीं त्याची मला शंका होती. कसें विचारावें त्यांना ? एखादे वेळीं त्यांना माझें लिहिणें आवडतही नसेल. कुणीं सांगावें ? पण एकदां एका पत्रांत त्यांनीं 'नवयुग'ला अनाहूतपणें उत्कृष्ट शिफारसपत्र देऊन टाकलें. त्यांनीं लिहिलें, "मी जेथें जातों तेथें लोक तुमचा 'नवयुग' आवडीनें वाचीत असलेले मला दिसून येतात. 'नवयुग'नें महाराष्ट्राला काँग्रेसभक्ति शिकवली !" काका गाडगिळांसारखीं माणसें त्या काळांत माझ्या काँग्रेस-सेवेबद्दल पुष्कळदां हेटाळणीनें बोलत, "ह्यानें काँग्रेसचें काय काम केलें ? हा काय तुरुंगांत थोडाच गेला ?" हे उद्गार ऐकून माझें मन पुष्कळदां खिन्न होई. पण सानेगुरुजींनीं 'नवयुगची' मुक्तकंठानें प्रशंसा केल्यापासून मला मात्र मनापासून समाधान झालें. एवढेंच नव्हे, तर अगदीं कृतकृत्य झाल्यासारखें वाटलें. गुरुजींना माझ्याबद्दल किती आपलेपणा वाटे, ह्याचा एकाच उदाहरणावरून मला प्रत्यय आला. एकदां कुठें तरी ते व्याख्यानाला गेले होते.

त्यांच्या खादीच्या सदऱ्याच्या खिशांत एक हजार रुपयाची नोट होती. व्याख्यानाच्या गर्दीत कुणीतरी त्यांचा खिसा कापला व त्यांची हजार रुपयांची नोट चोरली. त्यांना ते पैसे कोणाला तरी द्यावयाचे होते. दुसऱ्या दिवशीं त्यांनीं मला पत्र लिहिलें कीं, असा असा प्रकार झाला. मला हजार रुपयांची गरज आहे. तरी तुम्हीं मला ते दिल्यास तुमच्यासाठीं लेख लिहून वा अन्य तऱ्हेनें मी ते परत फेडीन." मीं उलट टपालीं त्यांना एक हजार रुपये पाठवून दिले. पुढें वर्षभर त्यांना माझ्यासाठीं कांहींच लिहितां आलें नाहीं. तेव्हां त्यांनीं माझे एक हजार रुपये एके दिवशीं गुपचुप परत करून टाकले. त्याच सुमारास 'मुंबई-सरकारनें' माझ्याकडून सहा हजारांचा जामीन मागितला होता. म्हणून गुरुजींकडून परत आलेले हजार रुपये मला अगदीं वेळेवर उपयोगीं पडले. पुढें कांहीं दिवसांनीं आपल्या 'चिंतनिके'चें हस्तलिखित त्यांनीं माझ्या 'समीक्षक' साठीं आपण होऊन पाठवून दिलें. तिचा पूर्वार्ध 'समीक्षकां'त हप्त्याहप्त्यानें प्रसिद्ध झालेला आहे.

पंढरपूरच्या विठ्ठल-मंदिरामध्यें हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून गुरुजींनी जेव्हा प्राणांतिक उपोषण करावयाचें ठरविलें, तेव्हां 'नवयुग'चा एक विशेषांक काढावयाचें मी ठरविलें. तेवढ्यासाठीं गुरुजीचे मला चार दोन फोटो पाहिजे होते. जुन्या फोटोंपेक्षां नवीनच फोटो घेतलेले बरे, असा मीं मनांत विचार केला. सुदैवानें गुरुजी त्यावेळीं मुंबईंतच होते. पण फोटो घ्यावयाची गोष्ट गुरुजींजवळ काढायची कुणीं? आणि फोटोग्राफरकडे त्यांना घेऊन जायचें कसें? गुरुजी त्यावेळीं अशा व्याकुळ आणि प्रक्षुब्ध मनःस्थितींत होते कीं, त्यांची मुद्रा बघून फोटोसंबंधीं त्यांना विचारण्याचें कोणाला धाडसच होणें शक्य नव्हतें. एकदम संतापून ते उसळले तर? म्हणजे सगळेंच विनसायचें. गुरुजींच्या प्रेमाप्रमाणें त्यांचा रागही भयंकर होता. तथापि काय वाटेल तें झालें तरी गुरुजींचा नवा फोटो हा घ्यावयाचाच, अशी मीं माझ्या मनाशीं प्रतिज्ञा केली. पण गुरुजींना कुठें गांठायचें? ते एका ठिकाणीं थोडेच सांपडायचे? तेव्हां नेवाळकरांना घेऊन मी गुरुजींना शोधण्याच्या मोहिमेवर निघालों. कारण माझ्यापेक्षां नेवाळकरांचा गुरुजींशीं जास्त परिचय होता. ज्या ठिकाणीं गुरुजींना भेटायला जावें त्या ठिकाणीं आतांच तुम्ही यायच्या आधीं गुरुजी इथून गेले, असें उत्तर आम्हांला मिळे.

शेवटीं दादरला एका घरांत गुरुजी आम्हांला सांपडले. तेव्हां विशेष गांभीर्य चेहऱ्यावर किंवा आवाजांत न दाखवतां एखादी क्षुल्लक गोष्ट विचारावी तितक्या निष्काळजीपणानें मी त्यांना म्हणालों, "गुरुजी, 'नवयुग'च्या अंकासाठीं तुमचा फोटो पाहिजे होता. तुम्ही माझ्याबरोबर फोटोग्राफरकडे याल तर पांचदहा मिनिटांत मोकळे करतों." गुरुजी क्षणभर थांबले अन् चटकन् 'हो' म्हणून गेले. मग काय, पडत्या फळाची आज्ञा. मी त्यांना माझ्या मोटारींत घालून जवळजवळ पळवूनच नेलें. फोटोग्राफरना मीं खुणेनें सांगितलें कीं, काम अगदीं झटपट व्हायला पाहिजे. पण फोटोग्राफरच्या कांहीं तें लक्षांत आलें नाहीं. त्याच्याहि स्वतःच्या कांहीं खोडी होत्या. त्यानें गुरुजींच्या गालांना आणि हनुवटीला हात लावून त्यांचें डोकें पुन्हा पुन्हा आपल्याला पाहिजे होतें तसें खालीं वर करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें गुरुजी असे कांहीं लाजत होते आणि संकोचत होते कीं आम्हांला हंसूं आवरेना. बरें, हे गृहस्थ कोण आहेत अन् त्यांच्याशीं तुम्हीं कसें वागलें पाहिजे हें त्या फोटोग्राफरलाहि आम्हांला उघडपणें सांगतां येईना. अशी आमची अगदीं पंचाईत उडाली. मला सारखें भय वाटत होतें कीं फोटोग्राफर 'रेडी' म्हणायच्या वेळीं गुरुजींनीं रामदासाप्रमाणें एखादे वेळी त्या स्टूडिओमधून धूम ठोकली तर काय करावयाचें ? पण तसा कांहीं प्रसंग आला नाहीं. त्या फोटोग्राफरनें जेवढे जेवढे म्हणून हाल केले, तेवढे त्यांनीं हंसतमुखानें सहन केले, आणि आमचें फोटोचें काम अगदीं व्यवस्थितपणें पार पडलें. गुरुजींना परत पोहोंचवून आल्यानंतर एखाद्या अग्निदिव्यांतून आपण बाहेर पडलों अशा सुटकेचा मीं मोठा निःश्वास टाकला. त्या फोटोवरून गुरुजींचें जें तीनरंगी चित्र आम्ही बनविलें अन् 'नवयुग' च्या खास अंकावर छापलें तें पुष्कळांना पसंत पडलें. महाराष्ट्रांत अनेक घरांत चौकट करून तें भिंतीवर लावलेलें आढळून येईल.

पंढरपूरला उपोषण आरंभण्यापूर्वीं गुरुजींनीं 'नवयुग'च्या वाचकांसाठीं एक खास संदेश पाठवून दिला तो त्यांच्या हस्ताक्षरांत मी 'नवयुग'मध्यें त्यावेळीं छापलेला आहे. गुरुजींच्या उपोषणाच्या आठव्या दिवशीं मी पंढरपूरला गेलों. पलंगावर झोपलेली गुरुजींची क्षीण व शांत मूर्ति दृष्टीस पडतांच माझ्या डोळ्यांत एकदम अश्रु उभे राहिले. मला पाहतांच गुरुजींच्या

डोळ्यांतून आसवांच्या धारा वाहूं लागल्या. किती वेळ तरी माझा हात ते आपल्या हातांत धरून निपचित पडले होते. ओठांतून शब्द बाहेर पडण्याच्या स्थितींत दोघेहि नव्हतों. अन् बोलणार तरी काय ? न बोलण्यांतच सगळें बोलणें आलें. त्या रात्रीं पंढरपुरांत माझें जाहीर व्याख्यान होतें. हरिजन-सेवक काकासाहेब बर्व्यांनीं मला बजावलें, " बेतानें बोला. बडव्यांना भडकवूं नका." मी त्यांना म्हणालों, " मी गुरुजींचे प्राण वांचवायला इथें आलों आहें." त्या रात्रीचें माझें भाषण अतिशयच प्रभावी झालें. लोक ढळढळा रडले. जणूं कांहीं गुरुजींचाच संचार माझ्या अंगांत झाला होता. दुसऱ्या दिवशीं मी पुण्याला परतलों. गुरुजींचा निरोप घेण्याचें धैर्यच मला झालें नाहीं. त्या रात्रीं पुण्याला रास्ता पेठेंत गुरुजींच्या उपोषणावर माझें जाहीर व्याख्यान होतें. श्रोत्यांच्या अंत:करणाला पीळ पडेल अन् पाझर फुटेल असाच माझ्या व्याख्यानाचा पूर्वार्ध होता. इतक्यांत एक माणूस हातांत एक तार घेऊन धांवत आला, 'पंढरपूरच्या विठ्ठल-मंदिरांत हरिजनांना प्रवेश मिळाला. गुरुजींचें उपोषण सुटलें.' तारेंतला मजकूर मी श्रोत्यांना सांगतांच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला अन् श्रोते हर्षानें नाचूं लागले. त्यानंतर मग सभेचा साराच रंग बदलला. पूर्वींची रागदारी एकदम बदलून, नवीन स्वरांत अन् नवीन रंगांत माझ्या व्याख्यानाला मीं सुरुवात केली. व्याख्यानाच्या पूर्वार्धांत एक रस अन् उत्तरार्धांत अजिबात निराळा रस असें अद्भुत आणि नाटयपूर्ण भाषण मीं माझ्या आयुष्यांत कधीं केलें नसेल. म्हणून त्या रात्रीचें तें माझें भाषण मी तरी कधीं विसरणार नाहीं. वक्तृत्वाची एक विलक्षण कसोटीच होती म्हणानात !

माझे कविमित्र सोपानदेव चौधरी यांची गुरुजींशीं फार दोस्ती होती. त्यामुळें माझ्या हकीकती गुरुजींना जशा सोपानदेवांकडून कळत, तशा गुरुजींच्या गमतीदार गोष्टीही मला सोपानदेवच सांगत. सोपान-देवांचें अवलोकन आणि विनोदबुद्धि मोठी सूक्ष्म आहे. त्यामुळें ते एकेक गोष्टी सांगूं लागले, म्हणजे गुरुजी अगदीं पोट धरधरून हंसत. आभाळांतून गारा पडतांना पाहून सोपानदेवांच्या धाकटया मुलानें मोठा काव्यमय प्रश्न केला कीं, " काय हो, ह्या पावसाच्या बिया काय ?" सोपानदेवांनीं ही गोष्ट जेव्हां गुरुजींना सांगितली, तेव्हां त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले आणि

त्यांच्या अंगावर रोमांच तरारले. त्यांनीं आपल्या एका भाषणांत या गोष्टीचा मुद्दाम उल्लेखही पण केलेला आहे. गुरुजी तुमच्याशी जसें खुलेपणानें बोलतात. तसे माझ्याशीं बोलत नाहींत, अशी सोपानदेवांकडे मी एकदां तक्रार केली, ती सोपानदेवांनीं गुरुजींच्या कानावर घातली. तेव्हां गुरुजी त्यांना म्हणाले, "मी काय बोलूं त्यांच्याशीं ? मला त्यांच्याशीं बोलण्याचें भय वाटतें. उलट ते काय म्हणतात तेंच मला ऐकावेंसें वाटतें." सोपानदेवांनीं जेव्हां हा निरोप सांगितला तेव्हां मला भारी ओशाळल्यासारखें झालें. 'स्वातंत्र्यदिना'च्या आधीं दोन दिवस माझा वाढदिवस येतो. माझ्या पन्नासाव्या वाढदिवशीं खंडाळ्याच्या माझ्या जागेंत मी हापूसच्या आंब्याच्या शंभर कुंड्या लावल्या. सोपानदेवही माझ्या मदतीला होते. पाऊस मुसळधार पडत होता. तरी तशा चिखलांत कपडे ओलेचिंब भिजले असतांना आम्ही कलम लावीत होतों. पुढें सोपानदेवांनीं ही गोष्ट गुरुजींना सांगितली, तेव्हां त्यांना अतिशय हर्ष झाला. वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्याची ही कल्पना त्यांना अतिशय काव्यमय वाटली. ते म्हणाले, "सृष्टीशीं अशा रीतीनें आपण तादात्म्य पावलों तरच आपला विकास होईल." खंडाळ्यासाठीं मला चिकूचीं रोपें पाहिजे होतीं. तेव्हां 'तुम्हांला चांगलीं चांगलीं चिकूचीं रोपें मी बोर्डीहून पाठवून देईनहो !' असा मला त्यांनीं निरोप पाठविला. तेव्हां मी त्यांना एकदां म्हणालों कीं, "गुरुजी, हीं रोपें तुमच्या पन्नासाव्या वाढदिवशीं तुम्ही स्वत: आपल्या हातांनीं माझ्या जागेंत येऊन लावावींत अशी माझी इच्छा आहे." गुरुजींच्या डोळ्यांत चटकन् पाणी आलें. ते हलकेच पुटपुटले, "जशी प्रभूची मर्जी !" पण दुर्दैवानें तो योग कधीं आलाच नाहीं. कारण, प्रभूची मर्जी निराळी होती ! पण कधीं भेटले की ते नेहमीं हंसून म्हणायचे, "तुमच्या खंडाळ्याला यायचें माझ्या लक्षांत आहे. मी विसरलों नाहीं !"

शेवटच्या वर्षा दीडवर्षांत मात्र गुरुजी आणि मी पुष्कळच एकमेकांच्या जवळ आलों. एकाच व्यासपीठावरून कित्येकदां तरी त्यांचीं आणि माझीं व्याख्यानें झालीं. गुरुजींना विनोद आवडत असेल कीं नाहीं याबद्दल मी साशंक होतों. पण माझ्या कित्येक कोटयांना ते ओठ मिटून अन् अंग घुसळून हंसत असत. गुरुजींच्या वक्तृत्वाचे चमत्कार मलाहि मनसोक्त पाहावयाला मिळाले. त्यांच्या भाषणाची तऱ्हाच कांहीं निराळी होती. भाषणाला

उठेपर्यंत हा माणूस एक शब्द तरी बोलूं शकेल काय, असा श्रोत्यांना संशय वाटे. एकसारखे ते स्वत:शींच कण्हत असत. त्यांच्या सगळ्या अंगांत जणुं काय कणकण भरलेली आहे असें वाटे. ध्वनिक्षेपकापुढें उभे राहतांना त्यांना अतिशय कष्ट पडत आहेत असें दिसे. पण एकदां उठून त्यांनीं आपल्या भाषणास सुरवात केली कीं त्यांची चर्या अन् आवाज हळूहळू बदलत जाऊन अंगांत जणु कांहीं संचार व्हावा तसें त्यांचें व्यक्तिमत्त्व पार बदलून जाई. व्याख्यानाची त्यांची सुरवात फारच हलक्या आवाजांत होई. तोंडांतल्या तोंडांत त्यांचे शब्द निघत. प्रारंभीचे त्यांचे मराठीचे उच्चारहि चमत्कारिक भासत. एखादा मिशनरी जसा मराठी बोलेल तसे ते बोलताहेत, असा भास होई. हें पुष्कळदां मी अगदीं लक्षपूर्वक ऐकून स्मरणांत सांठवून ठेवलें आहे. ते शब्दांच्या आद्याक्षरावर आघात देत. कुणीं मला सांगितलें की, शब्दोच्चार करण्याची ही खानदेशी तऱ्हा आहे. पण तसे उच्चार मीं खानदेशांतल्या कोणत्याच माणसाच्या तोंडून ऐकले नाहींत. पण गुरुजींच्या भाषणाची एकदां गति वाढली अन् त्यांच्या वक्तृत्वांत वेग निर्माण झाला म्हणजे मग त्यांचा पहिला आवाज अन् उच्चाराची आरंभींची तऱ्हा पार बदलून जाई. विजेच्या चमकाऱ्याप्रमाणें एकामागून एक तेजस्वी वाक्यें अन् विचार धडाक्यानें त्यांच्या मुखामधून बाहेर पडत अन् त्यांच्या तेजानें श्रोते अगदीं दिपून जात. त्यांनीं सारें ब्रह्मांड वाचलें होतें. अन् त्यांची स्मरणशक्ति अतिशय तल्लख होती. वाङ्मयांतलीं उत्तम उत्तम रसस्थळें त्यांना माहीत असत अन् साधुसंतांच्या अन् थोरामोठ्यांच्या जीवनांतले सर्व हृदयस्पर्शी प्रसंग त्यांना मुखोद्गत असत. ह्या सर्व निवडक अन् काव्यमय संदर्भाचा उल्लेख जेव्हां त्यांच्या तोंडून होऊं लागे तेव्हां निरनिराळ्या भावनांच्या श्रोत्यांच्या अंत:करणांत अगदीं कल्लोळ उडून राही. विषयांचा नि विचारांचा तुटवडा कसा तो त्यांना माहीतच नव्हता. ते तासन् तास बोलत अन् ते कितीही वेळ बोलत राहिले तरी श्रोत्यांना त्याचें भानच राहात नसे. त्यांचे व्याख्यान कधीं कधीं संपत आल्यासारखें वाटे. इतक्यांत नवीन एखादा मुद्दा त्यांना आठवे अन् मग पुन्हां पहिल्या वेगानें त्यांच्या व्याख्यानाचें चक्र उसळी मारून फिरूं लागे. व्याख्यान संपण्यापूर्वी असें चारपांच वेळां तरी होई. अलीकडे अलीकडे देशांतील परिस्थिति बघून ते इतके कावून अन्

चिडून गेले होते कीं, त्यांच्या संतापाच्या ज्वाला त्यांच्या व्याख्यानांतून वारंवार भडकून उठत. त्यांच्या सर्वांगाचा दाह झाल्यासारखा वाटे. पायापासून डोक्यापर्यंत त्यांचें शरीर थरथर कांपत असे. अन् त्यामुळें कित्येकदां तर सारें व्यासपीठ गदगदा हालूं लागे. शेवटीं शेवटीं मीं ऐकलेलीं त्यांचीं बहुतेक सर्व व्याख्यानें अनावर संतापाच्या उद्रेकानें अशा तऱ्हेनें धगधगलेलींच असावयाचीं. भाषा, भावना, विचार आणि वक्तृत्व यांचा एवढा कोमल अन् प्रखर संगम पुन्हां महाराष्ट्रांत पाहावयाला सांपडावयाचा नाहीं.

कासेगांवला गुरुजींच्या अध्यक्षतेखालीं समाजवादी तरुणांची परिषद् भरली होती. या परिषदेचें उद्घाटन माझ्या हस्तें झालें. मुंबईहून परिषदेस जाण्यासाठीं आम्ही बरोबर निघालों. सोबत मुंबईचे पांचपंचवीस तरुण कार्यकर्ते होते. तिसऱ्या वर्गाचा एक अर्धा डबाच आम्हीं व्यापला होता. गुरुजी दाटीवाटीनें एका कोपऱ्यांत उकिडवे बसले होते. तिसऱ्या वर्गांतून मी सहसा प्रवास करीत नसें. पण गुरुजींच्या संगतीचा मोह मला आवरणें शक्य नव्हतें. म्हणून मीहि त्या गर्दीत त्यांच्या शेजारीं जाऊन बसलों. मुलांच्या घोळक्यामध्यें गुरुजी अगदीं प्रसन्न चेहरा करून बसले होते. मुलेंहि त्यांना जेवढें छळून घ्यावयाचें तेवढें घेत होतीं. मला तर पुढें पुढें गुरुजींचे हाल बघवेनातच. गुळाच्या ढेपेवर मुगळे जसे तुटून पडतात तशीं मुलें त्यांच्यावर तुटून पडत होता. अन् त्यांचे अक्षरशः लचके तोडीत होतीं. कुणी त्यांना म्हणे, "गुरुजी, आम्हांला ही गोष्ट सांगा;" तर कुणी म्हणे "आम्हांला ती गोष्ट सांगा." गुरुजी आपले प्रत्येकाला हो हो म्हणत होते. गाडी पुण्याला येईपर्यंत गुरुजी जागेवरून हलले नाहींत. आणि पोरांनींही त्यांच्या जिभेला खळ पडूं दिला नाहीं. पुण्याहून कऱ्हाडला जाणाऱ्या गाडींत पुन्हा तिसऱ्या वर्गानें गुरुजींबरोबर प्रवास करण्याची माझी हिंमतच झाली नाहीं. नारायणराव गोरे आणि एस्. एम्. यांनीं पुण्याच्या स्टेशनवर मला स्पष्टपणें बजावून सांगितलें कीं, "तुम्ही गुरुजींच्या नादाला लागूं नका. तुम्ही त्यांच्याबरोबर टिकायचे नाहींत. तुम्ही आपले मुकाटयानें सेकंड क्लासमध्यें जाऊन निजा कसे." त्याप्रमाणें मी सरळ सेकंड क्लासमध्यें जाऊन माझी वळकटी सोडली आणि झोंपीं गेलों. इकडे गुरुजींना सबंध रात्रभर मुलांनीं कांहीं

झोप दिलें नाहीं. पहांटे चारच्या सुमारास आम्ही कऱ्हाडला पोंचलों. तोंपर्यंत गुरुजींचें गोष्टीपुराण आपलें चाललेलेंच होतें.

ओगले कारखान्यांत मुखमार्जन अन् न्याहारी करून आम्ही दहा वाजतां कासेगांवला पोहोंचलों. तेथें आमच्या मिरवणुकीची सर्व तयारी झालीच होती. गुरुजी ओशाळून म्हणाले, "कशाला तुम्ही आमची ही धिंड काढतां आहांत?" एका बैलगाडीवर टाकलेल्या आडव्या फळीवर मी, गुरुजी व नारायणराव गोरे बसलों होतों व पुढें पांचपन्नास कां शंभर, बैल लागलेले होते. सबंध मिरवणुकींत गुरुजी अत्यंत अस्वस्थ होते. तथापि, हात जोडून दुतर्फा उभ्या असलेल्या लोकांना अतिशय अदबीनें ते नमस्कार करीत होते. जेवावयाच्या वेळीं आम्ही शेजारीं शेजारीं बसलों होतों. त्यावेळीं गुरुजींचा आहार अगदीं भरपूर असल्याचें मला आढळून आलें. माझा आहार अतिशय कमी आहे हें पाहून त्यांना आश्चर्य वाटलें. गुरुजी बोलले नाहींत; तरी आपण त्यांच्याशीं एकसारखे बोलत राहायचें किंवा मधून मधून त्यांना प्रश्न विचारायचे, असा मीं त्यावेळीं खाक्या ठेवला. त्याचा परिणाम असा झाला कीं, हळूहळू गुरुजींचा मजबद्दलचा संकोच नाहींसा झाला व ते माझ्याशीं मनमोकळेपणानें बोलूं लागले. ह्या दौऱ्यांत माझे हात हातांत घेऊन गुरुजी किती वेळ तरी मनापासून हसले असतील.

दुपारीं तास दीडतास एके ठिकाणीं आम्ही एकाच वळकटीवर डोकें ठेवून कलंडलों होतों. त्या खोलींत आमच्याखेरीज दुसरें कोणीहि नव्हतें. गुरुजी पोटाशीं पाय मुडपून एखाद्या लहान पोराप्रमाणें निपचित पडले होते. रात्रभर जागरण झाल्यामुळें त्यांना झोपेची जरुरी आहे असें ओळखून मी किती तरी वेळ त्यांच्याशीं बोललोंच नाहीं. मला वाटलें, त्यांना झोंप लागली असेल. पण ते जागेच होते. नुसते डोळे मिटून पडले होते. कांहीं वेळानें ते आपण होऊनच माझ्याशीं बोलूं लागले. मी म्हणालों, "गुरुजी, एवढें जागरण करून तुम्हांला झोप कशी नाहीं?" गुरुजी म्हणाले, "मला दिवस दिवस झोप येत नाहीं." मी म्हणालों, "तिसऱ्या वर्गांतून प्रवास करावयाची माझी खोड तर काल चांगलीच मोडली. ह्या हालअपेष्टा तुमच्या तुम्हीच सहन करूं जाणे." तेव्हां गुरुजी हंसून म्हणाले, "अहो, आमचे सेनापति बापट म्हणतात त्याप्रमाणें तिसऱ्या वर्गातच खरा 'मास

कॉंटॅक्ट ' घडतो. त्यांच्या मास कॉंटॅक्टची गोष्ट सांगू का तुम्हांला ? एकदां आम्ही असेच आगगाडीच्या तिसऱ्या वर्गांतून प्रवास करीत होतों. डब्यांत खूपच गर्दी होती. पण सेनापति बापट डब्याच्या तोंडाशीं उभे राहून प्रत्येक स्टेशनावर उतारूंना हातांनीं ओढून ओढून आंत घेत. शेवटीं आंत इतकी गर्दी झाली कीं सांगायची सोय नाहीं. कुणीं सेनापतींना विचारलें कीं हें तुम्ही काय करतां आहात ? तेव्हां सेनापति म्हणाले, ' जेवढी जास्त गर्दी तेवढा जास्त मास कॉंटॅक्ट घडतो, त्याचें आपणांला पुण्य लागतें." असें म्हणून गुरुजी अगदीं खदखदून हसले.

इतक्या निवांतपणें गुरुजींच्या सान्निध्यांत बसून बोलण्याची ती माझी पहिली अन् शेवटची संधि. रात्रीं जेवण झाल्यानंतर शेजारच्या एका खेडे-गांवांतील पांचसात मुलें गुरुजींना भेटायला आलीं. त्यांचीं वयें सात ते बारा वर्षांपर्यंत असतील. थंडी पडली होती म्हणून त्यांनीं आपलीं अंगें धोतरांनीं लपेटून घेतलीं होतीं. गुरुजी त्यांच्याशीं जवळ जवळ तासभर बोलत बसले होते. एवढ्या चिमुकल्या मुलांशीं गुरुजी इतका वेळ काय बोलत होते तें परमेश्वरालाच ठाऊक. मी शेजारीं असूनसुद्धां त्यांच्या बोलण्यांतलें एक अक्षर देखील मला उमगलें नाही. मुंग्या जशा एकमेकांना मुकाट्यानें भेटतात, तशी त्यांची ती सांकेतिक मुलाखत चालली होती. गुरुजी त्या रात्रीं आमच्याबरोबर मुंबईस परतणार होते. ते अतिशय दमले होते, थकले होते, विश्रांतीची त्यांना फार जरुरी होती. पण कुठल्या तरी गांवची मंडळी आली. अन् गुरुजींना व्याख्यानासाठीं धरून घेऊन गेली. त्यांना नकार देण्याची गुरुजींची छातीच नव्हती. गुरुजी जितके मऊ तितकेच लोक कठोर होते. निर्दय होते. त्यांनीं गुरुजींना अगदीं मुळासकट चावून घेतलें. गुरुजींनाहि पण तें आवडत होतें. त्याला कोण काय करणार ? त्या रात्रीं कऱ्हाडहून पुण्याला परत येतांना तिसऱ्या वर्गांत अशी कांहीं गर्दी भरली होती म्हणतां ! मला शौचकूपाच्या दारांत जागा मिळाली. सबंध रात्रभर माझ्या डोळ्याला डोळा लागला नाहीं. आजूबाजूच्या लोकांच्या लाथा आणि धक्के खातांना, ' मास कॉंटॅक्ट 'चें फार मोठें पुण्य आपल्या खात्यांत जमा होत आहे, एवढ्या एकाच विचारानें मीं माझें समाधान करून घेतलें.

कांहीं दिवसांनीं जळगांव येथें पुन्हा एक समाजवादी युवक परिषद भरली. अध्यक्ष होते एस्. एम्. गुरुजींना अन् मलाहि त्यांनीं उद्घाटनाला का आशीर्वादाला बोलाविलें होते. तेव्हां पुन्हा दोन-तीन दिवस मला त्यांच्या-बरोबर प्रवास करण्याचा आणि त्यांच्या सान्निध्यांत राहण्याचा योग आला. जळगांवांत मोटारींतून मिरवणूक निघाली. सारें खानदेश लोटलें होतें. अन् खानदेश तर गुरुजींचें माहेर. जवळ जवळ प्रत्येक माणूस त्यांच्या ओळखीचा होता. हें मला त्यावेळीं दिसून आलें. ह्या म्हाताऱ्याला मोटारींत घे, त्या मुलाला आंत बोलाव, अशी मिरवणुकीची मोटर त्यांनीं अगदी भरून टाकली. रात्रीं जळगांवच्या बाजारांत तीस-चाळीस हजारांची प्रचंड सभा झाली. ह्या सभेंत आमचीं दोघांचीं भाषणें झालीं. इतरांचींहि झालीं. पण गुरुजींनीं आपल्या वक्तृत्वाची पराकाष्ठा केली. "तुमचें भाषण फार चांगलें झालें" असें म्हटलेलें गुरुजींना आवडत नसे. ते एकदम उसळून म्हणत, "भाषण चांगलें होऊन करायचें काय ? लोकांच्या मनावर त्याचा काय परिणाम झाला ? लोकांनीं तें ऐकून काय केलें ?" जळगांवलाहि मुलांनीं आणि माणसांनीं गुरुजींना अगदीं छळून छळून आणि खाऊन खाऊन घेतलें. एकाच वेळीं दोन मुलांनीं त्यांना जेवायचें निरनिराळें आमंत्रण दिलें. गुरुजींच्या कांहीं ते लक्षांत राहिलें नाही. एका मुलाकडून ते जेवून आले तर दुसरा मुलगा त्यांना बोलावण्यासाठीं येऊन बसला होता. गुरुजी म्हणाले, "अरे बाळ, मी जेवून आलों आहें." तेव्हां तो मुलगा लागला रडायला. तेव्हां गुरुजींचें अंतःकरण द्रवलें. ते चटकन् उठले आणि पुन्हा त्या मुलाच्या घरून जेवून आले. गुरुजींचें आयुष्य हें असें होतें. मुलांना व तरुणांना संतुष्ट करणें हा त्यांच्या जीवनांतला सर्वांत मोठा आनंद होता. आणि त्यांच्यासाठीं आपल्याला कांहीं करतां येत नाहीं, हें त्यांच्या आयुष्यांतलें सर्वांत मोठें दुःख होतें. शेवटीं शेवटीं हें दुःख त्यांना आवरेनासें झालें.

एकदां एका तरुणाला चिठ्ठी देऊन त्यांनीं माझ्याकडे पाठविलें. तींत त्यांनीं लिहिलें होतें, "अनेक तरुण माझ्याकडे येतात, म्हणतात मला काम द्या, नोकरी द्या. मी एकटा या सर्वांना कुठून नोकरी देऊं ? माझी स्थिति ही अशी. त्यांचें दुःख मला पाहवत नाहीं. तुमच्या ओळखी पुष्कळ आहेत. तुम्हीच ह्या मुलाला कुठें तरी लावून द्या." मी तरी त्या मुलाला कुठून काम

देणार ? देशाला स्वातंत्र्य मिळवूनहि राष्ट्रांतील तरुणांचें जीवन आणि सामर्थ्य वायां चाललें आहे, हें गुरुजींच्या हृदयाला जाळणारें सर्वांत मोठें शल्य होतें. त्यामुळें त्यांना जगणें अशक्य झालें. मुलांची उपासमार आणि विटंबना जशी आईला बघवत नाहीं, तिला त्यापेक्षां मरण बरें वाटतें, तसें गुरुजींचें झालें. तरुणांचा नि जनतेचा आक्रोश त्यांना ऐकवेना. त्यांच्या अंगाचा अगदीं तडफडाट झाला. ते म्हणाले, "हें पाहायला मी जगणार नाहीं. त्यापेक्षां मी मरून जाईन !" हा विचार मनांत यायचा काय तो अवकाश, काडकन् त्यांनीं आपल्या देहाचें मडकें फोडून घेतलें आणि 'अनंताच्या सिंधूंत त्यांनीं आपल्या जीवनाचा बिंदु मिसळून टाकला!' जीवनाचा मोह अन् मरणाचें भय तुम्हां-आम्हांला. गुरुजींना त्याचें काय ?

गुरुजी गेले त्यावेळीं मी पुण्याला होतों. ती शेवटची हृदयद्रावक हकीकत नारायणराव गोऱ्यांनीं मला सांगितली. नारायणराव म्हणाले, "त्या दिवशीं मी पुणें मेलनें मुबईला आलों. दादरहून गुरुजींच्या मेघाभुवनांत असा साडे अकरा-बाराच्या सुमारास मी आलों. तों गुरुजी आंघोळ करून धोतराच्या निऱ्या बोटानें साफ करीत करीत बाहेर आलेले मला दिसले. मला बघून ते नेहमींप्रमाणें हंसले व माझा हात त्यांनीं आपल्या हातांत घट्ट धरला. नंतर अर्धा तासपर्यंत पलंगावर आम्ही इकडच्या तिकडच्या गोष्टी करीत बसलों. मी विचारलें, 'आज रात्रीं तुम्ही खानदेशांत जाणार ना ?' तेव्हां गुरुजी हंसले नि कांहीं बोललेच नाहींत. इतक्यांत आंतून जेवणाचें बोलावणें आलें. मी म्हणालों 'गुरुजी, चला जेवायला.' गुरुजी म्हणाले, 'आज शुक्रवार. मी जेवत नाहीं. झोपतों जरा." मी जेवून बाहेर येतों आहें, तों आंतल्या खोलींत गुरुजी कांहीं तरी लिहीत होते. मी जवळ जाऊन किंचित् डोकावून पाहिलें, तों गुरुजींनीं कागद आपल्याकडे कलता केला. तें मला जरा चमत्कारिकच वाटलें. कारण गुरुजी कोणतीही गोष्ट कुणापासून लपवीत नसत. तेव्हां मी बाहेर आलों. आंत पलंगावर एक मुलगा झोपला होता. आपलें पत्र लिहून झाल्यावर गुरुजींनीं त्याला उठविलें. अन् सांगितलें, 'मला इथें झोपायचें आहे. तूं बाहेर जाऊन झोप.' हेंहि गुरुजींचें करणें नेहमींपेक्षां निराळेंच होतें. कारण निजलेल्या मुलाला ते कधींहि उठवत नसत. मी पुन्हा आंत जातों आहें तों गुरुजी पलंगावर गाढ झोंपले होते. आणि हळूहळू घोरूं लागले होते. तेव्हां मी त्यांच्या शेजारीं जमिनीवर

झोंपलों. दोन वाजतां उठलों तों गुरुजी गाढ झोपले होते. मी त्यांच्याकडे क्षणभर पाहिलें अन् माझ्या कामाला बाहेर निघून गेलों. त्यानंतर दुपारीं गुरुजीना भेटायला कांहीं लोक आले. संध्याकाळच्या गाडीचीं तिकिटें घेऊन मधु लिमये आले. चहाची वेळ झाली. तरीपण गुरुजी झोंपलेच होते. त्यांना कुणी उठवलेंच नाहीं. रात्रीं जागरण होणार आहे, तेव्हां आतां ते झोंपले आहेत तर झोंपूं द्या त्यांना स्वस्थपणें, असेंच बाहेरच्या खोलींत बसलेल्या मुलांना वाटलें. मी सायंकाळीं सातच्या सुमारास आलों. ‘मेघाभुवन’मध्यें चांगला अंधार पडला होता. तरी पण गुरुजी झोंपलेले आहेत, हें बघून मला धक्काच बसला. मला तें फारच चमत्कारिक वाटलें. मी म्हणालों, ‘अरे, सबंध दिवसभर गुरुजी झोंपले आहेत हें काय आहे? उठवा त्यांना.’ एक मुलगा पाय न वाजवतां हलकेंच त्यांच्या खोलींत गेला व त्यानें दिवा लावला. तरी गुरुजींनीं हूं कीं चूं केलें नाहीं. तेव्हां मात्र माझ्या छातींत धस्स झालें! मला गुरुजींचें तसें नेहमीच भय वाटत असे. मी त्यांना जोराजोरानें हलवूं लागलों; पण ते शुद्धीवर कुठें होते’ त्याबरोबर एक अशुभ कल्पना डोक्यांत सळक मारून गेली, दुपारीं गुरुजी जें पत्र लिहीत बसले होते त्यामध्यें ह्या त्यांच्या स्थितीचा कांहीं तरी उलगडा असेल अशा विचारानें डॉक्टरना बोलावणें पाठवून आम्ही तें पत्र शोधूं लागलों. शेवटीं त्यांच्या अंगावरच्या सदऱ्याच्या एका खिशांत तें पत्र सांपडलें. त्यावरील ‘मधु लिमये यास’ अशीं अक्षरें वाचून पुढील सर्व प्रकार ध्यानांत आला. दुसऱ्या खिशांत त्यांचा अकालीं मरण पावलेला आवडता पुतण्या वसंत याचा फोटो होता. त्याच्या पाठीवर त्यांनीं आपल्या अक्षरांत लिहिलेलें होतें, ‘सर्वांबरोबर तुझेंहि स्मरण.’ नारायणरावांच्या तोंडून ही हकीकत ऐकत असतां माझ्या शरीरांतलें रक्त अक्षरश: गोठून गेलें. मीं निर्जीवपणें त्यांना विचारलें, “मग गुरुजींनीं त्या गोळ्या घेतल्या केव्हां? अन् कुठें?” नारायणराव म्हणाले, “आंघोळीच्या खोलींत आंघोळ करून जेव्हां ते बाहेर आले किनई मी आलों तेव्हां, त्याचवेळीं त्या गोळ्या त्यांनीं घेतल्या होत्या!” गुरुजींच्या अंतकाळची नारायणरावांनीं सांगितलेली ही हकीकत मला जेव्हां जेव्हां आठवते, तेव्हां तेव्हां माझें मस्तक बधिर होऊन जातें आणि कांहीं सुचेनासें होतें. गुरुजींचें जीवन जसें अलौकिक, तसें त्यांचें मरणहि पण अलौकिक.

● ● ●

४

# जग काय म्हणेल?

[मराठी रंगभूमि ज्या वेळीं मृतप्राय झाली होती त्यावेळीं तिला पुन्हा सावरणाऱ्या नाटकांत अत्र्यांचें स्थान फार मोठें आहे. विनोदी त्याचप्रमाणें गंभीर नाटकें त्यांनीं लिहिलीं आहेत. त्यांच्या गंभीर स्वरूपाच्या "जग काय म्हणेल?" या नाटकांतील हा उतारा आहे. या नाटकांत अन्यायाविरुद्ध प्राणपणें झगडण्याची मराठी महिलेला त्यांनी तेजस्वी शिकवण दिलेली दिसते.]

* * *

उल्का (दार उघडल्यावर) अगबाई, डॉक्टर! या ना—

डॉक्टर (आंत प्रवेश करतात. मागें वळून) ये प्रकाश (प्रकाश आंत येतो. प्रकाश हा एक एकोणतीस वर्षांचा तरुण असतो. विद्वत्तेचें, रसिकतेचें आणि विनयाचें तेज:पुंज वलय त्याच्या मुद्रेभोंवतीं प्रकाशत असतें.) हे माझ्या एका मित्राचे धाकटे बंधु प्रकाश देसाई, एम्. ए. आहेत. महाराष्ट्रांतील एक उदयोन्मुख नाटककार आहेत. अन् उत्तम नटही आहेत!

प्रकाश : (स्मित करून) यांना नमस्कार करावयाच्या आधीं पहिल्यानं तुम्हालाच नमस्कार करूं काय डॉक्टर! अहो, काय हें!

डॉक्टर : आपण कांहीं तुमच्यासारखे साहित्यिक नाहींत, जें खरं आहे तेंच आपण सांगतों. या आमच्या उल्काताई—

[उल्का व प्रकाश परस्परांना नमस्कार करतात.]

वर्षा : (उठते) मी जातें आतां—उशीर झाला !

उल्का : थांब ना जरा—डॉक्टर, ही माझी लहानपणची जिवलग मैत्रीण, मिस् वर्षा जोशी, बी. ए., बी. टी.

डॉक्टर : (नमस्कार करीत) मी ओळखतों यांना. माझी थोरली मुलगी शिरीष यांच्याच वर्गांत आहे !

प्रकाश . (वर्षाला) नमस्कार म्हटलं मिस् वर्षा जोशी, बी. ए., बी. टी.

वर्षा . (त्याच थट्टेच्या स्वरांत) नमस्कार म्हटलं मिस्टर प्रकाश देसाई, एम्. ए., नट, —साहित्यिक अन् नाटककार !

उल्का : (हंसून) म्हणजे तुमची दोघांची ओळख आहे कीं काय ?

वर्षा : चांगलीच. अग, आपल्या वर्गांत ती कृष्णा कुलकर्णी होती ना ? तिचे हे आतेभाऊ !

उल्का : काय म्हणतेस !

वर्षा : तिच्यावरोवर पुष्कळ वेळां हे येत असत कीं आमच्या घरी ! माझ्या भावाची अन् यांची फार दोस्ती ! वरीच वर्षे झालीं आम्हांला आतां भेटून. म्हटलं ओळखताहेत कीं नाहीं बघावं.

प्रकाश अकल्पितच योगायोग आहे हा म्हणायचा ?

डॉक्टर . मघाशीं दवाखान्यांत तुम्हीं आला होता तेव्हांच मी बोलणार होतों. पण म्हटलं तिथं दवाखान्यांत बोलण्यापेक्षां इथं घरींच येऊन तुमच्याशी शांतपणें बोललेलं बरं !

वर्षा : (अर्धवट उठून) मी आंत जातें पाहिजे तर—

डॉक्टर : छे, छे, तसं खाजगी कांहीं नाहीं. उलट तुमच्यासारखी यांची बाळपणची मैत्रीण इथं आहे हें एका दृष्टीनें बरंच झालं. (प्रकाशकडे पाहून हंसतात). गोष्ट अशी आहे कीं, गरीब लोकांच्या मुलांसाठी इथं एक धर्मार्थ इस्पितळ उघडण्याचं कांहीं डॉक्टर मंडळींनीं ठरविलेलें आहे. मीही त्यांत आहेच. या इस्पितळाला लागणारे पैसे जमा करण्याकरतां निरनिराळ्या योजना आंखल्या आहेत आम्हीं—त्यामध्यें आमच्या या प्रकाशनीं अशी कल्पना काढली आहे—

प्रकाश . (मधेंच) मीच सांगतों. मीं एक नवीन नाटक लिहिलं आहे. सामाजिक आहे – दोन चार गाणींही आहेत त्यांत ! या नाटकाचा

क्र. १०८६९

प्रयोग आपण बसवावा आणि त्याच्या पांचसहा खेळांचें उत्पन्न या इस्पितळाला द्यावं असा एक विचार माझ्या मनांत आला आहे—अर्थात् या कामीं हौशी, सुविद्य पण नवा असा नटवर्ग मला मिळेल, तरच हें काम हाती घ्यावयाचें अशी माझी इच्छा आहे !

डॉक्टर : (मधेंच) स्वत: हें त्या प्रयोगांत नायकाची भूमिका करणार आहेत——

प्रकाश : आणि यांनी त्या नाटकांत माझ्या बापाची भूमिका करायचं कबूल केलं आहे .

उल्का : (हंसून) अस्सं ?

प्रकाश : आणखीही दोन तीन पदवीधर पुरुष नट आम्हाला मिळालेले आहेत; पण मुख्य अडचण आहे ती स्त्री नटी मिळण्याची !

डॉक्टर : त्यांतून गाणाऱ्या स्त्रिया मिळणं तर आजकाल अतिशय कठीण होऊन बसलं आहे ! आमच्या शिरीषला या नाटकांत काम करायला लावणारच आहे——

उल्का : तुम्ही म्हणतां तशी गाणारी बाई माझ्या तरी कांहीं माहीतीची नाहीं डॉक्टर !

डॉक्टर : आहे ना ! म्हणून तर आम्हीं तुमच्याकडे आलों आहोंत. काय हो प्रकाश ?

प्रकाश : (हंसून) यांच्या अगदीं चांगल्या माहितीची उत्तम गाणारीण, तडफदार आणि बुद्धिमान.

उल्का : (गोंधळून) म्हणतां काय तुम्ही ? कोण ती——नांव काय तिचं ?

डॉक्टर : सांगू ? तिचं नांव सौ. उल्का दिवाकर देशमुख !

उल्का : काय मी ! मी तुमच्या नाटकांत काम करूं म्हणतां (मोठमोठ्यानें हंसते) कमाल केलीत डॉक्टर ! माझ्यासारखी सांजसकाळ स्वयंपाक करणारी दोन मुलांची आई नाटकांत काम करूं लागली, तर तुमचं हें गरीब मुलांचें इस्पितळ राहील बाजूला, आणि माझ्यासाठीं एक वेड्याचं इस्पितळ बांधावं लागेल तुम्हांला !

डॉक्टर : तें पाहून घेऊं आम्ही !

उल्का : पण मला गातां येतं. अन् नाटकांत काम करतां येतें हें सांगितलें कोणी तुम्हांला ?

वर्षा मी बोलूं का ?

उल्का तू गप्प बैस यावेळीं !

प्रकाश : मग मी बोलतों. कृष्णा कुलकर्णी ही माझी मामेबहीण आहे हें आतांच यांनीं सांगितलं. ती तुमच्या वर्गांत होती.

वर्षा आतां आलं माझ्या ध्यानांत—

प्रकाश : त्यावेळीं कॉंग्रेस हाऊसच्या मदतीसाठीं मुलींनी 'सौभद्र' नाटकाचा प्रयोग केला. त्यांत तिनं सुभद्रेचें काम केलं आणि तुम्ही कृष्णाचं काम केलंत.

[उल्काचा चेहेरा एकदम विमनस्क होतो]

डॉक्टर . सांपडलांत कीं नाहीं आतां ? बोला, गप्प कां ? (वर्षाला) नाहीं तर तुम्हीं बोला हो ! का तुम्हीही त्या नाटकांत काम केलं होतंत ?

वर्षा (लाजून) मी—मी ? बळरामाचं काम केलं होतं—

उल्का (भान विसरून) 'दादा—दादा, गप्प बसायला काय घ्याल आतां ?' (एकदम उठते अन् 'सौभद्र' नाटकांतील 'लाल शाल जोडी' या पदाची पहिली ओळ मोठ्यानें म्हणते. नंतर भानावर येऊन एकदम डोळे मिटते आणि क्षणभर निश्चल उभी राहाते. पुन्हा डोळे उघडून) काय म्हणाले मी आतां ? डोकं तर फिरलं नाहीं माझं !

वर्षा (आवेशानें) डोकं नाहीं फिरलं—दहा वर्षांपूर्वीची ती तेजस्वी उल्का आतां जिवंत झाली होती ! गा—गा पुन्हां गा ! जिवंत होऊं दे ती उल्का ! दिपून जाऊं देत जगाचे पुन्हा डोळे !

उल्का (प्रज्वलित मुद्रेनें) खरंच गाऊं ! पुन्हां जिवंत होऊं— कोणतं गाणं म्हणू ?

वर्षा तें पिंजऱ्यांतल्या पांखराचं—

—शाळेंत म्हणत होतीस तें !

[डॉक्टर व प्रकाश उल्केचे तें तेज पाहून क्षणमात्र चकित होतात. उल्का गाऊं लागते. शिवा सुवासला घेऊन मागें येऊन उभा राहातो. उल्का गाणें गातांना आपलें भान विसरून जाते.]

ही गुलामगिरीची तोडूनि बेडी
मार भरारी मार. पांखरा.
मार भरारी मार !
स्वातंत्र्याची पुढें पसरली
दुनिया अपरंपार, पांखरा,
मार भरारी मार !
कां खाऊनि निर्जिव डाळिंबाचे दाणे.
कंठतोस अपुले जीवन लाजिरवाणें ?
विसरलास पहिल्या पराक्रमाचें गाणें !
जुलूमशाहिचा, अन्यायाचा जगांतला अंधार
मावळला रे ऊठ पांखरा,
मार भरारी मार !

उल्काचें गाणें संपतें आहे तोंच दार उघडून दिवाकर एकदम आंत येतो. दिवाकराला पाहातांच उल्का एकदम बिचकून उभी राहाते. शिवा मागल्या-मागें घरांत जातो. दिवाकर दारांतल्या दारांतच थबकतो आणि कठोर मुद्रेनें सभोंवार दृष्टि फिरवितो. डॉक्टरांची पाठ दाराकडे असते. उल्का उभी राहिलेली पाहून ते मागें वळून पाहातात.

डॉक्टर : (दिवाकराला बघून) अरे, आलात का ? या–या–

दिवाकर (एक पाऊल पुढें टाकून) माझंच घर आहे ना हें ?

डॉक्टर म्हणजे—

दिवाकर गाणं ऐकूं आलं म्हणून जरा भ्रम पडला. म्हटलं माझ्याच बिऱ्हाडांत पाऊल टाकतो का चुकून कुठल्यातरी—

डॉक्टर : (रागानें) बाहेरून आलांत कीं काय दिवाकर ? सूर्य मावळायला अजून अवकाश आहे !

दिवाकर : शनिवारीं मी घेत नसतों डॉक्टर—

डॉक्टर तेवढा वार तरी पाळतां म्हणायचा !

उल्का [पुढचा एकंदर रंग ओळखून वर्षाला अस्वस्थपणें] तू जा आतां वर्षा, उशीर होईल तुला !

दिवाकर (वर्षाकडे अनोळखी दृष्टीनें बघून) याच गात होत्या कीं काय आतां ?

उल्का नाहीं--मी गात होतें. ही माझी बाळपणची मैत्रीण वर्षा जोशी--

दिवाकर . नमस्कार (वर्षा त्याच्याकडे पहातसुद्धां नाहीं) तूं गात होतीस ?

डॉक्टर : फारच सुदर गातात त्या !

दिवाकर . अस्सं ?

डॉक्टर . म्हणजे, इतक्या वर्षांत तुम्ही यांचं गाणं ऐकलं नाहींत दिवाकर ?

दिवाकर आमचा रेसचा धंदा तुम्हाला माहीत नाही डॉक्टर ! अन्न खायला आम्हाला फुरसत नसते ! घरांतल गाणं ऐकायला इथं वेळ आहे कुणाला ?

प्रकाश (खोचून) मग बाहेरचं गाणं ऐकण्याचा नाद आहे वाटतं आपल्याला !

दिवाकर : (चमत्कारिक दृष्टीनें प्रकाशकडे बघून) ओळखलं नाहीं मी आपल्याला !

प्रकाश मी आतांच आपल्याला ओळखलं ! माझं नांव प्रकाश देसाई--डॉक्टर अन् मी आपल्याकडेच आलों होतो !

दिवाकर : (उल्केकडे पहात) माझ्याकडे !

प्रकाश आपणा दोघांकडे (उल्केला) आपण बसा ना जरा !

दिवाकर . (उल्केला) घरांत जा ! (तशी वर्षा उठूं लागते) नाहीं आपण बसा--(वर्षा अस्वस्थपणें बसते, उल्का घोटाळते) मला चहा पाहिजे आहे !

(उल्का घरांत जाते. प्रकाशला) बोला--

डॉक्टर : (क्षणभर थांबून) मी सांगतों--इथं गरीब मुलांचं एक नवीन इस्पितळ उघडायचं ठरविलें आहे आम्हीं. त्याच्या मदतीसाठीं या प्रकाशनीं लिहिलेल्या एका नाटकाचा प्रयोग बसविण्याचा विचार आहे आमचा !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 26650 दि: 17.6.66
क्रमांक 92210 नों दि: 26.6.66


दिवाकर : (मधेंच) तेव्हां या नाटकांत माझ्या बायकोनं काम करावं अशी तुमची इच्छा आहे––

डॉक्टर : (हंसून) तुम्हीं परवानगी दिलीत तर––

दिवाकर : मी परवानगी दिली तर––अरे वा ! (थांबून) ती काय म्हणाली ?

प्रकाश : तुम्हांला विचारल्याखेरीज त्या काय करणार ?

दिवाकर : कांहीं म्हणाल्या नाहींत त्या ! हं ? फक्त गाणंच म्हणाल्या वाटतं !

वर्षा : मी आग्रह केला तिला––

दिवाकर : (प्रकाशला उद्देशून, डॉक्टरला) हे काम करणार आहेत का ?

प्रकाश : मी ? मी नायकाची भूमिका करणार आहे त्या नाटकांत––

दिवाकर : उत्तम––मग आपलं लग्न नसेलच झालं !

प्रकाश : नाहीं––कां ?

दिवाकर : वाटलंच मला––

डॉक्टर : (मधेंच) हें गातात फार उत्तम ! म्हणा हो प्रकाश तें तुमचं गाणं ! म्हणजे याचं डोकं तरी थोडंसं शांत होईल !

दिवाकर : छे, छे, मला गाणं मुळींच आवडत नाहीं !

प्रकाश : (हंसून) माझं खास आवडेल ! ऐका तर खरं तुम्हीं !

प्रकाश गाणें सुरू करतो.

ललना देवता जगाची,
भूषवि संसाराला !
नभीं जशि चंद्रिका,
हांसरी तारका.
स्त्री तेवि जगताला !

दिवाकर अत्यंत अस्वस्थ होतो. प्रकाशचें गाणें उल्का आंतून ऐकते. त्या जाणिवेनें दिवाकर अधिकच चिडतो. गाणें संपल्यावर–– ]

डॉक्टर : बोला, कसं गातात हे ? बरं का दिवाकर मी देखील या नाटकांत लहानशी भूमिका करणार आहे.

दिवाकर : (एकदम डॉक्टरकडे वळून) काय हो डॉक्टर, हल्लीं शहरांतली रोगराई अन् आजार थांबले वाटते सारे ?

डॉक्टर : कशावरून म्हणतां ?

दिवाकर : त्याखेरीज का तुम्हांला स्वत:चा धंदा सोडून हे असले धंदे करायला वेळ मिळतो !

डॉक्टर : (जरा रागावून) सार्वजनिक कार्य आहे हें ?

दिवाकर : मग सार्वजनिक कार्यासाठीं सार्वजनिक बायका आणून का नाचवीत नाहींत तुमच्या नाटकांत ! घरगुती बायकांच्या कशाला मार्गे लागला आहांत तुम्ही !

प्रकाश : (चिडून) हौशी स्त्री-पुरुषांची नाटकं काय असतात हें माहीत आहे का तुम्हाला ?

दिवाकर : उत्तम माहीत आहे ! धर्मार्थ कार्याच्या नांवावर हौशी आणि कुलीन स्त्री-पुरुषांची होणारी हीं नाटकं म्हणजे लग्नाच्या बायका घरांतून काढून नेण्याचा एक धंदा झाला आहे राजरोस !

प्रकाश : (एकदम उठून) उठा डॉक्टर—!

दिवाकर : माझ्या बायकोला मी नाटकांत काम करून देईन असं वाटतं कसं तुम्हांला—समजतां कोण तुम्हीं मला ! भाई दीनानाथसारख्या प्रसिद्ध पुढाऱ्यांची मुलगी आहे ती—माझ्यासारख्या एका घरंदाज आणि अब्रूदार गृहस्थाची धर्मपत्नी आहे ती—तोंडाला रंग फांसून वाटेल त्या उडाणटप्पूबरोबर ती नाचूं लागली तर जग काय म्हणेल, समाज काय म्हणेल, लोक काय म्हणतील !

[आंतून उल्का दारांत येते]

उल्का : (व्यथित स्वरांत) जा ना तुम्ही डॉक्टर—

दिवाकर : (तिला ओरडून) आंत जा तूं. . . (ती जाते) मी घरांत नसतांना इथं येऊन खुशाल माझ्या बायकोला गाणीं म्हणायला लावतां—तिला नाटकांत घेऊन जाण्याचीं कारस्थानं करतां—

डॉक्टर : मी फॅमिली डॉक्टर आहे तुमचा ! असले घाणेरडे आरोप करायला तुम्हाला शरम वाटली पाहिजे— चला प्रकाश—

[दोघे निघून जातात. दिवाकर आंतून दार लावतो].

दिवाकर : (पुटपुटत) म्हणे नाटकांत काम करा. लग्नाच्या बायका जशा कांहीं वाटेवर पडल्या आहेत ! (वळून वर्षाकडे पहातो. त्याच्या चेहेऱ्यावरचा क्रोधाचा आविर्भाव एकदम नाहींसा होतो. सस्मित मुद्रेनें तो वर्षाकडे पाहूं लागतो. आणि एकदम मृदु आवाजांत तिला संबोधित पुढें येतो.) वर्षा–वर्षा––

वर्षा : (कठोर मुद्रेनें त्याच्याकडे पहात.) लग्नाच्या बायका वाटेवर पडलेल्या नसतात आणि बिनलग्नाच्या बायका वाटेवर पडलेल्या असतात काय ?

दिवाकर . (तोंडावर बोट ठेवून हलक्या आवाजांत मोठ्यानें) बोलूं नकोस––ऐकेल ती––तूं खालीं चल––

वर्षा · (पूर्वींच्या आवाजांत) अरे वा, बायकोला कधींपासून भ्यायला लागलांत ?

दिवाकर . माझ्यासाठी मी भीत नाहीं ! तुझ्यासाठीं मी भितोय ! तुझ्यावर माझें प्रेम आहे हें जर तिला कळलें, तर ती तुला घरांत पाऊल टाकूं देणार नाहीं पुन्हां.

वर्षा : मोठ्यानें बोला–मोठ्यानें बोला––तुमच्या बायकोला ऐकू द्या आंत––माझ्यावर तुमचं प्रेम आहे काय ? आणखी कोणकोणावर तुमचं प्रेम आहे ? हें लग्न व्हायच्या आधीं ती––

दिवाकर : मी तुझ्या पाया पडतो––

वर्षा : (मोठ्यानें) उल्का––ए उल्का––

दिवाकर · (एकदम क्रुद्ध स्वरांत) विचार काय आहे तुझा ?

वर्षा : तुमच्या प्रेमाचें विश्वदर्शन तुमच्या बायकोला घडविणार आहे मी आज !

दिवाकर . (तिच्या अंगावर धावून जातो) तू एक शब्द तर बोल––

वर्षा : (आणखी मोठ्यानें) उल्का––

दिवाकर : (टोपी घ्यावयास जातो). चाललो मीं––वेळ कुठं आहे मला ?

[घाईघाईनें जाऊं लागतो.]

वर्षा : (त्याला अडवून ) चाललात कुठं ? थांबा तिथं ! (दिवाकर गोंधळून आंतल्या दाराकडे बघतो. तोंच उल्का आंत येते. तिला पाहातांच

दिवाकराला काय करावें हें सुचत नाहीं.) इकडे ये उल्का ! मघांशी जें तुला सांगायचें मला धैर्य झालें नाहीं तें आतां मी तुला सांगणार आहे. आश्चर्य वाटेल तुला---वाईट वाटेल तुला---पण त्याला माझा नाईलाज आहे.

(दिवाकर स्वत:शीं उगाच मोठ्यानें हंसतो) .

गेल्या सहा महिन्यापासून तुझ्या या नवऱ्यानें माझा छळवाद मांडलेला आहे !

दिवाकर :---खोटं आहे---माझी हिची ओळख देखील नाहीं.

वर्षा (बॅगमधून पत्रांचा गठ्ठा उकलून उल्काला देते) हा त्याचा पुरावा. सहा महिन्यांत माझ्या शाळेच्या पत्त्यावर एवढीं पत्रें पाठविलीं यांनी मला ! आजपर्यंत मी या पत्रांकडे दुर्लक्ष केलें---त्यांतल्या एकाहि पत्राला मी उत्तर दिलं नाही, म्हणून आमच्या हेडमास्तरीणबाईंना माझ्याविरुद्ध वाटेल तीं निनांवी पत्रें पाठवायला यांनीं आतां सुरुवात केली आहे. अगदीं नाईलाज झाला म्हणूनच मी आज तुझ्याकडे आलें. आतां मात्र मी हें माझ्या रक्षणासाठीं तुला सांगत नाहीं---तुझ्या उद्धारासाठीं तुला सांगतें---तुझ्या संसाराचा हा अध:पात मला पाहवत नाहीं---उल्का.

उल्का . (तिच्या चेहऱ्यांत एकदम कांहींतरी बदल होऊं लागतो. गंभीर आवाजानें) तूं जा—

(वर्षा कांहीं बोलणार---) आलं माझ्या लक्षांत ---जा तूं---

[वर्षा निघून जाते. दिवाकर अत्यंत अस्वस्थ होतो. उल्काचें गांभीर्य बघून त्याच्या छातींत भीतीची धडकी भरते.]

दिवाकर (विषय बदलण्याच्या हेतूनें) सुवास दिसत नाहीं तो ? सुवास–ए सुवास ! पुष्पा झोपली आहे का रे शिवा ? घरांत आलों आणि मुलांच्या हंसण्याचा आवाज ऐकला नाहीं म्हणजे कसं चमत्कारिक वाटतं ! (तरी उल्का उत्तर देत नाहीं. हातांत तो पत्रांचा गठ्ठा घेऊन ती एकसारखी त्याच्याकडे पहात आहे. कसल्या तरीं समाधींत आहे ती. दिवाकर त्यामुळें चिडल्यासारखा होतो. तो टेबलाकडे जातो. कपाटांतून व्हिस्कीची बाटली काढून ती टेबलावर ठेवतो. तिच्यांतला एक पेग ग्लासमध्यें ओतून पितो. थोड्या वेळानें) इकडं आण तीं पत्रं !

उल्का · (यांत्रिकपणें त्याला पत्रें देतें. नंतर भानावर येऊन शांतपणें)

शिवा—(शिवा आंतून येतो.) मी आतां जाऊन आलें हं कोपऱ्यापर्यंत—

दिवाकर : (रागानें) कुठं चाललीस ?

उल्का : (शांतपणें) डॉक्टरना सांगून येतें—

दिवाकर (अधिक रागानें) काय सांगून येतेस डॉक्टरना—

उल्का : मी त्यांच्या नाटकांत काम करणार आहे म्हणून !

दिवाकर · (ओरडून) काय नाटकांत काम करणार तूं ! माझ्या परवानगीवांचून—

उल्का (संतापाचा तिला झटका येतो. एकदम आवाज चढवून) मी नाटकांत काम करायला तुमची परवानगी घेऊं ? अन् (त्यांच्या हातांतली पत्रें खसकन् ओढून घेत) हें बदफैलीपणाचें प्रदर्शन एका स्त्रीपुढें करायला तुम्हीं आपल्या बायकोची परवानगी घेतली होतीत का ?

दिवाकर . (क्षीण आवाजांत) चुकलं माझं—

उल्का घरांतलं अमृत लाथाडून बाहेर शेण खायला लाज वाटली नाहीं तुम्हाला ! बायकोशीं निमकहरामी करून फिरून तिलाच धमकावण्या देतां ? पाय धरा आणि नाक घासा माझ्यापुढं (दिवाकर घोटाळतो.) पडा पाया—

[दिवाकर पाया पडू लागतो तोंच शिवा आंतून चहा घेऊन येतो].

दिवाकर (चिडून) कशाला आलास इथं ! चालता हो इथून ! नाहीं पडत पाया ! म्हणे पाया पडा ! बायकोच्या पाया पडायला मी कांहीं शेणामेणाचा नवरा नाहीं ! जोंपर्यंत तू माझी बायको आहेस तोंपर्यत मी माझ्या परवानगीवांचून तुला कांहीं करूं देणार नाहीं—कुठं जाऊं देणार नाहीं.

उल्का या घरांतलं तुमचं राज्य मघाशींच संपलं—या ॲटमबॉंबनं तुमची नवरेशाही पार आभाळांत उडून गेली.

[विकटपणें हसते]

दिवाकर : झालंय काय तुला आज ? कसला जोर चढला आहे—कसली मस्ती आली आहे तुला ?

उल्का : ही मस्ती माझ्या रक्तांत आहे. हा उद्दामपणा माझ्या धमन्यांत आहे. भांडवलशाहीविरुद्ध युद्ध पुकारणाऱ्या मग्रुर बापाची मी मुलगी आहें

कलेक्टर कचेरीच्या कौलारावर तिरंगी झेंडा चढविणारी मी माथेफिरू पोरगी आहे. आठ वर्षांपूर्वी कायदेभंगाच्या लढाईंत आघाडीवर लढलेली मी एक सैनिक आहे. तुरुंगांतून बाहेर पडलें तेव्हां मी वाघीण होतें––जगांतल्या साऱ्या जुलूमशाहीचं नरडं फोडायची ताकद होती माझ्यांत. तुमच्या खोटचा दहशतवादाचं आणि प्रेमाचं जाळं त्यावेळीं तुम्ही माझ्याभोंवतीं फेकलेंत आणि आपल्या संसारांतल्या गोठ्यांतली मला गाय करून टाकलीत ! नोकरशाहीच्या तुरुंगांतून सुटलें आणि नवरेशाहीच्या तुरुंगांत अडकून बसलें. माझ्या बालपणींच्या मैत्रिणीनं आज मला यांतून सोडविलं ? आज मी जिवंत झालें––स्वतंत्र झालें––सात वर्षे तुम्ही दडपून ठेवलेलीं माझी कला, माझी प्रतिभा, माझं सामर्थ्य, आतां मी जगाला दाखविणार आणि थक्क करून सोडणार ! चाललें मी––

[बेहोषपणें दरवाजाकडे धांव घेते.]

९

# ‘ कमला ’ काव्याचा कलावंत गेला

[मराठींतील पहिल्या श्रेणीचें सुप्रसिद्ध कवि ‘बी’ यांच्या ‘ फुलांची ओंजळ ’ या कवितासंग्रहाला आचार्य अत्रे यांनीं लिहिलेली प्रस्तावना ही मराठींतील उत्कृष्ट प्रस्तावनांपैकीं एक समजली जाते. ‘ बीं ’च्या प्रतिभेचें आणि त्यांच्या काव्याचें अत्यंत सूक्ष्म आणि मार्मिक विवेचन या प्रस्तावनेंत अत्र्यांनी केलें आहे. ‘बी’ कवींच्या निधनानंतर अत्र्यांच्या प्रभावी लेखणींतून उतरलेला हा मृत्यूलेखही त्यांच्या प्रस्तावनेइतकाच उल्लेखनीय आहे.]

* * *

‘ बी ’ या अद्‌भुतरम्य नांवानें गेलीं तीस बत्तीस वर्षें मराठी कवितेच्या रसिकांना सुपरिचित असलेले महाराष्ट्राचे एक अत्यंत प्रतिभाशाली कवि श्री. नारायण मुरलीधर गुप्ते हे शुक्रवार दि. २९ ऑगस्ट रोजीं दिवंगत झाले, हें कळविण्यास आम्हांला अत्यंत दुःख होत आहे. रे. टिळक, तांबे, चंद्रशेखर, लेंभे, गोविंदाग्रज, रेंदाळकर, नागेश आणि बालकवि ठोमरे यांच्या काळांतील ‘ बी ’ हे नामांकित कवि होते. आजच्या काळांतही नव्या दमाचे आणि उज्ज्वल प्रतिभेचे अनेक नवनवीन तरुण कवि उदयाला आलेले असले तरी ‘ बी ’ कवीच्या तोलाचा आणि दर्जाचा त्यांमध्यें एकही कवि आढळणार नाही हें सत्य आहे. ‘ बी ’ कवींच्या निधनानें मराठी कवितेचें फारच मोठें नुकसान झालेलें आहे यांत मुळींच शंका नाही. ‘ बी ’ कवींना ओळखणारीं

अशीं माणसें महाराष्ट्रांत फारच थोडी निघतील. सार्वजनिक जीवनामध्यें त्यांनीं कधींही भाग घेतला नाहीं. स्वतःच्या काव्याला किंवा नांवाला चारचौघांत प्रसिद्धि मिळावी अशी त्यांनीं कधींही हांव धरली नाहीं. त्यांचा सारा जन्म लहान सहान गांवांत सरकारी नोकरी करण्यांत गेला. कोणत्याही कवींच्या मेळाव्यांत किंवा साहित्यसंमेलनांत त्यांनीं कधीं भाग घेतलेला नाहीं. आपल्या मधुर गुजारवानें त्यांनीं महाराष्ट्राला जेव्हां वेडें केलें तेव्हां देखील आपल्या नांवनिशीचा किंवा ठावठिकाणाचा त्यांनीं कोणाला पत्ता लागूं दिला नाहीं. आजही 'बी' कवींना जे ओळखतात त्यांना त्यांचें संपूर्ण नांव काय आहे हें देखील सांगतां येणार नाहीं. आपलें लौकिक अस्तित्व जगापासून इतक्या कटाक्षानें लपवून ठेवणारा 'बी' एवढा महान् कवि महाराष्ट्रामध्यें आजपर्यंत दुसरा कोणीहि होऊन गेला नाही. गोविदाग्रजांना भेटण्यासाठीं एकदां ते आपण होऊन पुण्याला आले होते एवढीच त्याच्या प्रकटीकरणाची एक गोष्ट मला माहीत आहे. मरणसमयीं त्यांचें वय शहात्तर वर्षांचें होतें. गेली सात आठ वर्षें ते मध्यप्रांतांत छिंदवाडा येथें आपल्या जांवयाच्या घरांत राहात असत. आयुष्याच्या अखेरीअखेरीस ते अतिशय थकलेले होते. त्यांना डोळयांनीं नीट दिसत नव्हतें. तथापि अशा अवस्थेंतहि त्यांची काव्यप्रतिभा त्यांना सोडून गेली नव्हती. दगडी पाटीवर मोठयामोठया अक्षरांमध्यें आपल्या लहान नातवांकडून ते आपल्या कविता लिहवून घेत. अगदीं गेल्या मे महिन्यापर्यंत त्यांचें हें काव्यलेखन चालूं होतें. त्यांनीं अलिकडे लिहिलेल्या कांहीं कविता 'युगवाणी' मासिकांत प्रसिद्ध झालेल्या पुष्कळांनीं वाचल्याही असतील.

मराठी काव्याच्या प्रांगणांत 'बी' कवींनी 'वेडगाणें' ही कविता लिहून पदार्पण केलें. त्याची आठवण अजूनही माझ्या मनांत जागी आहे. 'बी' हें इंग्रजी नांव धारण करून मराठी कविता लिहिणारा हा कवि कोण आहे याबद्दल रसिकांना जेवढें आश्चर्य आणि कौतुक वाटलें, त्यापेक्षांही त्यांनीं लिहिलेली ही पहिलीच हृदयंगम कविता वाचून त्यांची अंतःकरणें अधिक हर्षित झाली. क्षितिजावर उगवल्याबरोबर एकाद्या तेजाळ ताऱ्यानें आपल्या किरणांनीं लोकांचीं मनें आकर्षून घ्यावींत, तसें 'बी' कवींनीं आपल्या पहिल्याच गुंजनानें लोकांचीं मनें आणि समकालीन कवींचें लक्ष

आपल्याकडे एकदम ओढून घेतलें. रे. टिळकासारखा कविश्रेष्ठ तर 'बी' कवींवर इतका खूष होऊन गेला कीं त्यानें 'बी' कवींना उद्देशून एक अतिशय सुंदर कविता लिहिली. 'बी' कवींच्या बहुतेक सर्व कविता त्यावेळच्या मासिक 'मनोरंजन' मध्यें प्रसिद्ध झाल्या. संख्येच्या मानानें आणि इतर कवींच्या तुलनेनें त्यांच्या कविता अतिशय थोडया आहेत. ते फारच थोडें लिहीत. पण जें लिहीत त्यांतील अक्षरन् अक्षर, शब्दन् शब्द बावनकशी सोनें असे. 'बी' कवि जेव्हां कविता प्रसिद्ध करूं लागले, तो मराठी कवितेच्या ऐन बहारीचा काळ होता. गोविंदाग्रज, ठोमरे, रेंदाळकर, तांबे आणि नागेश यांच्या एकाहीपेक्षां एक सुंदर कविता त्यावेळीं प्रसिद्ध होऊं लागल्या होत्या. गोविंदाग्रजांच्या आणि बालकवि ठोमऱ्यांच्या कवितांनीं तर रसिकांना वेडच लावलें होतें. अशा बिकट चढाओढीच्या कालामध्यें एकाद्या नव्या कवीनें प्रकट होऊन वाचकांच्या मनावर आपली स्वतंत्र छाप बसविणें हें अतिशय कठीण होतें. पण तें अवघड काम 'बी' कवींनीं सहज लीलेनें करून दाखवलें. तसें 'बी' कवि आपल्या समकालिनांपेक्षां त्यावेळीं वयानें कांही लहान नव्हतें. गडकऱ्यांपेक्षां तेरा-चौदा वर्षांनीं ते मोठे होते. त्यांचा व्यासंग आणि चिंतन दुसऱ्या कोणत्याही कवीपेक्षां कमी नव्हतें. मराठी भाषेवर तर 'बी' कवींचें विलक्षण प्रभुत्व होतें. 'बी' कवीइतकी सोपी, सुंदर आणि सोज्वल मराठी भाषा त्यांच्या पिढींतल्या तुल्यबळ समकालिनांना देखील साधली नाहीं. गडकऱ्यांच्या लिखाणांतला कृत्रिम नटवेपणा 'बी' कवींच्या काव्यांत आढळून येत नाहीं. 'बी' कवींची कविता अस्सल मराठी ढंगाची आणि वळणाची होती. तांबे आणि बालकवि यांचें काव्य सोपें आणि सुबोध होतें हें खरें. पण 'बीं' च्या कवितेचा अभिजात डौल त्यांच्या काव्यांत दिसून येत नाहीं. 'बी' कवींच्या शैलीला परंपरा आहे. जुन्या मराठी संत कवींच्या अभंगवाङ्मयाचा आणि जातिवंत शाहीरांच्या लावण्यांचा व पोवाडयांचा मार्मिक अभ्यास करून 'बी' कवींनीं आपली शब्दसंपदा कमावलेली होती. त्यांच्या कवितेमधली कोणतीहि एकादी ओळ जर घेतली तरी तिच्यांत असामान्य कलावंतांची महजता आणि प्रभुत्व आढळून आल्यावांचून रहात नाहीं.

मराठी काव्यामध्यें 'बी' कवींचें स्थान अवघ्या दोनच कवितांनीं अढळ केलेलें आहे. या दोन कविता म्हणजे 'चांफा' आणि 'कमला'. 'चांफा बोलेना, चांफा हालेना, चांफा खंत करी, कांहीं केल्या फुलेना,' या अविस्मरणीय ओळींनीं सुरू झालेली 'बी' कवींची 'चांफा' ही कविता म्हणजे मराठी काव्याचें एक अमर भूषण आहे. 'बीं'च्या 'कमले'ला तर मराठी भाषेमध्यें दुसरी तोडच नाहीं. ज्यांना 'बी' कवींच्या प्रतिभेचें सामर्थ्य समजावून घ्यावयाचें असेल त्यांनीं त्यांची ही एकच कविता वाचावी आणि वाचून तोंडपाठ करावी. मी स्वत: गेलीं तीस वर्षें 'बी' कवींची ही 'कमला' कविता स्वत:शी गुणगुणतों आहें. तरी देखील माझ्या मनावरची तिची मोहिनी अजून एवढीशी सुद्धां कमी झालेली नाहीं. 'कमला' काव्य हा कवीच्या प्रतिभेचा एक महान् चमत्कार आहे. अशी कविता प्रत्येक वाङ्मयामध्यें फारच थोड्या जन्माला येतात. जे कवि या अद्‌भुत कविता लिहितात, त्यांना पुन्हा तशा कविता क्वचित्‌च लिहितां येतात. प्रतिभेच्या एका विशिष्ट समाधीच्या अवस्थेमध्यें अशा कवितांचा जन्म होतो. 'बी' कवि हे स्वभावत: चिंतनपर कवि होते. त्यांची बहुतेक कविता ही तात्त्विक आहे. काव्यामध्यें एकादी भावनापूर्ण गोष्ट सांगणें हा त्यांच्या प्रतिभेचा सहजस्वभाव नव्हे. असे असतां 'कमला' सारखी करुण रसानें ओथंबलेली कथात्मक कविता इतक्या उत्कृष्टपणें त्यांना कशी लिहितां आली ह्याचें मला राहून राहून आश्चर्य वाटतें! साखरेचा कणन् कण जसा गोड असतो किंवा अमृताचा थेंबन् थेंब जसा मधुर असतो तशी 'कमला' काव्यांतली ओळन् ओळ, शब्दन् शब्द आणि अक्षरन् अक्षर अवीट माधुर्यानें रसरसलेलें आहे. त्या काव्याची रचना इतकी घोसदार आणि चिरेबंदी आहे कीं, त्यामध्यें एक अक्षर इकडचें तिकडे फिरवतां येणार नाही. थोरातांच्या 'पाक' कुळांत जन्माला आलेली 'कमला' संभाजीची 'राख' होण्यापेक्षां मृत्यूच्या गळ्यांत माळ घालणें कसें पत्करते, हें एका बाणेदार मराठा मुलीचें तेजस्वी चित्र 'बी' कवींनीं आपल्या ओजस्वी लेखणीनें या कवितेंत रंगविलेले आहे. ही कविता ज्यावेळीं प्रसिद्ध झाली त्यावेळीं तिच्या तेजानें साऱ्या महाराष्ट्राचे डोळे अक्षरश: दिपले. आणि अद्यापही ही कविता जो कोणी वाचील तो तिच्या प्रभावानें स्तिमित झाल्यावांचून रहाणार नाहीं! एकेका मराठी

कवीची एकेकच प्रातिनिधिक कविता निवडावयाचे ठरविल्यास गोविंदाग्रजांची ‘राजहंस’ किंवा बालकवींची ‘फुलराणी’ यांच्याबरोबर ‘बी’ कवींच्या ‘कमले’ चाहि अवश्य अंतर्भाव करावा लागेल.

‘बी’ कवींची सर्वच कविता सोज्वळ असली तरी ती सोपी नाहीं. त्यांचें काव्य रुक्ष किंवा क्लिष्ट असें कुठेंच नाहीं. तथापि तें कळावयास कुठें कुठें अवघड आहे ह्यांत मुळींच शंका नाहीं. याचें कारण ‘बी’ कवि हे तत्त्वज्ञानी कवि होते. त्यांचा योगविद्येचा आणि अध्यात्माचा अभ्यास मोठा होता. तसें त्यांचें सर्वच आयुष्य ईश्वरचिंतनांत आणि योगाभ्यासांत गेलें. साधुपुरुषांचा त्यांच्या घराण्यावर आशिर्वादच होता असें म्हटलें तरी चालेल. त्यांचे धाकटे बंधु जन्मापासून दोन्ही पायांनीं पूर्णपणें पांगळे असूनही योगविद्येंत त्यांनीं अलौकिक सामर्थ्य प्राप्त करून घेतलें होतें. श्री गजानन महाराज म्हणून ते पुष्कळच प्रसिद्ध होते. गेल्याच वर्षीं नाशिक येथें ब्रह्मीभूत झाले. गजानन महाराजांना योगाभ्यासाची पुष्कळशी स्फूर्ति ‘बी’ कवींकडून मिळाली. यावरून या क्षेत्रांत ‘बी’ कवींनीं केवढें सामर्थ्य प्राप्त करून ठेवलें असावें याची थोडीशी कल्पना येते. यामुळेंच अध्यात्मविद्येंतलीं पुष्कळशीं रूपकें आणि भाषासंकेत त्यांच्या कवितेमध्यें आढळून येतात. तथापि इतकें असूनही ‘बीं’ च्या विचारांत कोठेंहि जुनाटपणा किंवा प्रतिगामित्व आढळून येत नाहीं. ‘बी’ हे वृत्तीनें उत्क्रान्तिवादी होते. समाजविघातक रूढींचा आणि संस्थांचा नायनाट होऊन जनता सामर्थ्यवान् व्हावयाला पाहिजे असें त्यांना मनापासून वाटत होतें. या दृष्टीनें पहातां विचारांचे हे आधुनिकत्व रे. टिळक यांच्याखेरीज त्यावेळच्या इतर कोणत्याहि कवींत आढळून येत नाहीं. जुन्या पिढींत जन्माला आलेला मनुष्य विचारानें आणि वृत्तीनें इतका आधुनिक कसा याचें आम्हांला पुष्कळ वेळां नवल वाटतें. इतकी वर्षे झालीं तरी ‘बी’ कवींच्या काव्याचा उजाळा व लकाकी आहे तशींच अजून कायम आहे. ‘बीं’ च्या काव्याचें हें वैशिष्टय फारच थोडया आधुनिक मराठी कवींमध्यें आढळून येईल. खरोखर मराठी काव्यसृष्टींत ‘बी’ कवींचें स्थान अगदीं अढळ आणि अमर आहे.

व्यक्तिशः माझा आणि ‘बी’ कवींचा आयुष्यांत संबंध येणें हा मी अद्भुत योगायोग समजतों. दहा वर्षांपूर्वी ‘फुलांची ओंजळ’ हा त्यांचा

काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्याचें जेव्हां त्यांच्या मित्रांनीं ठरविलें तेव्हां त्या संग्रहाला प्रस्तावना देण्यासाठीं त्यांना माझें नांव कां सुचलें हें मला ठाऊक नाहीं. 'बी' सारख्या महान् कविश्रेष्ठाच्या कविता-संग्रहाला प्रस्तावना लिहिण्याला आपल्याला अधिकार आहे असें मला चुकूनही कधीं वाटलें नाहीं. मला त्यांच्या काव्याविषयीं किती आदर वाटत होता हें शब्दांनीं वर्णन करतां येणार नाहीं. माझे गुरु जे गडकरी ते 'बी' कवींना जवळ जवळ गुरूप्रमाणें मानीत. या हिशेबानें 'बी' कवि मला परात्पर गुरूच्याच ठिकाणीं होते. त्यांच्या काव्याला प्रस्तावना लिहिणें म्हणजे मंदिराच्या पवित्र पायरीला पाय लावण्याइतकेंच पातक आहे अशी माझी प्रामाणिक समजूत होती. या भावनेनें एकसारखा सहा महिनेपर्यंत मी त्या प्रकाशकांना नकार देत होतों. पण माझ्या नकाराच्या हेक्यामुळें त्यांच्या आग्रहाचें दडपण अधिकच वाढत गेलें. ते म्हणाले, "तुमची प्रस्तावना मिळेपर्यंत आम्ही हें पुस्तक प्रसिद्ध करणार नाहीं." एवढें त्यांनीं म्हटल्यानंतर मग या पवित्र जबाबदारीचा पत्कर न घेणें हा शुद्ध उन्मत्तपणा होता. प्रस्तावना लिहिण्याचें काम तर मी स्वीकारलें, पण तें माझ्या हातून पुरें कसें होणार याची मात्र मला फार चिंता पडली. 'बी' कवींची कविता मीं वाचली होती. ती मला अतिशय आवडत होती. पण तिच्यांतलीं सर्वच स्थळें मला कळत होतीं असें मात्र मुळींच नव्हतें. 'बीं' च्या काव्याचें हें एक वैशिष्टय आहे. तें कळत नसलें तरी आपल्याला वेड लावतें. सृष्टीमधल्या पुष्कळशा सौंदर्याचें रहस्य समजलें नाहीं तरी जसें मनाला मोहित करतें तसें 'बीं' च्या काव्याचें आहे. 'चांफा' ही त्यांची एकच कविता घ्या. या कवितेचा सर्व अर्थ लक्षांत आला नसतांही महाराष्ट्र तिजवर बेहद्द खूष झालेला होता. पण प्रस्तावनाकाराचें कार्य हें केवळ रसग्रहणाचें कार्य नव्हे. कोणत्या काव्यामध्यें काय गोडी आहे आणि ती कशी उत्पन्न झाली याचें कलात्मक आणि रसपूर्ण विश्लेषण जर त्याला करतां आलें तरच तो खरा प्रस्तावनाकार ठरतो. या दृष्टीनें जवळ जवळ दोन महिने 'बी' कवींशी माझा पत्रव्यवहार चालू होता. दर पत्रांत मी त्यांच्या काव्याबद्दल अनेक प्रश्न आणि शंका विचाराव्यात आणि त्याला पानेंच्या पानें विस्तृत उत्तरें 'बी' कवींनी मला द्यावींत. अशा रीतीनें 'बी' कवींकडूनच मी त्यांची सारी कविता समजावून घेतली. त्यांची कविता आपल्याला समजली असें मला ज्या क्षणीं वाटलें त्या क्षणापासून मी प्रस्तावना

लिहिण्याचें काम सुरू केलें. एवढी मोठी प्रदीर्घ प्रस्तावना मी आयुष्यांत दुसऱ्या कुठल्याहि पुस्तकाला लिहिलेली नाहीं. ही माझी प्रस्तावना फारच चांगली वठली आहे असें लोक म्हणतात. हें जर खरें असेल तर त्याचें श्रेय 'बी' कवींना आणि त्यांच्या महान् काव्यालाच द्यायला पाहिजे. स्फूर्तीचा विषय अलौकिक असला म्हणजे सामान्य माणसाच्या हातूनही कधीं कधीं असामान्य गोष्टी घडतात !

यानंतर दोन वर्षांनीं म्हणजे एकोणिसशेंचाळीस सालीं मी जेव्हां नागपूर येथें गेलों तेव्हां 'बी' कवींची आणि माझी आयुष्यांत पहिल्यानें भेट झाली. माझे मित्र कविवर्य ' अनिल ' यांना घेऊन मी त्यांच्या दर्शनाला गेलों. त्यावेळीं ते पुष्कळच वृद्ध दिसत होते. पण थकलेले नव्हते. जवळ जवळ दोन तास मी त्यांच्या संगतींत होतों. आम्हीं सर्वांनीं एका फोटोग्राफरकडे जाऊन एकत्र फोटोही पण काढून घेतला. 'बी' कवि माझ्याशीं पुष्कळच बोलले. तथापि त्यांचा स्वभाव फारसा बोलका असावा असें मात्र मला वाटलें नाही. केवळ मुद्द्यापुरतेंच ते बोलत. मात्र ते जें बोलत तें अतिशय चिंतनीय असे. त्यानंतर 'बी' कवींचा आणि माझा त्यापुढें प्रत्यक्ष संबंध असा जरी आला नाहीं, तरी 'बी' कवींच्या काव्यसंग्रहाला मी लिहिलेल्या प्रस्तावनेमुळेंच त्यांचे धाकटे बंधु श्री गजानन महाराज यांचा आणि माझा विलक्षण ऋणानुबंध जडला. श्री गजानन महाराज हे फारच थोर अधिकाराचे योगी पुरुष होते. पण केवळ त्यांच्या थोरल्या भावाच्या काव्याला मी प्रस्तावना लिहिली म्हणून ते खूष होऊन ते थोरल्या भावाप्रमाणेंच मला ' दादा ' म्हणून हांक मारूं लागले. एकदां तर ' या दादासाहेब ' असें म्हणून त्यांनी जेव्हां माझ्या पायावर डोकें ठेवण्याचा प्रयत्न केला तेव्हां लाजेनें मला मेल्याहून मेल्यासारखें झालें. ' बी ' कवि आणि गजानन महाराज या दोघां भावांचे पाठोपाठ अवसान व्हावे यामुळें व्यक्तिशः मला किती दुःख होत आहे हें शब्दांनीं सांगणें कठीण आहे. 'बी' कवींच्या एकापेक्षां एक सरस कविता मासिक ' मनो-रंजनां 'त जेव्हां प्रसिद्ध होत होत्या, तेव्हां त्याजवर ज्या हर्षानें आणि उन्मादानें आम्ही तरुण वाचक तुटून पडत होतों, तें स्मरण अद्यापि माझ्या हृदयांत ताजें आहे. त्या दिव्य आनंदाची पुन्हां आठवण करून महाराष्ट्राच्या ह्या प्रतिभाशाली, कलावंत आणि तत्त्वज्ञानी कवीला आम्ही शेवटचें वंदन करतों.

• • •

६

# नभोवाणीवर अ. ब. कोल्हटकर

[मुलाखत हा वाङमयप्रकार मराठी साहित्याला कांहींसा नवीन आहे. त्यांतूनहि एखाद्या प्रसिद्ध व्यक्तीची काल्पनिक मुलाखत लिहावयाची हें काम अधिकच अवघड आहे.

मराठींतील एक सुप्रसिद्ध साहित्यिक व पत्रकार अ. ब. कोल्हटकर यांची नभोवाणीवर अत्रे यांनीं घेतलेली ही मुलाखत जेवढी रंजक आहे तेवढीच ती कोल्हटकरांच्या स्वभाववैशिष्ट्यावर प्रकाश पाडणारी आहे.]

* * *

मी · नमस्कार कोल्हटकरसाहेब.

कोल्हटकर : कोण हो तुम्ही ?

मी : मी प्रल्हाद केशव अत्रे.

कोल्हटकर : काय म्हणतां ? तुम्ही म्हणजे गडकऱ्यांचे शिष्य अन् 'झेंडूचीं फुलें' वाले प्रल्हाद केशव अत्रे ? केवढा जबरदस्त झाला आहे हो तुमचा ? मीं एकदम ओळखलेंच नाहीं. मागें मीं तुम्हांला जेव्हां पाहिलें होतें तेव्हां तुम्ही इंग्लंडहून तें डी. डी. कीं फी. डी. चें कांहीं तरी शेपूट घेऊन आलां होतां. त्यावेळीं तुम्ही फारच बारीक दिसत होता.

मी अहो पण साहेब, त्या गोष्टीला आतां बावीस वर्षे होऊन गेलीं. तुम्हांला आमच्यामधून जाऊन वीस वर्षे झालीं. या गेल्या वीस वर्षांच्या

काळामध्यें ह्या जगांत आणि आपल्या भारतांत केवढी प्रचंड क्रान्ति झालेली आहे याची तुम्हांला कल्पना असेल कीं नाहीं तें मला ठाऊक नाहीं. मग माझ्यासारख्या एखाद्या व्यक्तीच्या शारीरिक क्षेत्रफळांत क्रान्ति व्हावी ह्यांत नवल तें काय ?

कोल्हटकर : तुमचा आकार पाहून मला फार समाधान वाटलें. आपल्या महाराष्ट्राची भव्य परंपरा निदान शारीरिक आघाडीवर तरी तुम्हीं राखलीत याबद्दल मी तुमचें अभिनंदन करतों. बरें; हल्लीं करतां काय ?

मी साहेब, काय करतों म्हणून काय सांगूं ? तुमचाच शिष्य आहें मी. तुमच्यासारखे अनेक धंदे करतों आहें मी. कविता लिहितों, नाटकें लिहितों, व्याख्यानें झोडतों, छापखाना चालवितों, वृत्तपत्रें काढतों.

कोल्हटकर : काय म्हणतां ? तुम्हीं वृत्तपत्राच्या व्यवसायांत आहांत ? वाहवा, वाहवा. अत्रे ! या. मला कडकडून मिठी मारा. तुम्हीं वृत्तपत्रकार आहांत हें ऐकून मी तुमच्यावर अतिशय प्रसन्न झालों आहें. आहो, मीं अनेक धंदे केले तरी माझा खरा पिंड पत्रकाराचा होता. म्हणून म्हणतों, तुम्हांला माझा आशीर्वाद आहे. तुमचें कल्याण होवो !

मी पण साहेब, तुमच्याच आशीर्वादानें आणि कृपेनें गेलीं बारा वर्षें मी वृत्तपत्राचा व्यवसाय यशस्वी रीतीनें करतों आहें. आणि यंदां तर मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षस्थानीं माझी निवड झाली आहे.

कोल्हटकर काय म्हणतां ? मराठी पत्रकारांची परिषद देखील महाराष्ट्रांत निघाली आहे ? एकाहिपेक्षां एक आनंदाच्या बातम्या तुम्ही मला सांगताहांत, अत्रे ! मराठी पत्रव्यवसायाची संघटना व्हावी आणि त्याचें सामर्थ्य वाढावें असें मला त्यावेळीं मनांतून किती तरी वाटत असे. पण ह्या संघटनेचा पाया घालण्याचें अत्यंत अवघड काम आम्हां लोकांना त्यावेळीं करावें लागलें. केवळ वृत्तपत्रव्यवसायाची आर्थिक आणि बौद्धिक स्थिति सुधारण्याकडे लक्ष द्यावयाला आम्हांला तेव्हां वेळ नव्हता. स्वातंत्र्याचा लढा त्या वेळीं निकरानें चालू होता. जनतेला जागृत करण्याची फार मोठी जबाबदारी आमच्या डोक्यावर होती. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे !' हा लोकमान्य टिळकांचा मंत्र गांवागांवांतून आणि खेड्यांपाड्यांतून पोहोंचविण्याचें कार्य करण्यांत अण्णासाहेब परांजपे,

काकासाहेब खाडिलकर आणि तात्यासाहेब केळकर ह्यांच्यासारखे महाराष्ट्राचे मोठमोठे पत्रकार त्या वेळीं गुंतले होते. म्हणून केवळ वृत्तपत्रव्यवसायाच्या सुधारणेकडे लक्ष द्यायला आम्हांला तेव्हां वेळ नव्हता, अत्रे !

मी पण साहेब, आज महाराष्ट्रांत वृत्तपत्र व्यवसायाला जें भव्य आणि व्यापक स्वरूप प्राप्त झालें आहे त्याला कारण देखील तुम्हां पूर्वीच्या थोर पत्रकारांची पुण्याई आणि पराक्रम आहे हें आजचे आम्ही मराठी पत्रकार विसरूं शकत नाहीं. आमची मराठी पत्रकार परिषद निघून अवघीं दहा वर्षे झालीं. मी दहाव्या संमेलनाचा अध्यक्ष आहें. पण या परिषदेच्या पाठीमागें एकशें आठ वर्षांची तपश्चर्या आहे; साहेब, मराठी वृत्तपत्रांच्या भव्य मंदिराच्या पायाचा दगड १८३२ सालीं बाळशास्त्री जांभेकर ह्यांनीं बसविला. आणि त्यानंतर त्याच्या प्रचंड भिंती, खांब आणि घुमट बांधण्याचें कार्य चिपळूणकर, टिळक, आगरकर, परांजपे, खाडिलकर, केळकर आणि कोल्हटकर म्हणजे तुम्ही, अशा सात शिल्पकारांनीं पूर्ण केलें. माझ्या बेळगांवच्या अध्यक्षीय भाषणांत परवां मीं हेंच सांगितलें. तुमची तर कामगिरी किनई, साहेब, तुकारामासारखी आहे. 'तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।' तसा मराठी वृत्तपत्रव्यवसायाच्या मंदिरावर तुम्हीं लोकप्रियतेचा कळस चढवून ठेवला आहे. त्यामुळें आजच्या आमच्या मराठी पत्रकारांना 'सावकाश भजन' करणें शक्य झालें आहे.

कोल्हटकर अत्रे, माझ्या हयातींत आणि विशेषतः माझ्या आयुष्याच्या शेवटीं मला अनेकांच्या निंदा, अपवाद अन् शिव्या खाव्या लागल्या. आतां माझ्या मृत्यूनंतर तुमच्यासारखे लोक माझ्याबद्दल थोडेंसें चांगलें बोलूं लागलें हें पाहून मला खरोखरच समाधान वाटतें. पण त्याबरोबर तुम्हांला हें एक सांगून ठेवतों कीं, ज्याला वृत्तपत्रव्यवसायांतून जनतेची खरोखरच सेवा करावयाची आहे त्यानें निंदास्तुतीची यत्किंचित्‌हि पर्वा करतां कामा नये. 'कोणी निंदा कोणी वंदा। आपला जनहिताचा धंदा' हें एकच ध्येयवाक्य आपण पत्रकारांनीं आपल्या डोळ्यासमोर ठेवलें पाहिजे. बरें तें राहूं द्या. मी गेल्यानंतर गेल्या वीस वर्षांत आपल्या पत्रव्यवसायाची एकंदर काय हालहवाल आहे तें तरी आम्हांला थोडक्यांत सांगा.

मी साहेब, गेल्या वीस वर्षांत आपल्या या व्यवसायाचें स्वरूप केवढें प्रचंड झालें आहे, त्याची थोडक्यांत आपणांला कल्पना करून देणें कठिण आहे. पूर्वी तुमच्या वेळीं या महाराष्ट्रांत उणींपुरीं दोनतीन दैनिकें आणि दहापांच साप्ताहिकें असतील कीं नाहीं याची शंका आहे. पण आज महाराष्ट्रांत केवळ पुण्यामुंबईंतच नव्हे तर कोल्हापूर, कऱ्हाड, मिरज, नाशिक, सोलापूर अशा लहानसहान गांवांतहि दैनिकं निघूं लागलीं आहेत. नगर अन् कोल्हापूरसारख्या गांवांत दहादहा साप्ताहिकें निघत आहेत. यापेक्षां अधिक काय सांगावें ? महाराष्ट्राच्या वृत्तपत्रव्यवसायांत काम करणाऱ्या पत्रकारांची संख्याच मुळीं सहासातशांवर गेली आहे. मग वाचकांची संख्य किती हजारांवर गेली असेल त्याची तुम्हीच कल्पना करा. तुमच्या 'संदेश'च्या मला आठवतें आहे कीं जास्तींत जास्त दहा ते बारा हजार प्रती खपायच्या, पण आज लोकप्रिय दैनिकांचा खप चाळीस चाळीस पन्नास-पन्नास हजारांवर जाऊन पोहोंचला आहे.

कोल्हटकर : काय म्हणतां ? वीस वर्षांच्या आंत वृत्तपत्रांचा खप आणि प्रसार एवढ्या प्रचंड प्रमाणावर होईल असें त्यावेळीं मला स्वप्नांत देखील वाटलें नव्हतें. मग हीं एवढीं मोठीं वर्तमानपत्रें काढावयाला भांडवलही खूप लागत असेल.

मी . तें कांहीं विचारूं नका, साहेब. तुमच्यावेळीं तुम्ही एक लहानसें मशीन घेतलें आणि थोडासा टाईप घेतला कीं लागलेंच तुम्हांला दैनिक सुरू करतां येत होतें. नागपूरच्या कॉंग्रेसला तर तुम्हीं आपला छापखाना खांद्यावर घेऊन गेलां होतां असें आठवतें. आणि कित्येक वेळां छापखान्यांत कंपॉझिटर्स नसले कीं तुम्हीं बाह्या मागें सारून स्वत: हातांनीं खिळे देखील जुळविलेले मीं डोळ्यांनीं पाहिले आहेत. पण आतां तो जमाना पार बदलत गेला आहे. आतां एखादें दैनिक काढायचें म्हणजे लाखों रुपये भांडवल घालावें लागतें. तीसतीस चाळीसचाळीस हजार प्रती काढावयाच्या म्हणजे रोटरी यंत्र घ्यावें लागतें. त्याला दोन-तीन लाख रुपये पडतात. त्याशिवाय जगाच्या बातम्या मिळवण्यासाठीं महिना हजार दीड हजार भाडें देऊन 'टेलिप्रिंटर' यंत्र बसवावें लागतें. तुमच्या वेळीं मला आठवतें आहे कीं तुमच्या पत्राचे तुम्हींच संपादक आणि तुम्हीच वातमीदार. रात्रीं अग्रलेख

लिहीत असतांनाहि मध्येंच वेळ काढून तुम्ही गांवांत भटकायचेत अन् स्वतःच बातम्या जमा करून आणायचेत. 'संदेश' ला कोणी सहसंपादक नव्हता कीं उपसंपादकहि नव्हता. 'संदेश'चीं चारीच्या चारी पानें तुम्ही एकटेच भरून काढायचेत.

कोल्हटकर : अहो अत्रे, लोकमान्य टिळक वारले तेव्हां त्यांचा जो मीं स्पेशल अंक काढला होता किनई, त्याचे बत्तीस कॉलम मी एकटयानें लिहून काढले. एक दिवस अन् एक रात्र अगदीं अखंड बैठक मारून मी वसलों होतों त्या वेळीं.

मी : मला आठवतें आहे ना तें साहेब ! तुमचा प्रेस त्यावेळीं खेतवाडींत होता अन् मी तेव्हां जवळच राहात होतों. लोकमान्य टिळकांवरचा तो अमर लेख. तुम्ही लिहीत असतांना मी दहापांच वेळां तरी गुपचुप डोकावून गेलों ना ! पण साहेब, तुमच्या वेळचा तो एकखांबी तंबूचा जमाना आतां पार बदलला. आतां प्रत्येक दैनिकांत एका संपादकाच्या साहाय्याला किती तरी सहसंपादक, उपसंपादक, विभागसंपादक आणि वार्ताहर असतात. संपादकाच्या दिमतीला जवळ जवळ एक प्रचंड सैन्यच असतें असें म्हणतात !

कोल्हटकर . वाहवा, फारच छान. माझ्या वेळीं जर मला अशी मदत असती तर मी काय काय चमत्कार करून दाखविले असते ! मग आजचीं दैनिकें अन् साप्ताहिकें आमच्या त्या वृत्तपत्रापेक्षां फारच उद्बोधक, मनोरंजक आणि स्फूर्तिदायक असतील, नाहीं अत्रे ?

मी मोठा कठीण प्रश्न विचारलांत साहेब. छपाईच्या, मांडणीच्या, सजावटीच्या आणि विषयांच्या विविधतेच्या दृष्टीनें आजचीं आमचीं वृत्तपत्रें तुमच्या वृत्तपत्रापेक्षां अधिक आकर्षक आहेत ह्यांत मुळींच शंका नाहीं. तुमच्या वेळेला सर्व जगाच्या ताज्या बातम्या मिळण्याची कांहींच सोय नव्हती. म्हणून बातम्यांच्या दृष्टीनें त्या वेळच्या वृत्तपत्रांना कांहींच महत्त्व नसे. निरनिराळचा महत्त्वाच्या व्यक्तींचे आणि घटनांचे फोटो आणि राजकीय व्यंगचित्रें तुमच्या वेळीं वृत्तपत्रांत मुळींच नसत. तुम्ही स्वत: आपल्या 'संदेश'मध्यें कधीं कधीं हास्यचित्रें देत होतां. पण आज तीं छापलीं तर हास्यास्पदच ठरतील. राजकारण, समाजशास्त्र, ज्ञानविज्ञान इत्यादि विषयांवर अधिकारी व्यक्तींनीं लिहिलेले लेख अन् माहिती आजच्या वृत्तपत्रांतून वाच-

कांना भरपूर वाचायला मिळते. अशी तुमच्यावेळीं मुळींच मिळत नव्हती. सार्वजनिक जीवनांत आज शेकडों संस्था, चळवळी आणि घडामोडी ह्यांची दंगल उडून राहिली आहे. त्याचे निरनिराळे पडसाद आजच्या वृत्तपत्रांत उमटलेले आढळतात. त्यामुळें तुमच्या वेळच्या वृत्तपत्रांपेक्षां आजच्या वृत्तपत्रांत विविधता आणि गुंतागुंत जास्त आढळते.

कोल्हटकर पण वाचकांस यापेक्षां अधिक हो काय पाहिजे ? मग आजच्या तुमच्या वृत्तपत्रांतील मजकूर अगदीं मथळ्यापासून तो शेवटच्या ओळीपर्यंत वाचकवर्ग अधाशीपणें वाचून टाकीत असेल नाहीं ?

मी : नाहीं साहेब, दुःखाची गोष्ट आहे कीं, आजच्या वृत्तपत्रांतून वाचकांना एवढें खाद्य मिळत असलें तरी वृत्तपत्रें वाचण्यापेक्षां तीं वरवर वाचून फेकून देण्याची वाईट खोड आजकालच्या आमच्या मराठी वाचकांना लागली आहे. अग्रलेख आणि स्फुट सूचना कोणी वाचीत असेल तर शपथ ! ठळक ठळक बातम्यांचे नुसते मथळे वाचले आणि सिनेमाच्या जाहिरातीं-वरून नजर फिरविली कीं, संपलें बहुतेकांचें वृत्तपत्रांचें वाचन. हो एक सांगायचें राहिलें कीं राशिभविष्याचा अन् शब्दांचीं कोडीं सोडविण्याचा मराठी वाचकांना आजकाल फार नाद लागला आहे.

कोल्हटकर . काय म्हणतां ? असो, हें राशिभविष्य देण्याची प्रथा तर महाराष्ट्रांत प्रथम मींच सुरू केली.

मी होय साहेब. मराठी वृत्तपत्रसृष्टींत तुम्हीं चांगल्या चांगल्या नवीन प्रथा घालून गेलांत. पण एवढी एक गोष्ट मात्र वाईट करून गेलांत.

कोल्हटकर : अहो पण अत्रे, त्या वेळीं एक गंमत म्हणून मीं ' राशि-भविष्य ' माझ्या पत्रांमधून द्यायला सुरवात केली. त्याचा पुढें लोक एवढा गंभीरपणें विचार करूं लागतील आणि लोकांना त्याचें पुढें एवढें वेड लागेल ह्याची मला त्यावेळीं मुळींच कल्पना नव्हती. पण आमच्या ह्या राशि-भविष्यामुळें माझ्या इतर लिखाणाकडे वाचकांचे दुर्लक्ष होत असल्याचें मला कधींच आढळून आलें नाहीं.

मी : त्या वेळच्या आणि आजच्या वृत्तपत्रांत हाच तर मुळीं महत्त्वाचा फरक आहे. त्या वेळच्या संपादकाच्या व्यक्तिमत्त्वाची आणि त्याच्या लेखन-शैलीची वाचकवर्गावर फार मोठी मोहिनी होती. ' केसरी ' पत्र लोक

कशासाठीं वाचीत ? तर लोकमान्य टिळकांचें, खाडिलकरांचें किंवा केळकरांचें ओजस्वी आणि स्फूर्तिदायक लिखाण त्यामध्यें वाचायला मिळत असे म्हणून. 'काळ' पत्राची लोक आतुरतेनें कां वाट पहात असत ? तर शिवरामपंतांच्या प्रतिभेंतून उचंबळणारीं स्वातंत्र्यप्रेमाचीं आणि क्रांतिरसाची कारंजीं त्या पत्रांत उचंबळत असत म्हणून ! आणि साहेब, तुमच्या 'संदेश'वर, 'संजय'वर 'टिळक' वर किंवा 'चाबूक' वर तरी त्यावेळी लोकांच्या एवढ्या उड्या कां पडत ? तर 'वत्सलावहिनींची पत्रें', 'दामुअण्णांच्या सुरस आणि चमत्कारिक कथा', 'वेटा गुलाबच्या कानगोष्टी', 'चहा-चिवडा आणि चिरुट' असल्या तुमच्या प्रतिभेच्या पाकगृहांत तयार झालेल्या चमचमीत आणि लज्जतदार पक्वान्नांच्या मेजवान्या रोज सकाळीं वाचकांना उठल्यावर मिळत असत म्हणून ! 'माधवाश्रमांतील शिवाजी', 'शेवटली वेल सुकली' किंवा 'पुणेरी जोडे' असलें वाङ्मयाला चिरंतन भूषण होऊन राहणारें तुमच्यासारखें शैलीदार आणि सुदर लिखाण आजकालच्या वर्तमानपत्रांत वाचावयाला मिळत नाहीं, म्हणून आमच्या वाचकांचें लक्ष भविष्याकडे आणि कोडयांकडे लागून राहतें. साहित्याच्या आणि कलेच्या कसोटीला देखील जें टिकू शकेल असलें लिखाण आजकालच्या वृत्तपत्रांत फार कमी आढळतें ह्यांत मुळींच संशय नाही. म्हणून व्यवसाय आणि उद्योग या दृष्टीनें जरी मराठी वृत्तपत्रांची आज खूपच वाढ आणि सुधारणा झालेली दिसत असली आणि जनता-जागृतीचें कार्य अधिक व्यापक नि परिणामकारक रीतीनें आजचीं मराठी वृत्तपत्रें करीत असलीं तरी, साहेब, तुमच्या वेळचें तें संपादकाचें प्रभावी आणि स्फूर्तिदायक' व्यक्तिमत्त्व आजच्या वृत्तपत्रांच्या पाठीमागें फारसें कांहीं आढळत नाहीं हें मात्र प्रांजलपणें कबूल करावयाला पाहिजे. त्या वेळच्या तुम्हां वृत्तपत्रांच्या संपादकांची बौद्धिक आणि वाङ्मयीन पातळी आजच्या संपादकांच्यापेक्षां वरच्या दर्जाची होती, यांत कांहीं शंका नाहीं. तुम्ही संपादक त्यावेळीं जनतेचे राजकीय, सामाजिक वा वैचारिक नेते होतां. तुम्हांला त्या वेळीं समाजांत फार मोठें स्थान होतें. त्या दृष्टीनें पाहतां पत्रव्यवसायांत संपादकांचें व्यक्तिमाहात्म्य कांहीं फारसें उरलें नाहीं.

कोल्हटकर  वा, मग फारच उत्तम गोष्ट झाली. असें केव्हां ना केव्हां तरी व्हायलाच पाहिजे होतें. वृत्तपत्रांच्या सृष्टींतच काय पण समाजाच्या जीवनांतहि व्यक्तीपेक्षां कार्याला किंवा तत्त्वालाच जास्त महत्त्व प्राप्त व्हावयाला पाहिजे. माझें सारें जीवित तर हाच 'संदेश' सांगण्यासाठीं मी खर्च केलें. चला, आम्हां लोकांचा त्याग आणि तपस्या कांहीं वायां गेली नाहीं. आजचे मराठी पत्रकार आमच्यापेक्षां कमी साहित्यिक आणि कमी शैलीदार असले तरी चालतील; पण सत्यासाठीं आणि तत्त्वासाठीं वाटेल तो त्याग आणि हालापेष्टा सहन करण्याला मात्र आमच्याप्रमाणें त्यांनीं सदैव सिद्ध असायला हवें. ज्या अर्थी आतां देशाला स्वातंत्र्य मिळालें आहे आणि तुम्हां पत्रकारांची स्वतंत्र संघटना स्थापन झाली आहे; त्या अर्थी पत्रव्यवसायामधल्या सर्व लोकांची आर्थिक परिस्थिति समाधानकारक असेल अशी माझी समजूत आहे.

मी  ती कांहीं अंशीं खरी आहे. आतां मोठमोठ्या मराठी पत्रांच्या संपादकांना महिना पाचशेंपासून आठशें रुपयांपर्यंत पगार मिळतो. वर्षाची एक महिना त्यांना पगारी रजा मिळतें. प्रॉव्हिडंट फंडाचीही पण पुष्कळांची सोय झालेली आहे. वार्ताहर आणि संपादकीय वर्गांतले इतर लेखक ह्यांचे पगार इतके समाधानकारक नसले तरी एकंदर परिस्थिति तुमच्या वेळेपेक्षां पुष्कळच चांगली आहे.

कोल्हटकर  काय म्हणतां ? पत्रकारांच्या पगाराचे हे मोठमोठे आंकडे ऐकून पुन्हा महाराष्ट्रांत जन्माला यावें आणि एखाद्या वृत्तपत्राच्या कचेरींत नोकरी करावी असें मला क्षणभर वाटूं लागलं आहे. असो, आमच्या वेळीं महिन्याकांठी पांच-पन्नास रुपये आमच्या खिशांत पडले कीं आम्हांला पुष्कळ होत. कित्येक वेळां तर चणेफुटाण्याचे फाके मारीत आणि विड्या फुंकीत आम्हीं आमचें लिखाण केलेलें आहे. आमच्या वेळीं वृत्तपत्रव्यवसाय हा फायद्याचा धंदा नसून कर्जाचा धंदा होता. त्यासाठीं तर मला एकदोन वेळां दिवाणी तुरुंगांत जाऊन यावें लागलें.

मी . तें मला माहीत आहे.

कोल्हटकर : मराठी पत्रकार परिषदेचे तुम्ही अध्यक्ष आहांत म्हणून मी तुम्हांला सांगतों, अत्रे, तुमच्या पत्रकारांना तुम्हीं बजावून सांगा कीं तुम्हां लोकांची आर्थिक स्थिति चांगली पाहिजे हें मला मान्यच आहे. पण पत्र-व्यवसाय हा केवळ पोट भरण्याचा धंदा आहे असा मात्र तुम्ही आपला समज करून घेऊं नका. जनसेवेचा हा एक पवित्र धर्म आहे, याच दृष्टीनें तुम्ही या व्यवसायाकडे पाहात जा. बरें आहे. येतो. वंदेमातरम्.

मी : जयहिंद.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 26650 वि: निबंध
क्रमांक 1228 नों: दि: 28/8/86

७

# मला पडलेलें विलक्षण स्वप्न

[मराठी वृत्तपत्रसृष्टींत आ. अत्रे यांच्या ' नवयुग 'साप्ताहिकाला-एक विशिष्ट स्थान लाभलें आहे. सर्वसामान्य मराठी वाचकाला देशांतल्या बदलत्या राजकारणाचें, त्यांतील वेगवेगळया मतप्रवाहांचें, प्रक्षोभांचें व समस्यांचे ' ज्ञान ' ' नवयुग 'नें वेळोवेळीं तत्परतेनें करून दिलें आहे. प्रभाव-पूजनाप्रमाणें मूर्तिभंजन हेंहि ' नवयुग'चें एक मोठें वैशिष्टय आहे. ' नवयुगां 'तून आचार्य अत्रे यांचीं आतांपर्यंत शेंकडों ' उवाचें ' प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांपैकीं हा एक ' वेगळा ' लेख लक्षणीय आहे.

* * *

फेब्रुवारी महिन्याची वीस तारीख. गुरुवार होता त्या दिवशीं. रात्रींच्या वेळीं जेवण झाल्यानंतर मी ' नभोवाणी ' ऐकत बसलों होतों माझ्या दिवाणखान्यांत. बसलों होतो असें म्हणण्यापेक्षां कोचावर अर्धवट डोळे मिटून कलंडलों होतों, असेंच म्हटलेलें जास्त बरें. जेवण नेहमींपेक्षां सढळ हातानें झाल्याकारणानें अंग जरा सुस्त झालें होतें आणि डोळे जडावले होते. ' नभोवाणी 'वर कांहीं तरी सामान्य कार्यक्रम चाललेला होता. म्हणून त्या कार्यक्रमाकडे माझें फारसें लक्ष नव्हतें. मधून मधून मला डुलकीहि येत होती. आणि त्यामुळें कानावर जे निरनिराळे आवाज पडत होते त्यांच्यातलें सूत्र एकदम निसटल्यासारखें वाटत होतें. अशा रीतीनें जागेपणींच्या आणि

झोंपेच्या सरहद्दीवर लंबकासारखे हेलकावे खात मी पडलों असतांना, दिल्लीच्या तळावरून पंतप्रधान ॲटली यांच्या घोषणेच्या बातमीचा पुकार खडचा आवाजामध्यें एकदम बाहेर पडला. त्या दिवशीं ॲटलीसाहेब कांहींतरी महत्त्वाची घोषणा करणार आहेत, किंवा कसला तरी 'पांढरा कागद' वाचणार आहेत, हें मला माहीत होतें. तथापि, मला त्याविषयीं फारशी उत्सुकता वाटत नव्हती. सहा डिसेंबरच्या ब्रिटिश सरकारच्या निवेदना-नंतर माझा ब्रिटिशांच्या शहाणपणावरचा विश्वास पार उडाला होता. 'लीग'ला हाताशीं धरून स्वातंत्र्याच्या राजकारणाचा हे असाच यापुढें खेळखंडोबा करीत रहाणार, अशी माझी अगदीं समजूत झाली होती. म्हणून पंतप्रधान ॲटली आतां कांहीं तरी अद्‌भुत घोषणा करून मुरदाड बनलेल्या देशाच्या राजकारणांत नवीन कांहीं तरी जीव घालतील अशी अपेक्षा बाळग-ण्याचें मला कारण नव्हतें. मी मनांत म्हणालों कीं, हा पूर्वीसारखाच कांहीं तरी शाब्दिक चावटपणा असणार दुसरें काय ? असा विचार मनांत येतो आहे तोंच, 'एकोणीसशें अठ्ठेचाळीसच्या जून महिन्याच्या आंत जबाबदार हिंदी सरकारच्या हातांत सत्ता देऊन ब्रिटिशांनीं या देशांतून जाण्याचा ठाम निश्चय केला आहे,' असे उद्‌गार नभोवाणीवरून बाहेर पडले, त्याबरोबर एकादी इंगळी डसावी तसा मी 'अरेच्या !' म्हणून जोरानें किंचाळलों आणि ताडकन उठून बसलों ! माझ्या शरीरांतला कणन्‌कण्‌ एकदम कानामध्यें येऊन बसला. आणि नभोवाणींतून भराभर बाहेर पडणारा एकेक शब्दन्‌ शब्द व्याकुळ उत्सुकतेनें ऐकूं लागलों. मी झोपेंत आहे कां स्वप्नांत आहें, हें मला कळेना ! छे, छे ! हें कसें शक्य असेल ?. पुढल्या वर्षाच्या जूनच्या आंत हे पांढऱ्या पायाचे राज्यकर्ते या देशामधून चालते होणार ? गेली शें दीडशें वर्षे ह्या देशाच्या मानगुटीवर बसलेलें राजकीय गुलामगिरीचें हें राक्षसी जोखड पंधरा महिन्यांनीं नाहीसें होणार ! काय ऐकतों आहोंत तरी काय हें आपण ? माझ्या कानावर माझा मुळीं विश्वास बसेना ! पुढल्या वर्षीं ह्या देशामधून इंग्रज चालते होणार, ह्या नुसत्या कल्पनेनेंच डोकें बेहोष झालें ! कवटीच्या आंत मेंदू हर्षानें गडबडा लोळू लागला ! एकाएकीं स्वर्ग खालीं उतरून पृथ्वीवर आला आहे का पृथ्वी वर उडी मारून स्वर्गांत शिरली आहे, हेंच लक्षांत येईना. मी मनाशीं म्हटलें कीं, कलियुग एकाएकीं संपून सत्य-

युगाला तर आतां ही सुरवात झाली नसेल ना? नभोवाणीवरील बातमी संपत आली. लॉर्ड वेव्हेल यांना पुढल्या महिन्यांत परत बोलाविण्यांत येईल, आणि त्यांच्या जागीं लॉर्ड माऊंटवॅटन ह्यांची नेमणूक करण्यांत येईल, हा बातमीचा शेवटचा भाग ऐकून तर मी आनंदानें कोचावरून उडालोंच म्हणाना! छान झालें. त्या लुच्च्या एकडोळेवाल्या साहेबाची हकालपट्टी करण्यांत आली! फार उत्तम गोष्ट झाली! मी हर्षानें स्वतःशींच उद्गारलों! बातम्या संपल्या. मी नभोवाणी बंद करून टाकली. आणि एकदम बाहेर गॅलरीमध्यें आलों. माझ्याप्रमाणेंच समुद्राचा हर्षहि अनावर झाला असल्याचें मला दिसून आलें. त्याच्या लाटा जोराजोरानें किनाऱ्याकडे धांवत होत्या. मीं वर आकाशाकडे पाहिलें. लक्षावधि चांदण्यांनाही आमच्याप्रमाणें आनंद झालेला होता. समोर अंधारांत उभीं असलेलीं नारळाचीं झाडेंही समाधानानें माना डोलवीत होतीं. पंतप्रधान ॲटलींची घोषणा आपल्यालाही पसंत असल्याचें ती जणू कांहीं मला सांगत होतीं. मीं आजूबाजूला पाहिलें. खालीं रस्त्याकडेही नजर टाकली. अंधारांतून कोणीतरी माणूस मंद पावलांनीं हळू चालला असल्याचें मला दिसलें. मी चिडून म्हणालों, "काय गाढव माणूस आहे हा! रस्त्यानें उड्या मारीत आणि ओरडत जाण्याचें सोडून हा माणूस असा मुड्द्यासारखा काय चाललाय हळूहळू?" इतक्यांत माझ्या लक्षांत आलें कीं, नभोवाणीवरची ती आनंदाची बातमी त्यानें कदाचित् ऐकली नसेल! त्याबरोबर मनांत एकदम विचार आला कीं, गॅलरीमधून त्याला मोठ्यानें ओरडून सांगावें कीं, "लेका, पंधरा महिन्यांनीं इंग्रज या देशांतून चालते होणार आहेत! आनंदानें उड्या मारीत जा! हळू काय चालला आहेस?" तथापि हा विचार मी अंमलांत आणा-यच्या आधींच 'टार्झन' मागून आला आणि गॅलरीच्या कठड्यावर पंजे ठेऊन मोठमोठ्यानें भुंकू लागला. "भू, भू, भू. पुढल्या वर्षी इंग्रज या देशांतून चालते होणार! आमचा हिंदुस्थान आतां स्वतंत्र होणार! भू, भू, भू!" अशीच घोषणा जणू कांहीं आनंदानें तो भुंकत होता असें मला वाटलें. डाव्या बाजूला शिवाजीपार्कचें प्रचंड मैदान अंधारामध्यें जास्तच ओसाड दिसत होतें. त्या मैदानाच्या आसपास असणाऱ्या उंच इमारतींमधून दिव्यांचा प्रकाश होता. त्यावरून त्या इमारतीमधलीं माणसें अद्यापिही जागीं असावींत

असें मला वाटलें. एवढी आनंदाची बातमी ऐकल्यानंतरही हे लोक घरांतल्या-घरांत काय करीत बसले आहेत, ते ताबडतोब घरातून बाहेर पडून शिवाजी-पार्कवर प्रचंड सभा कां भरवीत नाहींत, याचें मला आश्चर्य वाटलें. कोण-त्याही गोष्टीचा आमच्या लोकांना मुळीं उत्साहच नाहीं. दीडशें वर्षांच्या गुलामगिरीनें त्यांचीं मनें इतकीं मुर्दाड होऊन गेलीं आहेत कीं, त्यांना शिमगा कोणता आणि दिवाळी कोणती यामधला फरकही कळेनासा झाला आहे, असें कांहींतरी पुटपुटत मी चिडून परत दिवाणखान्यांत आलों आणि कोचावर कलंडलों. समोर भिंतीवर कॅलेंडर लोंबत होतें. तें दृष्टीस पडतांच आजपासून एकोणीसशें अठ्ठेचाळीस सालच्या पहिल्या जूनची भाग्यशाली तारीख उग-वायला किती दिवसांचा आवकाश आहे, तें प्रत्यक्ष मोजूनच पहावें असें मला वाटलें. 'या महिन्याचे बाकी राहिलेले आठ दिवस' अशी दिवसांची बेरीज मी मनांतल्या मनांत करूं लागलों. आंकडे मोजण्याच्या नादांत एकदम डुलकी केव्हां आली तें मला कळलेंच नाहीं.

मी तसाच कोचावर पडलेला होतों. समोरच्या भिंतीवर लोंबणाऱ्या कॅलेंडरमध्यें 'एक जून एकोणीसशें अठ्ठेचाळीस' एवढी एकच तारीख चकचकत होती. चकचकत होती ह्याचें कारण ती सोन्याच्या शाईत छापलेली होती. त्या एका तारखेवांचून कॅलेंडरमध्यें दुसरी कसलीच माहिती दिलेली नव्हती. एकसारखा किती वेळ तरी मी त्या तारखेकडे नजर रोखून बघत होतों. मी वेड्यामारखा त्या तारखेकडे टक लावून कां बघत बसलों आहें, हें पुष्कळ वेळ झाला तरी माझ्या ध्यानांत येईना. इतक्यांत माझ्या उजव्या बाजूकडून हास्याचा आवाज माझ्या कानीं आला. मीं वळून पाहिलें. तों त्या भिंतीवर टांगलेला हिंदुस्थानचा नकाशा खदखदां हंसतो आहे आणि हर्षानें मागेंपुढें भिंतीवर आदळतो आहे, असें मला दिसून आलें. त्याबरोबर समोरच्या कॅलेंडरमधून चकाकणाऱ्या 'एक जून एकोणीसशें अठ्ठेचाळीस' प्रकाश एकदम माझ्या डोक्यांत पडला. मी आनंदानें किंचाळलों, 'म्हणजे पंधरा महिने इतक्यांत संपले ? आणि अठ्ठेचाळीसच्या जूनची पहिली भाग्यशाली तारीख आज उजाडली ? गुलामगिरीचा फाल्गुन महिना संपून स्वातंत्र्याच्या नव्या वर्षाला आज सुरवात झाली ? बाहेर कोट्यवधि जनता आनंदाचा गुढीपाडवा साजरा करीत असतांना मी आळशासारखा

घरांत काय पडून राहिलों आहे! तिकडे अपोलो बंदरावर निजधामाला जाणाऱ्या गोऱ्या राज्यकर्त्यांची शेवटची आगबोट पहावयाला केवढी प्रचंड गर्दी जमली असेल? तो सोहळा बघायला जाण्याचें सोडून मी खुशाल झोंपा घेत घरांत पडलों आहें, या विचारानें माझीच मला लाज वाटूं लागली. मी कोचावरून उठण्याचा प्रयत्न करूं लागलों. परंतु कोचावरून आपल्याला उठतां येत नाहीं आणि आपलें अंग भयंकर जड झालेलें आहे असें मला आढळून आलें. मला आश्चर्य वाटलें. मी म्हणालों, "सणावाराच्या दिवशी हें काय नवीन लफडें निर्माण झालें आहे?" गड्याला हांक मारावी म्हणून मी तोंड उघडलें तोंच दिवाणखान्याचें दार धाडकन् आंत लोटून बुटांचा खाड खाड आवाज करीत लष्करी पोषाखांतला एक साहेब आंत शिरला. त्या साहेबाचा चेहरा अर्धवट लॉर्ड वेव्हेलसारखा अन् अर्धवट चर्चिलसारखा दिसत होता. त्याच्या उजव्या हातांत एक भली मोठी कात्री होती. सर्व गोरे लोक देशामधून जाण्याचे दिवशीं हा लेकाचा एकच साहेब माझ्या घरामध्यें कां शिरावा, याचा मला अचंबा वाटला. मी माझ्या जागेवरून उठलों नाहीं, किंवा 'गुड् मॉर्निंग' असेंहि त्याला म्हटलें नाहीं. विलायती रीतीभातीचें शाब्दिक ढोंग त्या दिवसापासून या देशामधलें संपलें हें मला माहीत होतें. मी पडल्या पडल्याच त्या साहेबाला विचारलें, "अजून तुम्ही माझ्या इथें कसें? आणि ही कात्री घेऊन तुम्ही माझ्या घरामध्येंही कशाला शिरलांत?" माझ्या डोळ्याला डोळा न भिडवतां भिंतीवरच्या हिंदुस्थानच्या नकाशाकडे कठोर नजरेनें पहात तो साहेब म्हणाला, "बंदरांत आमची बोट उभी आहे. पण जाण्यापूर्वी मला तुमचा हिंदुस्थानचा नकाशा कातरून त्याचे तुकडे तुकडे करायचे आहेत!" साहेबाचे ते शब्द ऐकून कात्रीनें माझें कुणी काळीजच कापतें आहे असें मला वाटलें. मी रागानें एकदम गरजलों, "गेली दीडशें वर्षे तुम्ही या देशाची लक्तरें केलींत ती पुरीं नाहीं का झालीं? जाण्याचें दिवशीं तरी लेकहो, असा हलकटपणा करूं नका." पण माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून साहेबानें भिंतीवरचा नकाशा खसकन् ओढला आणि खालीं जमिनीवर आपटून अंथरला आणि बकऱ्याला कापण्याकरितां खाटीक ओणवा होऊन जसा त्याच्या पोटावर आपला गुडघा ठेवतो, त्याप्रमाणें नेमका लंकेवर

आपला गुडघा ठेवून साहेबानें आपल्या हातांतली कातरी पुढें सरसावली. माझें डोकें संतापानें फिरून गेलें. हिंदुस्थान सोडावं लागत असल्यामुळें आधींच लालभडक झालेला साहेबाचा चेहरा दोन सणसणीत श्रीमुखांत भडकावून आणखी लाल करावा, असा विचार माझ्या मनांत आला. पण कोचावरून मला उठतां येत नव्हतें. आणि शिवाय मीं अहिंसा-वादी काँग्रेसजन होतों. पहिल्या झटक्यासरशीं साहेबानें सिंधचा तुकडा उडवला. त्याबरोबर त्या नकाशामधून भळभळां रक्त वाहूं लागलें. आणि शेंकडों लोकांच्या आर्त किंकाळ्या बाहेर उठल्या. सिंध संपतांच साहेबानें बंगालकडे आपली कात्री वळवली. माझ्या पोटांत एकदम धसका बसला. मी एकदम ओरडलों, "साहेब, कृपा करा, आमच्या बंगालला हात लावूं नका. आमच्या रवींद्रनाथ टागोरच्या बंगालची अशी विटंबना करूं नका. हो!" पण माझे शब्द पुरे होण्याच्या आधींच त्यानें बंगालचा लचका तोडून काढलेला होता! रक्ताचीं शेंकडों कारंजीं बंगालच्या जखमी अंगांतून बाहेर उसळलीं. आणि नौखाली-मधून स्त्रियांचे हंबरडे पुन्हा वेगानें बाहेर उसळलें. मला तें रक्त पहावेना आणि तो शोक ऐकवेना. मी कानांत बोटें घातली आणि डोळे घट्ट मिटून घेतले. पुन्हा कांहीं वेळानें मी डोळे उघडून पहातों तो साहेबानें साऱ्या हिंदु-स्थानाचें तुकडे तुकडे करून जमिनीवर फेंसकरलेले होते! कोणताही प्रांत किंवा कोणतेंही संस्थान कापिण्याचें त्यानें बाकी ठेवलें नाहीं! माझ्या दिवाण-खान्यांत रक्ताचें थारोळें माजलें होतें. रक्ताच्या चिळकांड्यांनीं दिवाण-खान्याची सारी भिंत लालभडक झाली होती. साहेबाचे हात, त्याच्या हाताखालीं ती मोठी थोरली कात्री आणि त्याचे सारे खाकी कपडे रक्तानें भरून गेले होते. गॅलरीमध्यें कात्री भिरकावून देऊन साहेब उठून एकदम उभा राहिला, आणि त्यानें माझ्याकडे पाहून भेसूर हास्य केलें. त्यावेळीं साहेबाच्या चेहऱ्यामधून जनाब जिनांचाच चेहरा हंसतो आहे किंवा काय असा क्षणभर मला भास झाला. पायापासून डोक्यापर्यंत माझ्या अंगावर भयाचा कांटा उभा राहिला. माझ्या काळजाचें पाणी पाणी झालें! हिंदु-स्थानचें रक्तबंबाळ तुकडे आपल्या बुटाच्या टांचेखालीं तुडवीत आणि खाड-खाड आवाज करीत साहेब माझ्या डोळ्यासमोरून चालता झाला. अरेरे माझ्या प्रचंड आणि अखंड देशाची इथून जाण्यापूर्वीं साहेबानें काय ही दुर्दशा

करून टाकली ! असें म्हणून मी लहान मुलाप्रमाणें ओक्साबोक्शी रडूं लागलों. अठ्ठेचाळीसच्या जूनची असली भयानक पहिली तारीख आम्हाला दाखवण्यापूर्वीं तूं आमचे डोळे कां मिटले नाहींस अशा परमेश्वराला मी शिव्या देऊं लागलों. तशा विव्हळ अवस्थेंत किती वेळे डोळे मिटून मी तेथें रडत बसलों होतों कुणास ठाऊक ! त्या शोकाच्या अतिरेकानें माझ्या बुद्धीला एक प्रकारची ग्लानी किंवा मूर्च्छा आली होती. भयाण काळोखाच्या एखाद्या खोल समुद्राच्या तळाशीं आपण जाऊन पडलों आहोंत किंवा काय, असें मला वाटत होतें. त्या ग्लानीमधून एका स्वर्गीय संगीतानें मला जागे केलें. बेशुद्ध पडलेल्या माणसाच्या अंगावर थंडगार पाणी शिपडावें म्हणजे तो जसा जागा होतो त्याप्रमाणें अमृतापेक्षांही शीतळ आणि मधुर असे स्वर माझ्या कानांत कुणी ओतीत आहे किंवा काय असा मला भास झाला. आणि मी हळूहळू डोळे उघडून बघूं लागलों. होय माझी कल्पना बरोबर होती. तो कृष्णाच्या मुरलीपेक्षांही अधिक मनोहर मुरली वाजविणारा हा महात्मा मोहन कोण आहे असा विचार मी करूं लागलों. तोंच महात्मा गांधींच्या नांवाचा जयजयकार मला ऐकूं आला. हा आवाज समोर पडलेल्या रक्तबंबाळ बंगालविहारमधून निघत होता. त्याबरोबर जनतेच्या जातीय ऐक्याची मुरली वंग देशांत महात्मा गांधी अजूनही वाजवीत बसले आहेत असें माझ्या लक्षांत आलें. 'आम्ही एक आहोंत आणि आम्ही एक होणार' हें त्या मुरलीगीताचे पालुपद होतें. ह्या पालुपदानें मला मोहिनी घातली. माझें दु:ख मी विसरून गेलों आणि मान डोलवीत मीही त्या सुरांवर गाऊं लागलों. "आम्ही एक आहोंत आणि एक होणार !" कांहीं वेळानें माझ्या सुराशीं सूर मिसळून तें पालुपद दुसरें कोणीतरी गात आहे, एक आवाज ते गात नसून अनेक आवाजांत ते गात आहेत, असें मला आढळून आलें. त्याबरोबर एकदम मी डोळे उघडलें आणि समोर पहातो तो साहेबानें कापलेले ते निरनिराळे हिंदुस्थानचें तुकडे 'आम्ही एक आहोंत आणि आम्ही एक होणार' हें महात्माजींच्या मुरलीचें पालुपद गात गात एकमेकांकडे सरकत येत आहेत, असें मला दिसलें. माझ्या डोळ्यांतलें दु:खाचें अश्रू कधींच नाहींसे झाले होते आणि त्यांची जागा आनंदाच्या आसवांनीं घेतली होती. 'आम्ही एक आहोंत, आम्ही एक होणार' हा आवाज हिंदुस्थानच्या प्रत्येक तुकड्यातुकड्यामधन निघं लागला.

कलकत्त्यापासून कराचीपर्यंत आणि काश्मीरपासून तों कन्याकुमारीपर्यंत कोटयावधि आवाजांचा एकच एक गजर उसळला. आणि आभाळापर्यंत जाऊन पोहोंचला. नादब्रह्माच्या त्या तंद्रींत देहभान विसरून हिंदुस्थानचे असंख्य तुकडे कधीं एकत्र झाले तें माझ्या लक्षांतही आलें नाहीं. पुन्हा माझ्या-समोर माझा प्रचंड आणि अखंड हिंदुस्थान एकमुखानें आणि एकदिलानें हसत आहे, असें मला दिसून आलें. हिंदुस्थानच्या त्या नकाशाभोंवतीं तेजाचें आणि सामर्थ्याचें एक नवीनच वलय झळकत असल्याचें मला आढळलें. बघतां बघतां त्या वलयाचें तेज वाढत चाललें आणि त्यामधून एक अतिशय दिव्य आणि दैदीप्यमान पुरुष प्रकट झाला. त्या पुरुषाची कांति बघून माझे डोळे अक्षरशः दिपले. कोटी रवीचें तेज देखील त्या पुरुषाच्या कांतीपुढें फिकें पडलें असतें ! बघतां बघतां त्या पुरुषाची आकृति एकदम वाढूं लागली. माझ्या दिवाणखान्याचें छत त्याच्या तेजानें वितळून नाहींसें झालें. आणि मला आकाशाचा विस्तार वर दिसूं लागला. वाढतां वाढतां ती आकृति इतकी वाढली कीं तिचें मस्तक गगनाला जाऊन भिडलें. आणि तिचे बाहू क्षितिजावर जाऊन विसावले. त्या विराट आकृतीची छाया साऱ्या भूगोलावर पसरली. आणि त्या छायेंत इंग्लंड दिसेनासें झालें, अमेरिका नाहींशी झाली आणि रशिया झांकून गेला. सर्व जग डोळे उंच करून आनंदानें आणि आदरानें त्या आकृतीच्या दिव्य मुद्रेकडे पाहूं लागलें. पौर्णिमेचा चंद्र आपल्या शुभ्र किरणांचा पाऊस ज्याप्रमाणें साऱ्या विश्वावर सांडीत असतो त्याप्रमाणें सुखाच्या आणि शांततेच्या गंगेचा ओजस्वी ओघ त्या महापुरुषाच्या मस्तका-मधून बाहेर पडून साऱ्या जगाला न्हाऊं घालूं लागला. त्या महापुरुषाची ओळख एकदम मला पटली. मी म्हणालों, " सर्व मानवतेवर शांततेचें साम्राज्य स्थापणारा हाच तो उद्यांचा महान भारतवर्ष ! " मी त्या महापुरुषाच्या चरणावर माझें मस्तक नमविलें आणि अंगांत होतें नव्हतें तेवढें सारें बळ एकत्र करून मी हर्षानें गर्जना केली, " जय हिंद ! जय भारत ! "

या माझ्या गर्जनेनेंच मला स्वप्नामधून जागें केलें. अर्धवट डोळे उघडून मी समोर पहातों तों पुस्तकांच्या कपाटावर ठेवलेला महात्मा गांधींचा अर्धपुतळा माझ्याकडे पाहून शांतपणें हंसत होता.

● ● ●

८

# मी विडंबनकार कसा झालों ?

[कांहीं वर्षांपूर्वी ' झेंडूचीं फुलें ' नांवाच्या एका कवितेच्या पुस्तकानें मराठी साहित्यक्षेत्रांत मोठीच खळबळ उडवून दिली. तत्कालीन कवींच्या कृतींतील अनेक हास्यास्पद लकबांचें, अहंतेचें व व्यंगांचें अत्यंत खेळकर पण विदारक विडंबन या पुस्तकांत केलेले होतें. आचार्य अत्रे (केशवकुमार) यांच्या सारख्या एका कोमलभाव संपन्न सजातीया-कडूनच हा हल्ला झालेला पाहून तेव्हांचें कवि अगदीं गांगरून गेले. प्रस्तुत काव्यप्रकार वापरण्याची आपल्याला आवश्यकता कां वाटली याचें लेखकानें येथें विवरण केलें आहे.]

* * *

विनोदी लेखक म्हणून महाराष्ट्रांत माझें नांव होईल अशी मला पूर्वी कल्पना देखील नव्हती. त्या दृष्टीनें मी कधीं तयारीही पण केली नव्हती. विनोद मला पहिल्यापासून आवडावयाचा हें खरें; पण विनोदी लेखन आप-ल्याला साधेल असें मला कधींही वाटलें नाहीं. ' झेंडूच्या फुलां 'नीं महा-राष्ट्रांत माझ्या विनोदाचा पहिल्यानें गवगवा केला. पण ' झेंडूचीं फुलें ' तरी मी लिहीन असें मला पूर्वी वाटलें होतें म्हणतां का ? मुळींच नाहीं. विडंबनकाव्य म्हणजे काय तें मला नुसतें ऐकूनच माहीत होतें. त्या वाङ्मय-प्रकाराचा मी अभ्यासही केला नव्हता. करण्याची कधीं जरुरीच पडली नव्हती. असें असतां विडंबन-काव्यें लिहिणारा विनोदी कवि म्हणून अक-

स्मात एके दिवशीं मला प्रसिद्धि मिळाली. घरांत अंथरुणावर झोपलेला माणूस झोपेमध्येंच उठावा आणि वळकटी गुंडाळून रस्त्यावर येऊन बसावा तसें माझें झालें. प्रेमाची आणि निसर्गाची हळुवार गाणीं स्वत:शींच गुण-गुणणारा माझ्यासारखा एक लाजरा माणूस एके दिवशीं आपली चालचलणूक आणि चर्या बदलून खुशाल विडंबन काव्याच्या खुंटावर येऊन बसलेला होता. आणि लोक त्याच्या भोंवतीं टाळ्या पिटून आणि मोठमोठ्यानें हसून गर्दी करून राहिले होते. मीं डोळे किलकिले करून अधून मधून त्या मंडळीकडे पाहात होतो. आणि मनांतल्या मनांत अचंबा करीत होतों कीं हें सारें झालें कसें आणि मी येथें आलों कसा ? वास्तविक मला जायचें होतें दुसऱ्याच मुक्कामाला. मला 'बालकवि' व्हायचें होतें. मला गोविंदाग्रज व्हायचें होतें. त्यासाठीं माझी खटपट चालू होती. पण तें सगळें राहिलें बाजूला आणि 'देवां'च्या आळंदीला पोहोंचायच्या ऐवजीं मी 'चोरा'च्या आळंदीला जाऊन पोहोंचलों ! बाकी माझ्या सर्वच आयुष्याचें तसें झालें आहे म्हणा. मला जें व्हायचें होतें तें कधींच होतां आलें नाहीं, आणि करायचें होतें तें कधींच करतां आलें नाहीं. प्रत्येक वेळेला कांहीं तरी अपघात होऊन निराळ्याच वाटेनें जाणें मला भाग पडे. आणि त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, आयुष्यांत आज मी भलत्याच ठिकाणीं येऊन बसलों आहें. आणि त्याचमुळें पुष्कळांचा माझ्याविषयीं गैरसमज झालेला आहे—हो पण मला सांगायचें होतें तें निराळेंच. 'झेंडूच्या फुलां' बद्दल मी बोलत होतों नव्हे का ?

मला आठवतें तेव्हांपासून मी लिहितों आहें, अन् कविता करतो आहें. अकरा सालीं माझी बालकवि ठोमरे ह्यांच्याशीं ओळख झाली. ओळख झाली म्हणजे मी त्यांना ओळखूं लागलों. त्यांचा धाकटा भाऊ माझ्या वर्गांत होता. एकदोन वेळां मी त्यांच्या घरीं गेलों. आणि माझ्या काव्यलेखनाचें मीं त्यांना गुरु केलें. चौदा सालीं गडकऱ्यांचा नि माझा परिचय झाला. त्यांचाही धाकटा भाऊ माझ्याच वर्गांत होता. गडकऱ्यांच्या कविता मला अतिशय आवडत. बहुतेक साऱ्या मला जवळ जवळ तोंडपाठ होत्या म्हणानात. पण गडकऱ्यांच्या कवितेचा माझ्या काव्यावर परिणाम झाला नाहीं. माझें वळण बालकवींचेंच राहिलें. बालकवींच्या काव्याची जादूच मुळीं अशी कांहीं विलक्षण होती कीं त्यांचें अनुकरण करण्याचा मोह गडकऱ्यांना देखील

टाळतां आला नाहीं. मग माझी (काय कथा) कथा काय ? वाङ्मयीन आयुष्याच्या अगदीं प्रारंभालाच गडकऱ्यांचा, बालकवींचा नि माझा निकट संबंध आला. त्याचा एक परिणाम असा झाला कीं, वाङ्मयाच्या शुद्ध आणि अभिजात परंपरांची मला गोडी लागली आणि त्या बाबतींतील माझी अभिरुचि अतिशय खाष्ट आणि चोखंदळ बनली. ज्याला उत्तम लेखक व्हावयाचे आहे त्याचें नाक आणि जीभ भारी तिखट असायला पाहिजेत. कुठें काय बिघडलें याचा त्याला चटकन् वास आला पाहिजे. आणि मालमसाला कुठें कमी पडला आणि कुठें जास्त झाला हें तावडतोब त्याच्या चवीला समजलें पाहिजे. आजच्या काळांत दोन आण्याची भाताची ताटली जेवण्याची लोकांना संवय लागल्यामुळें कोणतें कदन्न आणि कोणतें पक्वान्न हें त्यांना मुळीं कळेनासेंच झालें आहे. कशांतच कोणाला कांहीं चव राहिली नाहीं. ' वाङ्मयीन अभिरुचि ' या शब्दाला आज फारसा अर्थ राहिला नाहीं. म्हणूनच विडंबनाचें महत्त्व काय आहे आणि वाङ्मयांत त्याची आवश्यकता कां निर्माण होते हें सामान्य वाचकांना समजाऊन सांगणें कठिण आहे.

ज्या काळांत मी कविता लिहूं लागलों तो ' नवीन कविते 'च्या वैभवाचा काळ होता. केशवसुतांच्या ' तुतारी 'च्या ललकाऱ्या त्यावेळीं वातावरणामध्यें एकसारख्या उचंबळत होत्या. बालकवींच्या प्रतिभेचा ' अरुण ' महाराष्ट्राच्या क्षितिजावर नुकताच उगवलेला होता. ' पंचप्राणांचा पंचम ' लावून गोविंदाग्रज कोकिळाच्या उन्मादानें प्रेमाची रागदारी आळवीत होते. ' बी ' कवींच्या चौघड्यानें नि तांबे कवींच्या सनईनें शारदेच्या मंदिरांत माधुर्याबरोबरच एक प्रकारचें मांगल्यही निर्माण झालें होतें. नवकवितेची एक विलक्षण धुंदी आमच्या डोळ्यांवर त्यावेळीं चढली होती. डोक्यामध्यें एक प्रकारची मस्ती भरून राहिली होती. या धुंदीमधून आम्हांला वीस-एकवीस सालीं पुण्याच्या ' रविकिरण मंडळा 'नें जागें केलें. नुसतें जागें केलें नाहीं तर गार पाण्याची बादली घेऊन ती आमच्या डोक्यावर त्या मंडळानें अक्षरशः भडभडा ओतली. त्याचा परिणाम दुसऱ्या कोणावर काय झाला ते मी कांहीं सांगूं शकत नाहीं. पण माझ्या स्वतःवर तरी तो असा झाला कीं भावकाव्याचें गंभीर अवगुंठन झुगारून देऊन माझ्यामधला व्रात्य विडंबनकार डरकाळी फोडून एकदम बाहेर पडला. माणसावर आकस्मिक आपत्ति आली

म्हणजे एका रात्रींत त्याचे काळे केस जसें पांढरे होतात तसें माझें झालें. माझ्या प्रतिभेला आलेलीं 'दुपारीचीं फुलें' एकदम गळून पडलीं. आणि तिच्यावर सरासरा 'झेंडूचीं फुलें' फुलून आलीं. 'रविकिरण मंडळ' जर प्रकट झालें नसतें तर माझ्या बुद्धीच्या खोल कपारी-आडून विनोदाचा चांगला मनगटाएवढा झरा वाहतो आहे याचा मला मुळींच सुगावा लागला नसता. हें अगदीं खरें आहे!' 'रविकिरण मंडळा'नें इतर पुष्कळ कामगिरी केलेली असेल. त्याच्याशीं मला या ठिकाणीं कर्तव्य नाहीं. पण मला त्यानें विडंबनकार बनविलें ही माझ्या दृष्टीनें विशेष महत्त्वाची गोष्ट आहे.

अठरा-एकोणीस सालीं 'बालकवि' आणि गडकरी वारले. त्यामुळें कविता एकदम मंदावल्यासारखी झाली. म्हणजे जवळ जवळ तिची ज्योत अगदीं मालवण्याच्या बेतांत आली. शारदेच्या अंगणांत काळोख पसरला. बारीकसारीक कवि आपापल्या घराची दारें बंद करून आणि डोक्यावर दुलया ओढून गप्प बसले. बाहेरच्या काळोखांत एकटयादुकटया कवीला फिरण्याची जणूं कांहीं प्राज्ञाच नव्हती. अशा वेळीं पुण्यांतले सात-आठ कवि एकमेकांचा हात धरून भीतभीत एका ठिकाणीं जमले आणि त्यांनीं एका कोपऱ्यांत एक लहानशी शेकोटी पेटविली. तिचें नांव 'रविकिरण मंडळ'. ही मंडळी दर रविवारीं एकत्र जमत. आणि लिहिलेल्या कविता चहा पितां पितां ते एकमेकांना वाचून दाखवीत आणि त्यांवर चर्चा करीत. कवींचीं मंडळें त्यापूर्वीं महाराष्ट्रांत स्थापन झालीं नव्हतीं असें नव्हे. पण 'रविकिरण मंडळा'चें स्वरूप अभिनव होतें. काव्यनिर्मितीसाठीं स्थापन झालेली ती एक प्रकारची सहकारी पेढीच होती म्हणानात. या मंडळींतले कांहीं कवि व्यक्तिशः त्यावेळीं महाराष्ट्रांत थोडयाफार प्रमाणानें माहीत होते. नाहीं असें नाहीं. पण त्यांना विशेष प्रसिद्धि अशी मिळाली नव्हती. त्यांच्या काव्यांत तोंपर्यंत तसें कांहीं वैशिष्टय प्रकट झालें नव्हतें. पण 'रविकिरण मंडळां'त ही मंडळी सामील झाल्यापासून त्यांच्या पूर्वीच्या स्वरूपांत एकदम फरक पडला. आणि त्यांपैकीं कांहींची चेहरेपट्टी तर अजिबात बदलून गेली. ही किमया त्यांमधल्या केवळ एकाच माणसानें केली. त्यांचें नांव प्रा. माधवराव पटवर्धन किंवा माधव जुलियन्. हेच 'रविकिरण' मंडळां'तले खरे 'रवि' होते. बाकीचीं निदान त्यावेळीं तरी 'किरणें' होतीं.

माधव जूलियन हे फर्ग्युसन कॉलेजांत फार्शी भाषेचे प्राध्यापक म्हणून नुकतेच त्यावेळीं नेमण्यांत आलेले होते. फार्शी कवितेचा आणि फार्शी भाषेचा त्यांच्यावर त्या वेळीं विलक्षण पगडा बसलेला होता. त्यामुळें कवितेच्या प्रांतांत सामान्यपणें वावरणाऱ्या माणसापेक्षां त्यांच्यामध्यें एक वेगळेंच व्यक्तिमत्त्व तयार झाले होतें. त्यांच्या विचारांत आणि भाषेंत अनेक चमत्कारिक खोडी भरलेल्या होत्या. त्याचा परिणाम 'रविकिरण मंडळा'च्या सभासदांवर इतका झाला कीं, त्यांपैकीं पुष्कळसे माधव जुलियन्च्या दृष्टिकोनानें काव्याकडे पाहूं लागले आणि जवळ जवळ त्यांच्याच वृत्तांत नि भाषेंत कविता लिहूं लागले. केशवसुतांनीं आणि त्यांच्या अनुयायांनीं निर्माण केलेल्या नवकवितेच्या बाळबोध परंपरांशीं माधव ज्यूलियनांनीं सुरू केलेला 'रविकिरण मंडळा'चा 'फार्शी फॅशन' पंथ अतिशय विसंगत होता. गणपतीची आरती चालू असतांना त्याच ठिकाणीं 'गॉड सेव्ह द किंग' हें गाणें एकाद्यानें सुरू करावे म्हणजे भाविक मनाला कसें वाटेल ? तसें मला वाटलें. विडंबन-काव्य ही त्याच माझ्या दुखावलेल्या भावनेची वाङमयीन प्रतिक्रिया होती.

माधव जूलियन यांच्या समग्र काव्यावर मी कांहीं या ठिकाणीं अभिप्राय देत नाहीं. किंवा त्यांच्या वाङमयांत अभिजातपणा नव्हता असेंही पण मी येथें सुचवीत नाहीं. माधव जुलियन् यांच्या काव्याचा आत्मा आणि पिंड पुढें इतका बदलत गेला कीं अखेर आरशांत त्यांना आपला चेहरा ओळखतां आला असतां कीं नाहीं याची शंका आहे डोक्यावरची साहेबी टोपी जाऊन त्या ठिकाणीं पुणेरी लाल पगडी येईपर्यंत त्यांच्या जीवनांत आणि वाङमयांत उलथापालथ झाली म्हणून प्रामाणिक टीकाकार त्यांच्यावर सरसहा टीका करणें कठीण आहे. कारण कांहीं ठिकाणीं त्यांच्या लिखाणाचे वाभाडे काढावेसे वाटतात, तर कांहीं स्थळीं त्यांचें वाङमय डोक्यावर घेऊन नाचावेसें वाटतें. त्यांच्या प्रतिभेचा गेंद त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धांत उत्फुल्ल झाला हें खरें असलें तरी त्यांच्या कवितेचें प्रारंभीचें स्वरूप इतकें बेंगरूळ आणि धेडगुजरी होते कीं ते बघून आमच्यासारख्या शब्दसंगीताच्या आणि ध्वनिसौंदर्याच्या उपासकांना विलक्षण हादरा बसला. माधव जुलियन् यांची वृत्ति आणि प्रतिभा बंडखोराची होती यांत मुळींच संशय नाहीं. पण

केशवसुतांना ज्या अर्थानें बंडखोर कवि म्हणतां येईल त्या अर्थानें माधव जूलियन ह्यांना कांहीं बंडखोर म्हणतां यावयाचें नाहीं.

केशवसुतांचें बंड हें वैचारिक बंड होतें. खरें बंड होतें तें. माधव जूलियनांचें बंड हें निव्वळ भाषेपुरतें होतें. लहानपणीं आमच्या वर्गांत एक मुलगा होता. तो एके दिवशीं आपल्या भुंवया भादरून वर्गांत आला. त्याबरोबर मुलांमध्यें मोठा हंशा पिकला. शिक्षकानें विचारलें, "कारे, हें काय भलतेंच करून आलास?" तो मुलगा म्हणाला, "मग? भुवया राखल्याच पाहिजेत असें कोणी सांगितलें आहे? सगळें ज्याअर्थीं त्या राखतात त्याअर्थीं मी त्या काढून टाकायचें ठरविलें आहे." माधव जलियनचें बंड जवळ जवळ अशाच प्रकारचें होतें त्यांत विक्षिप्तपणाचा भाग विशेष होता. काव्याचें स्वरूप अशा तऱ्हेनें पाहिजे असें तुम्ही म्हणतां ना? कवितेमध्यें अमुक एक शब्द येतां कामा नये असा तुमचा आग्रह आहे ना? मग हें तुमचें म्हणणें मी नाहीं ऐकणार! हा तुमचा आग्रह मी नाहीं मानणार! ही माधव जूलियन यांची वृत्ति होती. वास्तविक अर्थाच्या आणि रसाच्या दृष्टीनें त्यांची कविता कांहीं तितकीशीं वाईट नव्हती. पण तिच्या विक्षिप्त शब्दभाषेमुळें आणि तऱ्हेवाईक छपाईमुळें ती विशेष हास्यास्पद वाटत होती. 'वन्दे त्वमेकम् अल्लाहु अक्बर' हा डोक्यावर पगडी आणि कमरेला लुंगी नेसलेल्या त्यांच्या त्या वेळच्या काव्याचा एकच विक्षिप्त नमुना माझ्या म्हणण्याची सत्यता पटवून द्यावयास पुरेसा आहे.

लेखक पुरोगामी वृत्तीचा असला म्हणजे त्याचा छांदिष्टपणा आणि तऱ्हेवाईकपणा क्षम्य ठरतो. केशवसुतांची भाषा आणि रचना कित्येक ठिकाणीं काय कमी बेडौल आहे? तथापि, त्यांच्या विचारांत एवढी क्रांति भरलेली आहे कीं तिच्या तेजामुळें डोळेच दिपतात. अन् मग त्यांच्या रचनेंतल्या दोषांकडे बघण्याचें कोणाला स्मरणही राहात नाहीं. माधवरावांचें तसें नव्हतें. त्यांच्या काव्यांत क्रांतिकारक असें कांहींही नव्हतें. कारण वैयक्तिक जीवनांत ते अतिशय प्रतिगामी होते. राष्ट्रीय चळवळीचें ते विरोधक होते. लोकमान्य टिळकांना सबंध पुणें शहरांतर्फे जाहीर मानपत्र देण्यासाठीं मंडईंत जी विराट सभा भरली होती त्या सभेंत टिळकांच्या मानपत्राला विरोध करण्यासाठीं ते उभे राहिले होते. दैवाने खैर केली म्हणूनच त्या

वेळीं ते बचावले. नाहीं तर खवळलेल्या जनसमूहानें त्यांची काय दशा करून टाकली असती त्याची कल्पनाही करवत नाहीं. सामाजिक विचारांतही ते बोलके सुधारक होते. आचारांनीं ते सनातनीच होते. प्रेमविवाह करण्याची सुंदर संधि त्यांच्यापुढें चालून आली असतां ती त्यांनीं वेंधळेपणानें दवडली, व स्वतःच्या चारित्र्याला विनाकारण ठपका लावून घेतला. राजकारणांत तर पुढें पुढें एकाद्या कडव्या हिंदुत्वनिष्ठापेक्षांहि ते मुसलमानांचे कट्टर द्वेष्टे बनले.

वास्तविक, माधवरावांच्या काव्यासंबंधीं बोलतांना या साऱ्या गोष्टी सांगण्याची जरुरी नाहीं. तथापि त्या सांगितल्यावांचून माधवरावांच्या प्रतिगामी स्वरूपाच्या वाङ्मयीन स्वरूपाच्या वाङ्मयीन विक्षिप्तपणाची कल्पना वाचणाराला यावयाची नाहीं म्हणून एवढ्या विस्तारानें त्या सांगितल्या. माधव जूलियनचें काव्य प्रथम प्रसिद्ध झालें त्या गोष्टीस आतां जवळ जवळ तीस वर्षें होत आलीं. त्या वेळीं माधवरावांच्या ज्या लकबी आणि तऱ्हा आम्हाला हास्यास्पद वाटत होत्या, त्या माधवरावांचें अनुकरण करणाऱ्या अलीकडच्या कविमंडळींनीं मराठी भाषेंत इतक्या रूढ करून टाकलेल्या आहेत कीं आतां त्यांचें एवढें हसूं येत नाहीं. ‘ उन्हाळे, पावसाळे अन् हिवाळे लोटले भगवान्’ किंवा ‘किती मैल अंतर राहिलें अपुल्यांत सद्गुण सुंदरी’ या ओळी आतां वाचल्या म्हणजे त्यामध्यें कुठें कांहीं तरी खटकतें आहे असें वाचकांना वाटणें कठिण आहे. म्हणून माधव जूलिअन् किंवा त्यांचे सहकारी कवि काव्यामधले दोष कोणते आणि त्यांचें विडंबन मीं कसें केलें हें ज्याला समजून घ्यावयाचें असेल त्याला त्या काळांतल्या रूढ वाङ्मयीन परंपरांचा फार मार्मिकपणें अभ्यास करावा लागेल.

माझ्या विडंबन काव्याची मौज अशी कीं, तीं बसल्या बसल्या आणि बोलतां बोलतां सहज गंमतीगंमतीनें तयार झालीं. तीं लिहिण्यांत केवळ स्फूर्तीचाच भाग होता. प्रयत्नाचा भाग मुळींच नव्हता असें म्हटलें तरी चालेल. तो बावीस सालचा मे महिना होता. शाळेला सुटी होती. आम्ही चार-पांच शिक्षक मित्र एके ठिकाणीं जमत असूं. आणि जवळ जवळ सबंध दिवस चकाट्या पिटण्यांत घालवीत असूं. चहा प्यायचा, विड्या ओढायच्या आणि तोंडाला येईल तें बोलायचें हा आमचा त्या वेळचा कार्यक्रम होता.

आमचें तें टोळकें ' पठाण क्लब ' या नांवानें संबोधलें जात असे. 'मंडळा 'च्या कवितांचा एक चिमुकला संग्रह त्याच सुमारास प्रसिद्ध झाला. आणि त्याची एक प्रत आमच्या मंडळांत कोणीं तरी आणली. झालें न् काय. पुढें सातआठ दिवस त्या संग्रहाखेरीज आमच्या तोंडांत दुसरी भाषा नव्हती. त्यामधल्या कोणत्याही कवितेच्या अंगावरची साल आम्हीं कांहीं शिल्लक ठेवली नाहीं. आमची पद्धत अशीं असे. कोणीं तरी एखादी कविता घ्यावयाची आणि तिच्यांतले दोष विशेष उघडकीला येतील अशा अतिशयोक्ति स्वरानें आणि अंगविक्षेपानें ती मोठ्यानें वाचून दाखवायची. आणि बाकीच्यांनीं मोठमोठ्यानें हसून त्यांतून उद्‌भवणाऱ्या विनोदाचा आस्वाद घ्यावयाचा.

'रविकिरण मंडळा 'च्या तऱ्हेवाईक काव्यांचें केवळ वाचनामध्यें आम्ही जें हें पद्धतशीर विडंवन चालविलें होतें .याचा परिणाम माझ्यावर तरी झाला कीं एके दिवशीं मला स्फूर्तीचा जबरदस्त झटकाच आला अन् मी विडंवन काव्याच्या ओळीच्या ओळी एकामागून एक बडबडूं लागलों. त्यामुळें आमच्या मंडळांत हास्यरसाला असा महापूर आला म्हणतां ! माझ्या मित्रांना भ्रम पडला. त्यांना कळेना कीं हें माझें काव्य आहे कीं ' रविकिरण मंडळा 'तल्या एकाद्या कवीचें काव्य आहे ! त्यावेळीं मला प्रथम जाणीव झाली कीं कांहीं तरी एक निराळी वल्ली आपल्या हातांत लाभली आहे, आणि ही आतां आपण गमावतां कामा नये. या मानसिक अवस्थेमधून ' झेंडूच्या फुलांचा ' जन्म झाला. त्यामधल्या बहुतेक कविता सात आठ दिवसांच्या काळामध्यें मी भराभर लिहून टाकल्या. कवितेमधल्या शाब्दिक दोषांचेंच केवळ मी विडंवन केलें नाहीं तर कवितेसाठीं निवडलेल्या विषयाची आणि काव्यांत ठिकठिकाणीं प्रकट झालेल्या कवींच्या स्वभावाचीही मी माझ्या विडंबनामध्यें दखलगिरी घेतली. मी त्या वेळीं लिहिलेलीं सगळींच काव्यें विडंबनात्मक नव्हतीं. कांहीं विनोदी कविताही त्या ओघांत मी लिहून टाकल्या. त्यापूर्वीं आधीं दोन तीन वर्षें माझें कवितालेखन अजिबात थांबल्या-सारखें झालें होतें. ते अशा आकस्मिक रीतीनें अगदीं निराळ्याच स्वरूपांत पुन्हा सुरू झालें.

बाविसच्या मे महिन्यांत मी ' झेंडूची फुलें ' लिहिलीं खरी. पण त्यांचें हस्तलिखित जवळ जवळ चार वर्षें माझ्याजवळ तसेंच पडून होतें.

त्या मधल्या कविता प्रसिद्ध करण्याचें किंवा त्या कोणाला वाचून दाखविण्याचें धैर्यच मला होईना. रिकामपणच्या वेळीं केलेला कांहीं तरी एक व्रात्यपणा यापलीकडे त्याचें मला महत्त्व वाटेना. पांच-दहा मित्रांपलिकडे त्याची कोणाला विशेष माहिती नव्हती. अधिक प्रमाणावर त्याची वाच्यता करण्यानें आपल्याला नांव मिळावयाच्या ऐवजीं जें कांहीं पूर्वी मिळालेलें आहे तें जायचें अशी मला भीति वाटत होती. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या अध्यक्षतेखालीं पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळामध्यें जें शारदोपासक संमेलन भरलें होतें त्यांमध्यें एका संध्याकाळीं 'झेंडूच्या फुलां'चें जाहीर वाचन करण्याचा पहिल्यानें योग आला. आम्ही पांच-पन्नास मंडळी अशी सतरंजीवर लोळत पडलों होतों. कांहींही उद्योग नव्हता आम्हाला. उगाच कांहीं तरी थट्टामस्करी चालली होती. इतक्यांत कोणी कोणाच्या कानांत कांहीं तरी कुजबुजलें. आणि या बैठकींत 'झेंडूच्या फुलां'चें वाचन झालें पाहिजे अशी चहूंकडून एकच आरोळी उठली. असे कांहीं तरी होणार अशी मला थोडीशी कल्पना होती. म्हणून हस्तलिखित खिशांत घालून मी आलोंच होतो. भीत भीत मी टेबलाजवळ गेलों आणि हलक्या आवाजांत कविता वाचनास सुरुवात केली.

ऐकणाऱ्यांची पहिली प्रतिक्रिया काय होईल यांची मला मुळीच कल्पना नव्हती. पहिल्या दोन ओळी वाचल्या नाहींत तोंच बैठकींतलें वातावरण एकदम बदललें. कांहीं तरी ही नवीन भानगड आहे असें प्रत्येकाला वाटलें. आरंभीं श्रोते बेताबेतानें हसत होते. पण पहिली कविता वाचून होतांच सारे मुक्तकंठानें हसूं लागले. आणखी दोन कविता वाचून होतांच सर्वांच्या हसतां हसतां मुरकुंडचा वळल्या. 'रविकिरण मंडळा'च्या कविता त्यांपैकीं बहुतेकांच्या उत्तम परिचयाच्या होत्या. त्या मंडळाच्या कवींच्या काव्यांत गुण काय आहेत आणि दोष काय आहेत याची त्यांना चांगलीच कल्पना होती. म्हणूनच आपल्या मनांतली टीका असें विनोदी स्वरूप धारण करून काव्य-रूपानें प्रकट झालेली पाहून त्या मंडळींना मनस्वी मौज वाटली. त्यांनीं सर्वांनीं माझी पाठ थोपटली, आणि आजपर्यंत हें 'रसायन' गुप्त ठेवून दिल्या-बद्दल मला दोष दिला. त्यानंतर दोन महिन्यांनीं 'झेंडूच्या फुलां'ची पहिली आवृत्ति मी प्रसिद्ध केली. ती पांचसहा महिन्यांच्या आंतच फस्त

झाली. ' झेंडूच्या फुलां 'च्या लोकप्रियतेचें एक वैशिष्टय असें होतें कीं वाङ्मयाशीं ज्यांचा सुतराम संबंध नाहीं अशा वाचकांना ती अतिशय आवडली· माझ्या माहितीचे पुण्यामधलें एक सुप्रसिद्ध वकील आहेत. त्यांनीं आयुष्यांत ' झेंडूचीं फुलें ' हें एकच मराठी कवितेचें पुस्तक वाचलेलें आहे. त्यावरून एक गोष्ट माझ्या लक्षांत आली कीं, विडंबनाचा भाग वजा करूनही ' झेंडूच्या फुलां 'मधल्या कवितेंत स्वतंत्र विनोदाचा भाग पुष्कळच आहे. आणि त्यामुळेंच इतकीं वर्षें होऊन गेलीं असतांही ' झेंडूच्या फुलां 'च्या लोकप्रियतेला अद्यापि खळ पडलेला नाहीं.

ज्यांच्या काव्यांचें मी विडंबन केलें ते ' रविकिरण मंडळा 'मधले कवि माझे मित्र होते. त्यांपैकीं कित्येकांचें तर माझ्याशीं अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यामुळें माझीं विडंबन काव्यें वाचून त्यांच्या भावना दुखूं नयेत आणि त्यांच्या माझ्या लोभांत अंतराय निर्माण होऊं नये अशी माझी मना-पासून इच्छा होती. विडंबित कवीची टर उडवावी किंवा त्याची फटफजिती करून त्यांना कवितेच्या क्षेत्रांतून उठवून लावावें असा कांहीं ' झेंडूचीं फुलें ' लिहिण्यांत माझा हेतु नव्हता. सदर कवींच्या काव्यांतले मला वाटणारें दोष हंसत हंसत आणि गमतीजमतीनें त्याच्या आणि त्याच्या वाचकांच्या निदर्शनाला आणावेत, आणि वाङ्मयांत एक नवी मौज निर्माण करावी एवढाच माझा उद्देश होता. सामान्य वाचकांच्या आणि श्रोत्यांच्या दृष्टीनें तो माझा हेतु अपेक्षेपेक्षां यशस्वी झाला. पण विडंबित कवींचीं मनें न दुखावलीं जाण्याच्या बाबतींत मात्र मला तितकेसें यश आलें नाहीं. कांहीं कविमित्र माझ्यावर अतिशय रागावले आणि कांहींना मनापासून वाईट वाटलें. माधव जूलियनच्या बाबतींत माझ्याकडून एकच अपराध झाला· त्यांच्यावरील एका विडंबनांत त्यांना लागेल असा वैयक्तिक संदर्भाचा एकच शब्द होता. वास्तविक त्याची कांहीं आवश्यकता नव्हती. पण तो वापर-ण्याचा मोह त्या वेळीं मला कांहीं आवरतां आला नाहीं. ' झेंडूच्या फुलां 'च्या पुढील आवृत्तींत मीं तो उल्लेख कटाक्षानें काढून टाकला. आणि जाहीर काव्य वाचनांत तर मी ती विशिष्ट ओळ कधींच वाचून दाखवीत नसे. तथापि त्यामुळें माधवरावांचें आणि माझें पुष्कळ दिवस वाकडें आल्यासारखें झालें होतें.

सत्तावीस सालच्या मे महिन्यांत श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या अध्यक्षतेखालीं पुण्यामध्यें साहित्य संमेलन भरलें होतें. त्या संमेलनांत जाहीर काव्य-गायनाचा किर्लोस्कर नाटकगृहांत जो एक टोलेजंग कार्यक्रम झाला त्यामध्यें ' झेंडूच्या फुलां 'मधील पांच-दहा कविता मी म्हणून दाखविल्या. अर्धा तासपर्यंत सारें नाटकगृह हशानें आणि टाळचांच्या कडकडाटानें अगदीं दणाणून गेलें. श्रोते माझ्या विडंबन-काव्यावर इतके बेहद्द खूष होऊन गेले कीं कांहीं विचारूं नका. लोकांनीं मला अक्षरशः अगदीं डोक्यावरच उचलून घेतलें. ' झेंडूच्या फुलां 'चा महाराष्ट्रीय रसिकांनी केलेला तो पहिला जाहीर सत्कार होता. आपल्या काव्यावर केलेल्या विडंबनाचें जाहीर वाचन ' महाराष्ट्र साहित्य संमेलना 'मध्यें व्हावें आणि त्याचा एवढा गाजावाजा व्हावा ही गोष्ट ' रविकिरण मंडळा 'च्या कांहीं सभासदांना मुळींच आवडली नाहीं. त्यांनीं संमेलनाचें अध्यक्ष तात्यासाहेब कोल्हटकर यांच्याकडे जाऊन हट्ट धरला कीं या गोष्टीबद्दल त्यांनी आपल्या उपसंहाराच्या भाषणामध्यें तीव्र नापसंती जाहीरपणें व्यक्त करावी. तात्यासाहेबांनीं ती गोष्ट मान्य केली. कारण ' रविकिरण मंडळा 'तील कांहीं सभासदांना तरी नाखूष करण्याचें मनोधैर्य तात्यासाहेबांच्या जवळ त्या वेळीं नव्हतें. आदल्या रात्रीं काव्य-गायनांच्या कार्यक्रमांत मी विडंबन-काव्यें म्हटलीं या गोष्टीची तात्यासाहेबांनीं आपल्या उपसंहाराच्या भाषणामध्यें अगदीं कडक शब्दांत निर्भत्सना केली. जवळ जवळ तो माझ्या ' झेंडूच्या फुला 'चा निषेध होता. विनोदाच्या बाबतींत जे माझ्या गुरुचेंही गुरु होते, त्यांच्या तोंडून माझ्या पहिल्या विनोदी लेखनावर जाहीरपणें असा नापसंतीचा शिक्का बसावा हा योगायोग मोठा विचित्र होता ! तात्यासाहेबांच्या तोंडून निघणारे कटु शब्द अगदीं चाबकाच्या फटकाऱ्याप्रमाणें माझ्या काळजाला झोंबले आणि माझ्या डोळचांत अश्रु उभे राहिले. पण तें दुःख मी मनांतल्या मनांत तसेंच गिळून टाकलें. कारण तात्यासाहेबांचें' झेंडूच्या फुलां 'वरील तें प्रतिकूल मत आज ना उद्यां बदलल्यावांचून राहणार नाहीं अशी माझ्या मनानें त्यावेळीं मला खात्री दिली आणि पुढें तसेंच घडून आलें. कांहीं वर्षांनीं ' झेंडूच्या फुलां 'वर तात्यासाहेबांनीं स्वहस्तानें विस्तृत अभिप्राय लिहून पाठविला आणि त्यांत माझ्या विडंबनकाव्याची त्यांनीं मुक्तकंठानें स्तुति केली. मात्र ' रविकिरण

मंडळा 'च्या सभासदांना वाईट वाटेल म्हणून त्या अभिप्रायाची मी कुठेंही वाच्यता करूं नये असें त्यांनीं मला बजावून ठेवलें. तात्यासाहेबांच्या स्वभावातला तो 'विनोद' बघून मी त्यावेळीं पोटभर हसलों.

पुढें कांहीं वर्षांनीं 'रविकिरण मंडळा 'च्या सभासदांच्या मनामधली माझ्या विषयींची अढीही उलगडून गेली. आणि 'झेंडूच्या फुलां 'मधील विनोदाचा आस्वाद अगदीं निःसंकोचपणें आणि मनमोकळेपणानें घेण्यासारखी त्यांची मनःस्थिति झाली. अनेक वेळां तर एकाच व्यासपीठावरून आम्हीं सर्वांनीं आपापल्या कविता म्हणून दाखविलेल्या आहेत. मी केलेल्या विडंबनाबद्दल ज्यांचा मजवर शेवटपर्यंत राग राहिला आणि ज्यांनी त्या बद्दल मला मुळींच क्षमा केली नाहीं असे एकच कवि होते. ते म्हणजे प्रा. श्री. नी. चाफेकर. प्रत्येक बारीकमोठ्या लिखाणाच्या आणि व्याख्यानाच्या अखेरीस ज्ञानेश्वराचें 'पसायदान' आणल्यावांचून चाफेकर कधींही राहात नसत. या त्यांच्या खोडीचें मी जेव्हां विडंबन केलें तेव्हां एका व्याख्यानांत ते अतिशय संतापून म्हणाले कीं, "प्रत्येक वेळीं मी शेवटीं ज्ञानोबांचें 'पसायदान' आणतों म्हणून हा अत्रे माझी थट्टा करतो, मग 'पसायदान' म्हणायचें सोडून मी काय 'गॉड सेव्ह दि किंग' म्हणूं म्हणजे या अत्र्याचा आत्मा संतुष्ट होईल?" चाफेकरांना प्रत्येक शब्दामागें 'सत्' आणि 'सु'चें टोपण घालण्याचें विलक्षण वेड होतें. त्याचें मीं 'सदंगी माझ्या सत्कोट। सत्पगडीचा वर थाट' असें विडंबन केल्यामुळें ते माझ्यावर फारच भडकले.

एकदां तर चाफेकरांची मीं फारच गंमत केली. पुण्याच्या 'नगर वाचन मंदिरांत एका कोजागिरीच्या रात्रीं 'मराठी काव्य' या विषयावर माझें व्याख्यान होतें. अध्यक्षस्थानीं स्वतः प्रा. चाफेकरच होते. कारण ते वाचन-मंदिराचेंच अध्यक्ष होते. मीं माझ्या व्याख्यानांत मराठी भाषेमधील निरनिराळ्या भिकार काव्यांचे नमुने सांगून श्रोत्यांमध्यें विलक्षण हंशा पिकविला. ते नमुने कोणाचे तें मी श्रोत्यांना मुळीं सांगितलेंच नाहीं. अध्यक्षीय खुर्चीवर प्रा. चाफेकर भयंकर चेहरा करून बसले होते आणि मनांतल्या मनांत मजवर दांतओठ खात होते. कारण मी माझ्या व्याख्यानांत श्रोत्यांना सांगत असलेले भिकार कवितेचे बहुतेक सर्व नमुने त्यांच्याच काव्यांमधले होते! पुढें शेवटीं शेवटीं तर चाफेकर माझ्यावर इतके चिडले कीं, 'एकावली'

नांवाच्या एका काव्यांत त्यांनीं मला ‘ डुक्कर ’ अशी शिवी हांसडली ! चाफेकरांच्या बाबतींत माझ्याकडेच बराचसा दोष येतो. मीं त्यांच्यामागें एवढें हात धुवून लागायला नको होतें. मी त्यांच्या दोषांकडे दुर्लक्ष करावयास हवें होतें.

‘ झेंडूच्या फुलां ’ना महाराष्ट्रांत जेवढी लोकप्रियता मिळाली तेवढी कोणत्याही काव्यप्रकाराला आजपर्यंत मिळालेली नाहीं हें अगदीं सत्य आहे. ‘ झेंडूच्या फुलां ’मुळें विडंबनाला मराठी वाङमयामध्यें स्वतंत्र स्थान मिळालें. आणि त्या विषयावर गेल्या पंधरा वीस वर्षांमध्यें अनेक विद्वानांनीं विवेचनात्मक लेख लिहून चर्चा केली. शाळेच्या आणि विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमांत विडंबन-काव्याचा शिरकाव झाला. मध्यंतरी कांहीं वर्षें तर विडंबनकाव्याला महाराष्ट्रांत असा पूर येऊन गेला कीं कांहीं विचारूं नका. तथापि, श्री. अनंत काणेकर आणि श्री. दत्तु वांदेकर यांच्याखेरीज विडंबन काव्यप्रकार माझ्यानंतर कोणालाही विशेष साधलेला नाहीं असें माझें प्रांजल मत आहे. गद्य विडंबनें लिहिण्याचें बाबतींत श्री. पु. ल. देशपांडे यांनीं अलिकडे कौतुकास्पद यश मिळविलें आहे, हेंहि मला या ठिकाणीं नमूद करावेसें वाटतें.

अद्यापि, विडंबनाचें रहस्य पुष्कळांच्या मुळीं ध्यानांतच आलेलें नाहीं. कांहीं तरी अवर्चिय विषय घेऊन अद्वातद्वा रचना केली म्हणजे विडंबन काव्य होतें, अशीच बहुतेक ‘ विडंबन ’ कारांची समजूत दिसते. काव्यरचनेच्या तंत्रावर प्रभुत्व असल्यावांचून आणि काव्याच्या अंतरंगांतल्या बारीकसारीक मख्ख्यांचें मार्मिक ज्ञान असल्याखेरीज विडंबन-काव्य लिहितां येणें अशक्य आहे हें फारच थोड्यांना माहीत आहे. सर्कशीमध्यें विदूषक घोड्यावर बसण्याचें विडंबन करून जो हशा पिकवितो त्याचें एकच कारण म्हणजे तो स्वतः पट्टीचा घोडेस्वार असतो. स्वतः निर्दोष काव्य जो लिहूं शकतो तोच दुसऱ्यांच्या काव्यामधल्या दोषांचें विडंबन करूं शकेल किंवा त्यालाच तसें विडंबन करण्याचा अधिकार पोहोंचतो. तथापि, विडंबनकाराच्या अंगांत एवढाच गुण असून भागत नाहीं. त्याच्या अंगांत तल्लख विनोदबुद्धि असेल तरच त्याला प्रभावी विडंबनें लिहितां येतील ! विनोदबुद्धीच्या अभावीं विनोदी काव्य लिहिण्याचा प्रयत्न केला म्हणजे तो किती कृत्रिम आणि हास्यास्पद होतो हें ज्याला पाहावयाचें असेल त्यांनीं माधव ज्यूलियन यांचें ‘ नकुलालंकार ’ वाचून पहावें. ‘ झेंडूचीं फुलें ’ निर्माण होण्यास जी परिस्थिति कारण झाली ती लक्षांत घेतल्यावांचून विडंबन काव्याच्या खऱ्या स्वरूपाचें आकलन होणार नाहीं.

विडंबन काव्य हा एक वाङमयीन टीकेचा अत्यंत सुसंस्कृत आणि प्रभावीं प्रकार आहे. विडंबनाचें हत्यार फार कौशल्यानें आणि कोमलतेनें वापरायला हवें. विडंबनकाराचीं वाङमयीन अभिरुचि फारच उच्च दर्जाची असावयास पाहिजे. सौंदर्यसमीक्षणाचें फारच सूक्ष्म सामर्थ्य त्याच्या अंगीं असावयास हवें. ध्वनीच्या आणि अर्थाच्या अगदीं बारीकसारीक छटा देखील त्याच्या नजरेंतून सुटतां कामा नयेत. ज्या भाषेमधलें वाङमय अत्यंत प्रगल्भ आणि संपन्न आहे आणि ज्या भाषेच्या लोकांची वाङमयीन अभिरुची अत्यंत उच्च दर्जाची आहे त्याच भाषेंत उत्तम गद्य वा पद्य विडंबनें निर्माण होण्याची शक्यता जास्त आहे. इंग्रजी भाषेंत विडंबन-वाङमयाचें केवढें तरी श्रीमंत दालन आहे ! त्या वाङमयाचा अभ्यास करण्यासाठीं एका माणसाला आपला सर्व जन्म खर्च करावयाला पाहिजे. ‘ विडंबन ’ या शब्दाचा अर्थ ‘ हास्यास्पद नक्कल करणें ’ किंवा ‘ वेडावण्या दाखविणें ’ असा होत असल्यानें आणि ‘ विडंबना ’चें ‘ विटंबने ’शीं अधिक साम्य असल्यामुळें सदर वाङमयप्रकार हा अनिष्ट आहे असा सामान्य माणसाच्या मनावर एक संस्कार होत असतो. तो मात्र बरोबर नव्हे असें मला या ठिकाणीं आग्रहानें सांगावयाचें आहे. ‘ विडंबन ’ ही संभावित साहित्यिकांनी करण्यासारखी गोष्ट नाहीं असाही त्या नांवावरून एक ध्वनि सूचित होतो. पण तोही भ्रामक आहे. कारण विडंबन हा विरोधी भक्तीचा एक प्रकार आहे. ज्या काव्याचें विडंबन करावयाचें किंवा ज्या कवींचें विडंबन करावयाचें, तें काव्य आणि तो कवि लोकप्रिय असावयाला हवा. तरच त्याच्या विडंबनाची गोडी अधिक. लुंग्यासुंग्या कवीचें किंवा काव्याचें विडंबन मुळीं होऊंच शकत नाहीं. आणि झालें तर तें वाचणार कोण आणि समजणार कोणाला ?

‘ रविकिरण मंडळा ’तले कवि जर फाटके तुटके असते आणि त्यांच्या काव्यांत गुणांचा लवलेश नसता तर ‘झेंडूच्या फुलां’ना महाराष्ट्रांत जी अपरंपार लोकप्रियता लाभली ती मुळीं लाभलीच नसती. एखाद्या कवीचें विडंबन करणें म्हणजे त्याबद्दल अप्रत्यक्षपणें आदर व्यक्त करण्यासारखेंच आहे. विडंबन काव्याचें हें स्वरूप एकदां लक्षांत आलें म्हणजे विडंबनकाराबद्दल कोणाचाही गैरसमज होणार नाहीं—वाचकांचा नाहीं आणि विडंबितांचाही पण नाहीं ! उलट विडंबनकार हा पुष्कळांना आपला मित्रच आहे असें वाटेल !

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 26650 वि: 1
क्रमांक 9224 नों दि: 25/5/60

१

## चांगुणेचें बालपण

[खालील उतारा आचार्य अत्रे यांच्या 'चांगुणा' नांवाच्या प्रसिद्ध कादंबरींतून घेतलेला आहे. आचार्य अत्रे हे सिद्धहस्त लेखक आहेत. त्यामुळें साहित्याचा कोठलाहि प्रकार ते सुंदरतेनें व सहजतेनें लिहूं शकतात, हें त्यांच्या या कादंबरीनें सिद्ध केलें आहे. या कादंबरींतील नायिका चांगुणा नांवाची एक सुंदर पण खेडवळ मुलगी आहे. या मुलीच्या पाठीस दुर्दैव हात धुऊन लागतें व तिच्यावर एकामागून एक अनेक संकटें येतात. संकटांच्या माऱ्यानें शेवटीं जर्जर होऊन चांगुणा मृत्युमुखीं पडते. ही कादंबरी करुण रसानें परिपूर्ण आहे. सुंदर, गोड स्वभावाची, सरळ मनाची, फुलांचें अतोनात वेड असलेली अन् स्वत:च्या मित्रमैत्रीणींवर अकृत्रिम लोभ करणारी, खेळकर चांगुणा या उताऱ्यांत आपल्याला पाहायला मिळते. परंतु कादंबरीच्या नंतरच्या भागांत मात्र अशा निरागस मुलीवर आलेलीं संकटें पाहून वाचकांचीं मनें गहिंवरून आल्याशिवाय राहात नाहींत. या कादंबरींतील चांगुणा व तिची कहाणी लेखकानें प्रत्यक्ष डोळ्यानें पाहिलेली आहे. कथानकाला वास्तवतेचा असलेला आधार व दीनदुबळ्यांबद्दल लेखकाला वाटणारी आस्था यांमुळें ही कादंबरी अत्यंत सरस उतरली आहे. प्रस्तुत उताऱ्यांतील चांगुणेच्या बालपणांतील कांहीं प्रसंग वाचून वाचकांना आपल्या बालपणाची आठवण झाल्याशिवाय राहाणार नाहीं, इतके ते सरस व रेखीव उतरले आहेत.]

* * *

सासवडपासून साडेतीन मैलांवर चांबळी नांवाचें एक खेडें आहे. सगळा मिळून शें-दोनशें उंबरा असेल तिथें.

गांवाच्या अगदीं जवळून नदी वाहते. तिचेंही नांव चांबळीच. नदी कसली, झराच तो. तिच्या पलीकडच्या कांठाला थोडीशी झाडी आहे. तिच्यांतलीं कांहीं कांहीं वडाचीं न् चिंचेचीं झाडें शें-दोनशें वर्षांचीं आहेत. ह्याच झाडींत बाणेश्वराचें देऊळ आहे. त्याची बांधणी हेमाडपंती आहे असें म्हणतात.

देवळाचें आवार ऐसपैस आहे. त्यांत दोनचार झाडें आहेत. बेलाचीं न् बकुळीचीं. बकुळीच्या झाडाखालीं चिमुकल्या पिंगट फुलांचा सडा नेहमीं सांडलेला असायचा. उंच दगडी पायऱ्या चढून देवळाच्या फरसबंद आवारांत पाऊल टाकलें कीं पहिल्यानें ह्या फुलांचा सुवास आल्यावांचून राहात नाहीं. पावसाळ्यांत बेलाच्या फुलांचा मंद वास त्यांत हमखास मिसळलेला असायचा. चांगुणा पाणी भरायला नदीवर आली कीं तपेलें वाळूंत ठेवून बकुळीचीं फुलें गोळा करायला ती देवळाकडे धावली नाहीं असें कधीं होत नसे.

चांगुणा ही राघू कामठ्याची सगळ्यांत धाकटी मुलगी. तिची थोरली बहीण गोजा ही कोंढितच्या बडघ्याकडे दिली होती. अन् मधली बहीण सगुणा. तिची भिवंडीच्या पवाराशीं सोयरीक झाली होती. चांगुणा सगळ्यांत धाकटी लेक. म्हणून ती आपल्या आईची लई लाडकी होती. बारावें वरीस संपून तिला श्रावणांत चांगलें तेरावें लागलें, तरी तिचें लगीन करण्याची गोष्ट आपल्या नवऱ्याच्या समोर राही कधीं काढीत नसे.

चांबळीच्या अलीकडच्या कांठाला अगदीं नदीला लागून राघूचें घर होतें. अन् घरालगतच त्याची बिघाभर जमीन होती. चारदोन वर्षांत एकदां तरी चांबळीला मोठा पूर येई. तेव्हां पुराच्या पाण्यांत राघूची अर्धी जमीन बुडून जाई. पुरामधून गाळही खूप वाहून येई. पण पूर ओसरला कीं नदीच्या पात्रांत घोटाभर देखील पाणी राहात नसे. म्हणून राघूनें शेताच्या कांठावर एक ' बुडखी ' विहीर बांधली होती. त्यामुळें पाण्याची त्याला कधीं तूट नसे.

इन मीन तीन माणसांचा तर राघूचा संसार. जमीन थोडी असली तरी त्याचें तिजवर उत्तम भागे. तो आणि त्याची बायको राही इरभळ त्या तुकड्यावर राबत. कांहीं ना कांहीं त्यांचें आपलें तेथें सारखें चाललेलें असे.

गांवाकडच्या बाजूला कमरेइतक्या उंच अन् मधून मधून पडलेल्या पांढुरक्या मातीच्या लांबलचक भिंतीचा त्या जमिनीला आडोसा होता: ह्या भिंतीच्या आंतल्या अंगाला अडुळशाच्या अन् कोरफडीच्या झुडपांची बरीच गर्दी वाढली होती. त्यामुळें औषधासाठीं अडुळशाचीं पानें अन् कोरफड मागायला गांवांतल्या आयाबाया आपल्या नेमक्या तिथें यायच्या. अन् अडुळशाचीं फुलें तोडून त्यांच्या देंठांतला गोड रस चोखायला भिंतीवरून चढून येणाऱ्या पोरट्यांचा त्रास काय कमी होता म्हणतां ?

दक्षिणेच्या अंगाला हिरव्या शेरांच्या झाडांचे दाट कुंपण होतें. तर नदीच्या बाजूला पांढऱ्या चाफ्याचीं तीनचार झाडें. दुसऱ्या कोपऱ्यांत पिवळ्या फुलांच्या बिट्यांचीं हिरवीगार झाडें अन् घराकडच्या अंगाला दोनचार उंच शेवग्याचीं झाडें. ह्यामुळें राघूचें तें परडेंवजा शेत नेहमीं टवटवीत आणि शोभिवंत दिसे.

सगुणेचें लगीन झालें तेव्हां चांगुणा नऊ वर्षांची होती. तेव्हांपासून ती आपल्या आईला घरांत अन् शेतांतल्या साऱ्या कामांत बरोबरीनें मदत करूं लागली. घरांतलें पाणी तीच भरी. वासराला पाणी पाजायला नदीवर घेऊन जाई. शेरड्यांसाठीं आकडी घेऊन ती बाभळीचीं पानें बाहेरून तोडून आणी. घराच्या भिताडावर चढून शेवग्याच्या शेंगा ती काठीनें झोडपून पाडी. चाफ्याच्या झाडावर फुलें तोडायला तर ती मांजरासारखीं सरसर चढे.

आई तिच्या अंगावर नेहमीं ओरडे—" अग, चाफ्याच्या झाडावर नग चढूंस. फांदी एकाद येळीं तुटल. खालीं पडशील. हातपाय मोडून घेशील." पण चांगुणा कुठली तिचें ऐकायला !

चाफ्याच्या फुलांचा एक पांढरा सफेत झुबका झाडाच्या अगदीं शेंड्याला लागला होता. तो तोडायसाठीं एकदां चांगुणा नेट धरून अगदीं वरपर्यंत चढली. झुबका आतां आटोक्यांत आला असें बघून तिनें हात पुढें केला. तोंच त्याच्या खालच्या फांदीला वेटोळें घालून बसलेल्या एका कवड्या सापानें आपलें निमुळतें तोंड एकदम खालीं सोडून दिलें. धबकन् ती आदळली. पण ओरडली नाहीं कीं आरडली नाहीं. खालीं दगडबिगड नव्हते म्हणून बरें झालें. जमिनीवर ती तशीच पांचदहा मिनिटें निपचित पडून राहिली. अन् मग मुकाट्यानें उठून आपल्या पायीं घरांत चालत गेली. चारदोन दिवस

तिचें अंग असें ठणकत होतें म्हणतां; पण आपलें दु:ख अक्षरानें सुद्धां तिनें आईला सांगितलें नाहीं.

फुलांचा तिला भारी नाद. एकदां कण्हेरीचीं फुलें तोडायला ती झुडपांच्या गर्दींत शिरली. खालीं चांगलीच पाणथळ होती. अन् चिखलही पुष्कळ होता. त्यांत ठिकठिकाणीं खेकडयांचीं बिळें होतीं. त्यांतून कुठूनतरी एक खेकडा बाहेर आला. आणि त्यानें तिच्या पायाची करंगळीच पकडली. पण तिनें हूं का चूं सुद्धां केलें नाहीं. फुलें तोडायचीं होतीं तीं शांतपणें तोडलीं. अन् बाहेर कोरडयावर येऊन तिनें तो खेकडा तटकन् तोडून काढला. बोटांतून रक्त भळभळां वाहूं लागलें. त्यावर माती घालून तिनें तें बंद केलें.

कुठें झाडावर चढ, कुठें धांवतांना पड, कुठें कांटयाकुटयांत शिरल्यामुळें चांगुणेच्या अंगावर नेहमीं लाल लाल ओरखडे तरी उठलेले असायचे, नाहीं तर हातापायांच्या एखाद्या बोटाला मळकी चिंधी तरी बांधलेली असायची. पायांत कांटा मोडला नाहीं असा तर तिचा एक आठवडा जात नसे. मग घरांतून ती सुई घेऊन गुपचुप बाणेश्वराच्या देवळांत जाई. दीपमाळेच्या आडोशाला बसे. अन् हलक्या हातानें टोकरून टोकरून कांटा काढी. गुरवाच्या शंकरकडून नंदादीपामधलें तेल आणून तें दुखऱ्या जागेवर लावलें म्हणजे तिला जरा बरें वाटे.

सुताराची चंद्री आणि गुरवाचा शंकर ह्या दोघांशींच काय ती तिची मैत्री होती. चंद्री तिच्यापेक्षां दोन वर्षांनीं मोठी होती. शंकर मात्र अगदीं तिच्याच वयाचा होता. चंद्रीचें लगीन झालें अन् ती सासरीं निघून गेली. रडून रडून चांगुणेनें त्या दिवशीं आपले डोळे मुठीमुठीएवढे केले. तेव्हांपासून तिला शंकरखेरीज गांवांत दुसरा कोणी सोबतीच उरला नाहीं.

शंकरच्या बापाच्या अंगावरून वारें गेलें होतें. त्यामुळें बाणेश्वराच्या देवळांतलें सकाळ-संध्याकाळ पूजेचें काम शंकरलाच करावें लागे. जेवायपुरता शंकर काय घरीं जात असेल तेवढाच. नाहीं तर वहुतेक सारा वेळ तो देवळांतच असे.

चांगुणेला बकुळीचीं फुलें आवडत. म्हणून रोज सकाळीं शंकर झाडावर चढून ताजीं ताजीं फुलें तिच्यासाठीं तोडून ठेवी. पाणी भरायला चांगुणा नदीवर आली कीं धांवत धांवत ती देवळांत जाई. तेथें ओंजळींत फुलें घेऊन

नंदीच्या पायरीवर शंकर आपला बसलेला असे. आपल्या विटक्या परकराचा ओचा चांगुणेनें पुढें केला कीं, शंकर हंसत हंसत आपली सुवासिक ओंजळ एकदम त्याच्यांत उपडी करी.

शेरडीसाठीं पाला तोडायला चांगुणा दुपारीं घरांतून बाहेर पडली कीं, आकडीनें वडाची पानें तोडून आधीं शंकरला ती देवळांत नेऊन देई. पत्रावळी लावायचा शंकरच्या बापाचा धंदा होता. पण बाप पंगू झाल्यापासून शंकरलाच पत्रावळी लावाव्या लागत. चांगुणा त्याला चोया करून देई.

दर सोमवारीं संध्याकाळीं बाणेश्वराच्या नंदादीपासाठीं तेलाची वाटी घेऊन चांगुणा नेमानें जाई.

आई तिला बजावी, " अंधार करूं नगस. बिगी बिगी ये."

चांगुणा म्हणे, " मला नाय अंधाराची भ्या वाटत. मला कोण खातंय ?"

शंकर तिची वाट पाहात नंदादीपापाशीं बसलेला असे. देवळांत एकादें-दुसरेंच माणूस जाणारें-येणारें असे. गाभाऱ्याच्या अंधारांत दिव्याच्या प्रकाशामध्यें चमकत असलेली आडव्या गंधाची बाणेश्वराची पिंडी आणि तिच्याजवळ शंकराचा हंसतमुख चेहरा लांबून चांगुणेला दिसे. तो बघून तिला असा कांहीं आनंद होई !

चांगुणेच्या हातांतली तेलाची वाटी घेऊन शंकर ती नंदादीपांत ओती. अन् मग देवापुढें कोणीं ठेवलेला एकादा गुळाचा खडा किंवा साखरफुटाणा शंकर हळूच चांगुणेच्या हातांत देई. चांगुणा तो चटकन् तोंडांत टाकी.

ओठ मिटवून तो खातां खातां चांगुणा नुसत्या दृष्टीनें शंकरला विचारी, " खाल्लास ?"

शंकरही डोळ्यांनीं उत्तर देई, " नाही. तुझ्यासाठी मी तो ठेवलाय."

चांगुणेपेक्षां शंकर उंच होता. टाचा उंच केल्या कीं त्याचा हात घंटेला पोहोंचे. तो चांगुणेला घंटा वाजवून दाखवी. घंटेचा आवाज साऱ्या देवळांत भरून घुमूं लागला म्हणजे चांगुणेच्या सर्वांगांतून हर्षाच्या उकळ्या फुटत. कोपऱ्यांत एक नगारा असे. तोही शंकर धुडूम धुडूम वाजवून तिला दाखवी. अशी शंकरची आणि चांगुणेची किती दिवसांची तरी गट्टी होती. एकदां देवळाच्या मागल्या बाजूच्या उंच पाळ्याला मधमाशांचें एक मोहोळ लागून

राहिलें होतें. दगडी मोहोळ होतें तें. चांगलें बैलाच्या वशिंडासारखें लोंबत होतें. किती दिवसापासून तरी शंकरनें तें हेरून ठेवलें होतें.

फुलें घ्यायला नेहमींसारखीं चांगुणा एकदां आली. तेव्हां शंकर तिला म्हणाला, "मधाचं मोहोळ पाहिलंस का ग तूं चांगुणा?"

"नाय वा!" आश्चर्यानें तोंड अर्धवट उघडीत चांगुणा म्हणाली.

"दुपारची ये. तुला गंमत दाखवतों." शंकर हंसून म्हणाला.

मोट उसवली होती. ती शिवून घ्यायला राघूनें चांभाराला बोलविलें होतें. त्याच्यापाशीं तो विहिरीवर बसला होता. राही भोपळ्याच्या बिया सोलीत पडवींत बसली होती. तिचा डोळा चुकवून चांगुणा चटकन् बाहेर पडली आणि तडक देवळांत गेली. शंकर तिची वाट पाहात होताच.

शंकर तिला घेऊन देवळाच्या मागें गेला. मधमाशाचें मोहोळ चांगुणेनें कधींच पाहिलें नव्हतें. शंकरनें तिला बोटानें तें दाखविलें. चांगुणा कलती मान करून वर पाहूं लागली. तिच्या रुंदावलेल्या डोळ्यांतल्या बुबुळाच्या पांढऱ्या कोपऱ्याकडे शंकर टक लावून बघूं लागला.

"निसत्या माशाच दिसतात? मध कुठंय?" कांहीं वेळानें चांगुणेनें विचारलें.

"आंतमधीं पोळं असतं. अन् त्याच्यांत मध असतो!" शंकर माहितगाराचा आव आणून तिला गंभीरपणें सांगूं लागला.

मधाची आठवण होतांच चांगुणेच्या ओठांच्या कडा ओल्या झाल्यासारख्या दिसल्या. त्यांवरून जिभेचें टोक फिरवीत लघळ स्वरांत चांगुणा म्हणाली, "मध लई गोड असतो न्हाय कारे शंकर?"

"हो ना!" शंकरही अगदीं वितळून म्हणाला, "अगदीं गुळाच्या पाण्यावाणी!"

इतकें मधाचें वर्णन ऐकल्यावर चांगुणेला धीर कुठून राहाणार?

"मला देतोस का पाडून मध?" शंकरचा हात चटकन् धरून चांगुणा लाडिक मुद्रेनें म्हणाली,

पलीकडे एक अणकुचीदार निळा दगड पडला होता. शंकरनें तो पटकन् उचलला आणि भिगदिशीं मोहोळावर भिरकावला.

चुलींतून मोठा धुराचा काळा लोट बाहेर पडावा, त्याप्रमाणें मोहोळाचा एक कोपरा एकदम घोंगावत उसळला. आणि क्षणार्धांत काळ्या ढगाप्रमाणें त्यांच्या भोंवतीं पसरला.

चांगुणेनें शंकरचा दंड पकडला आणि गपकन् डोळे मिटले.

मधमाशांचा गराडा चोंहीकडून आपल्या डोक्यावर उतरतो आहे हें शंकरच्या तावडतोब लक्षांत आलें.

" चांगुणा, पळ ! " तो घाबरून मोठ्यानें ओरडला. आणि चांगुणेचा हात धरून त्यानें जोरानें धूम ठोकली.

चांगुणा कोलमडत त्याच्यामागें गेली. काय झालें हेंच तिला मुळीं कळेना.

देवळांत शिरतां शिरतां शंकरनें मागें दृष्टि फेकली तो मधमाशांचा एक ढग जोरानें त्याच्या मागोमाग येत होता.

नगाऱ्याच्या कोपऱ्यांत अंधार होता, अन् भिंतीमध्यें तेथें ओवरी होती. त्या ओवरीच्या रोखानें शंकरनें धांव घेतली. इतक्यांत चांगुणेचें मनगट त्याच्या हातांतून निसटलें.अन् चांगुणा खालीं आदळली. तिला उठवायला शंकर वळतो तेवढ्यांत एक मधमाशी येऊन तिच्या कानाला अशी कांहीं कडकडून डसली म्हणतां ! एवढ्या जोरानें चांगुणा किंचाळली कीं तिच्या त्या किंचाळीचे अनेक पडसाद कोपऱ्या कोपऱ्यांतून उठले. आणि किती वेळ तरी ते साऱ्या देवळांत घुमत राहिले.

अंगांत होतें नव्हतें तेवढें बळ एकवट करून शंकरनें तिला दोन्ही हातांनीं उचललें. अन् ओवरीच्या तोंडाशीं नेऊन ठेवलें. ओणवा होऊन आपण आंत शिरला अन् आपल्या मागोमाग त्यानें तिला ओढून घेतलें.

आंत अगदीं अंधार गुडूप होता. पाकोळ्यांच्या लेंड्यांची कुबट घाण आंतमध्यें पसरली होती. फुलांचें आणि वेलाच्या पानांचें निर्माल्य बरेचसें सांठून राहिलें होतें. चांगुणा जोरजोरानें विव्हळत होती. तिच्या कानाची आग आग झाली होती. शंकरनें तिला जवळ ओढून घेतलें आणि तिच्या पाठीवर ममतेनें हात फिरवून, न बोलता तो तिची समजूत घालूं लागला.

● ● ●

१०

# मी कोण आहें ?

[ 'मी कसा झालों' या नांवाचें एक सुंदर पुस्तक आ. अत्रे यांनीं दोन वर्षांपूर्वी लिहिलें. या पुस्तकाला केवळ आत्मचरित्रच म्हणतां येणार नाहीं. आपल्या बहुरंगी व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंचा लेखकानें स्वतःच करून दिलेला हा परिचय आहे. या त्यांच्या पुस्तकांतूनच पुढील उतारा घेतला आहे. जीवनाच्या विविध अंगासंबंधीं स्वतःला वाटणाऱ्या आकर्षणाची सुजाण मीमांसा लेखकानें येथें केलेली दिसते ]

* * *

हें कांहीं माझें चरित्र नाहीं. आयुष्यांतील आकर्षणांचें हें संशोधन आहे. जीवनाच्या नागमोडी प्रवाहाचें हें प्रदर्शन आहे. तीन तपांच्या उपद्व्यापांचें हें निवेदन आहे. आत्मसमर्थनही आहे बरेंचसें. नाहीं कसें म्हणूं ?

हें भारुड वाचून वाचक बुचकळ्यांत पडतील. म्हणतील, "एवढे उद्योग तुम्ही केलेत. त्याची कांहीं जरुरी होती का ? तुम्ही निघालांत कुठून ? जाणार कुठें ? अन् गेलांत कुणीकडे ? कशाला कांहीं पत्ता ? आणि अजून तरी आहांत तिथेंच राहणार आहांत, का आणखी कुठें भराऱ्या मारून येणार ?" ह्या प्रश्नांना उत्तरें देणें कठीण आहे.

जाणून वुजून मीं हें थोडेंच केलें ? हें कसें झालें तें माझें मलाच कळत नाहीं. मीच मुळीं स्वतःला हे सारे प्रश्न विचारतों आहें. आयुष्यांत कुठें जायचें हें कळत नाहीं, हीच तर त्याची गंमत आहे. आगगाडीच्या वेळापत्रकासारखें जीवनाचें वेळापत्रक जन्मल्याबरोबरच प्रत्येकाच्या हातीं पड-

ण्याची सोय असती, म्हणजे कोणत्या गाडीनें कुठल्या स्टेशनला जायचें हें प्रत्येकाला बरोबर कळलें असतें. पण तसें होत नाहीं म्हणून तर सारा घोटाळा उडतो. आयुष्याच्या आगगाडींत बसलेल्या माणसांना कुठें उतरावयाचें हें शेवटपर्यंत समजत नाहीं.

कांहीं माणसें प्रवासाला कंटाळून अधल्या मधल्या स्टेशनावरच उतरतात. अन् जन्मभर तेथेंच मुक्काम करून बसतात. त्यांची जगांत फार वाहवा होते. पण ज्यांचा प्रवास शेवटपर्यंत संपत नाहीं, तीं माझ्यासारखीं माणसें वेडीं ठरतात. आयुष्यभर जीं एकच काम करतात तीं माणसें अधिक हुषार अन् कर्तबगार असतात काय हो ? कोणास ठाऊक ? खंबीरपणा किंवा स्थिरता हे सद्गुण आहेत का दुर्गुण आहेत हेंच मला कळत नाहीं. त्यांच्यासंबंधीं माझ्या डोक्यांत जरा घोटाळा आहे. एकाच ठिकाणीं, एकाच कार्यांत चिकटून राहणें, हें कांहीं मला सामर्थ्याचें लक्षण वाटत नाहीं. मला तर तो दुबळेपणाच वाटतो. पुष्कळशीं माणसें एकाच ठिकाणीं जीं पडून राहतात त्यांना दुसरीकडे हलण्याची मुळीं शक्तीच नसते.

मी जीवनाचा यात्रेकरू आहें. माझ्या खांद्यावरची पताका अजून खालीं होत नाहीं. माझ्या पायाचें चक्र अद्याप सुटत नाहीं. पण जगाला माझ्यासारखीं माणसें आवडत नाहींत. धीम्या आणि एकमार्गी माणसांचें जगांत कौतुक होतें. शालेय सृष्टींत त्यांचा आदर्श मुलांच्या पुढें ठेवण्यांत येतो. पण मुलांना कांहीं हीं माणसें आवडत नाहींत. मुलें माझ्यासारख्याच भटक्या माणसावर खूष असतात, म्हणून 'एक ना धड भाराभर चिंध्या' किंवा 'सर्वांत जाई अन् कशांत नाहीं' ह्या म्हणी मुलांना दम देण्यासाठीं शाळेच्या पुस्तकांत मुद्दाम घातल्या जातात.

कोणत्याही एका 'क्षेत्रां'त मी फार काळ राहिलों नाहीं, ह्याबद्दल मला खेद होत नाहीं. आपल्या हातून चूक झाली असेंही मला वाटत नाही. मीं जन्मभर कविता करीत बसलों असतों किंवा मुलांना शिकवीत बसलों असतों तर मला कोणी नको का म्हटलें असतें ? कोणत्याही उद्योगांत मला अपेश आलें किंवा मी नालायक ठरलों, म्हणून कांहीं तो मी सोडला नाहीं. मीं ज्या ज्या गोष्टी केल्या, त्या सर्वांचें अजूनही मला आकर्षण आहे. त्यामध्यें मिळविलेलें प्रावीण्य मीं कांहीं गमावलेलें नाहीं. चित्रपटाच्या व्यवसायांत

मी शिरलों, म्हणून शिक्षणशास्त्र थोडेंच विसरलों? किंवा माझी नाटच-प्रतिभा थोडीच आटली?

शिक्षक होण्यापूर्वी मी कवि होतों. फुलांवर प्रेम करणाऱ्याला मुलांवर प्रेम करणें फार सोपें जातें. किंवा फुलांकडून माणूस मुलांकडेच वळतो असेंही म्हणा. शिक्षक असतांना मी नाटकें लिहूं लागलों. मुलांचें मन जो जाणतो, तो यशस्वी शिक्षक होतो. प्रेक्षकांचें मन जो ओळखतो, तो प्रभावी नाटककार होतो. मी उत्तम शिक्षक होतों म्हणून चांगला नाटककार झालों. नाटकें लिहितां लिहितां मला जीवनांतलें नाटक समजूं लागलें. म्हणून मुलांचें लहान जग सोडून मी माणसांच्या मोठ्या जगांत शिरलों. परिणामकारक 'नाटक' कसें निर्माण करावयाचें हें मला माहीत होतें. म्हणूनच मी लोकप्रिय वक्ता आणि यशस्वी लेखक होऊं शकलों. माझ्या एका व्यवसायांतून दुसरा व्यवसाय उमलला. म्हणून पहिल्याचें सामर्थ्य दुसऱ्यांत आलें. पण व्यवसाय हें कांहीं माझें जीवन नाहीं. जीवन हाच माझा व्यवसाय आहे. निरनिराळ्या व्यवसायांनीं माझें जीवन समृद्ध केलें आहे.

लहान मूल शाळेंत जसें रमतगमत जातें ना, तसा मी आयुष्यांतून रमत गमत चाललों आहें. वाटेंत फूल दिसलें, त्यावर कविता कर. मूल दिसलें, त्याला गोष्ट सांग. उदास चेहऱ्याचा माणूस भेटला, त्याला हलव. दुःखी स्त्री भेटली, तिच्या जीवनावर नाटकें रच. बोकेसंन्याशी चालला, त्याची टवाळी कर. गर्दी दिसली, तिच्यापुढें व्याख्यान दे. कोणी महापुरुष भेटला, त्याचा जयजयकार कर. एकादा मोर्चा आढळला, त्याच्यांत सामील हो. आयुष्यांतल्या प्रत्येक गोष्टीबद्दल मला जिज्ञासा आहे. खिडकी उघडी दिसली कीं मांजर जसें तिच्यांत डोकावतें, तसें जीवनांत डोकावण्याची मला फार हौस आहे. सारें आपल्याला दिसलें पाहिजे, सारें समजलें पाहिजे अन् सारें आलें पाहिजे, असें मला वाटतें.

आयुष्याला जीवन म्हणतात तें उगाच नाहीं. जीवन म्हणजे पाणी. आयुष्य हें पाण्यासारखें प्रवाही असावें. तें सारखें वाहावें. तरच तें जीवन. जें एका ठिकाणीं सांचून राहतें तें कसलें जीवन? तें डबकें. जगांत जीवन थोडें, डबकींच फार. मी 'उगम' पावल्यापासून सारखा वाहतों आहें.

अन् वाहवतोंही आहे. जो वाहतो तो वाहवणारच. त्यामुळेंच, माझ्या जीवनामध्यें एवढे तरंग, एवढीं वळणें, एवढा खळखळाट अन् एवढे धबधबे.

जग म्हणतें कीं उथळ पाण्याला खळखळाट फार ! जगाला वाहतें पाणी आवडत नाहीं. त्याला गंभीर पाण्याबद्दल आदर फार. कारण तें हलत नाहीं, बोलत नाहीं, चालत नाहीं. त्यामुळें त्याच्या पोटांत काय आहे, त्याचा कोणाला पत्ता लागत नाहीं. अन् त्याच्या पोटांत शिरायचें कोणाला धैर्यही होत नाहीं. गंभीर पाण्याचें लोकांना भय वाटतें. पण असें असून जगाला त्याबद्दल कौतुक केवढें ? विचारें उथळ पाणी. इतकें निर्मळ अन् निव्वळ शंख. त्याचा तळ सर्वांना स्वच्छ दिसतो. सारखें खेळत असतें तें. पण लोक म्हणतात, "तें खळखळतें." काय चमत्कारिक जग आहे तरी ? त्याला खेळ म्हणजे खळखळ वाटते.

माझ्या खेळकर स्वभावानें मला चोहींकडे ओढीत नेलें. मला तो एका ठिकाणीं मुळीं बसूंच देत नाहीं. एखादें मूल जसें आपल्या बापाला भंडावून सोडतें, त्याच्या धोतराला हिसके मारतें अन् म्हणतें, 'मला हें दाखव अन् तें दाखव !' तसा माझ्या मनाचा भुंगा अष्टौप्रहर माझ्या मागें लागलेला आहे. तें मला एका ठिकाणीं बसूं देईल तर किनई ? नाहीं तर तसा मी साऱ्या मुलखाचा आळशी ! बसेन तिथें लोळेन. पण माझ्या ह्या उठवळ स्वभावानें माझी परवड केली. आणि सगळीकडे माझी धिंड काढली. किती हिंडलों अन् किती पाहिलें, तरी माझें अजून समाधान होत नाहीं.

काय मौज आहे आयुष्य म्हणजे ? प्रचंड मौज. तिला अंतच नाहीं. पण ती कोणाला ? जो बघेल त्याला. जो भोगील त्याला. डोळ्यांना ढापणें बांधून घाण्याभोंवतीं फिरणाऱ्या बैलांना कुठली आली मौज ? त्यांना आयुष्य म्हणजे काळोख अन् कंटाळा. जीवन म्हणजे मानेवरचें जोखड. बाहेर आनंदाच्या बागा फुलल्या आहेत, कारंजीं उचंबळत आहेत. सनया वाजत आहेत. पण जगांतल्या बैलांना त्याचें काय ? डोळे झांकून ते एकाच घाण्याभोंवतीं फिरत आहेत. अन् जीवन त्यांच्या डोक्यावरून वाहून चाललें आहे.

जीवनाचा कितीही आस्वाद घ्या. त्याची तृप्ति वाटत नाहीं. हीच जीवनाची गंमत आहे. ह्या मेजवानींत एक का रस आहे ? ह्या जलशांत एक का सूर आहे ? किती चाखाल अन् किती ऐकाल ? पुष्कळांना जगाचा

कंटाळा येतो. त्यांनीं जीवनाची चवच घेतलेली नसते. जगांत कंटाळा येण्यासारखें आहे काय? सर्वत्र नावीन्याचा लखलखाट आहे. जग उत्पन्न होऊन इतकीं वर्षें झालीं. पण रोज सकाळीं तें नवीनच जन्माला येतें आहे असें वाटतें. सूर्योदयाचें आणि सूर्यास्ताचें सोनें पहिल्यासारखेंच पिवळें धमक आहे, आभाळाचा निळा रंग अजून विटला नाहीं. कळ्या फुलांचा सुगंध अजून उडाला नाहीं. तृणांची हिरवीगार मखमल अद्याप टवटवीत आहे. जग अजर आहे. चिरतरुण आहे. जगाच्या चिरंतन नावीन्याची जाणीव म्हणजेच जीवन. जीवनाचा हा अर्थ ज्याला कळतो, तो जगाला कशाला कंटाळेल?

जगाचा केव्हां ना केव्हां तरी अंत होणार असें शास्त्रज्ञ म्हणतात. कवि असें म्हणणार नाहीं. अशा सुंदर जगाचा नाश करावयाला परमेश्वर कांहीं मूर्ख नाहीं. मला तर 'प्रलया'ची कल्पनाच करतां येत नाहीं' इतका जगांतील सौंदर्यावर मी मोहून गेलों आहें. चोराच्या गुहेंत शिरलेल्या अलिबाबासारखी माझी स्थिति झाली आहे. सर्वत्र अपरंपार संपत्ति भरलेली मला दिसत आहे. मी अगदीं दिपून गेलों आहें. कशाला हात लावावा अन् कशाला हात लावूं नये, असें मला झालें आहे. सर्वांगाला बोटें उगवावीत असें मला वाटतें. मी कांहीं हावरा नाहीं. जीवनाचा मला लोभ नाहीं; पण ओढ आहे. चोहोंकडून मला तें हाका मारतें आहे, बोलावतें आहे. अनंत हस्तांनीं त्याला मिठी मारून तें आपल्याला सामावून घ्यावें असें वाटतें. शाळेंतून सुटलेल्या पोरांच्या झुंडीप्रमाणें साऱ्या देहकणांना जीवनाकडे धूम ठोकावीशी वाटते. जीवनाचें हें विलक्षण वेड माझ्यामध्यें कसें आलें? लहानपणापासून निसर्गाची अन् इतिहासाची मला सोबत मिळाली. नद्या, डोंगर, झाडें, किल्ले, देवळें अन् पडके वाडे ह्यांच्या संगतींत मी वाढलों. सकाळीं उठलों कीं अंगावर सोनेरी उन्हें पांघरावयाचीं. रात्र झाली कीं अंगावर चांदण्यांची निळी चादर ओढून अंगणांत झोपीं जावयाचें. मध्यरात्रीं भैरोबाची सनई अन् चौघडा वाजायला लागला म्हणजे परमेश्वराचा हातच जणूं आपल्या डोक्यावरून फिरत आहे असें वाटे. उशाला अष्टौप्रहर शिवाजी महाराजांच्या पुरंदर किल्ल्याचा पहारा असे. अन् शेजारीं श्री सोपानदेवांची भक्तिवीणा सदैव वाजत राही.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम २६६९० दि: १९८८
क्रमांक ७२२८ ग्रां दि. २५/६/८०


शक्तीचें आणि भक्तीचें पावनतीर्थ होतें माझें गांव. उदात्त नि ओजस्वी जीवनाचा रोज तिथें साक्षात्कार घडे. हृदयांत अन् मस्तकांत नाना तऱ्हेचे संचार होत. रस्त्यांतून जाऊं लागलें कीं उंच उंच वाड्यांच्या पडक्या भिंतीं-वरून दोनतीनशें वर्षांचा इतिहास कानांत कुजबुजूं लागे. अन् भडकलेल्या वासराप्रमाणें कल्पना भूतकाळाच्या भुयारांतून धांवत सुटे. ज्ञानोबांची पालखी दर वर्षी गावांतूनच पंढरीला जाई. त्यावेळीं दिंड्या पताकांची अशी गर्दी उडे. टाळ-मृदंगांच्या नि ग्यानबा-तुकारामांच्या गजरानें गांव दुमदुमून जाई. अन् चंद्रभागेचें स्नान अंगणांतच घडल्यासारखें वाटे. खरोखर, संतांनीं आणि वीरांनीं कृतार्थ केलेल्या ह्या महाराष्ट्रांत जन्माला येण्यासारखें भाग्य नाहीं दुसरें.

जें रम्य आहे नि जें भव्य आहे, त्याचें दर्शन खेडेगांवांतच घडतें. पावलो-पावलीं परमेश्वर तुमच्याशीं बोलत असतो तिथें. त्याची कृपा नदीच्या रूपानें तुमच्या घराजवळून वाहत असते. शिवारामधल्या शेतांत डोलणाऱ्या पिकांवरचा वारा परमेश्वराचा सुवासिक श्वासच प्रतिक्षणीं घेऊन येतो. जेथें नदी नाहीं आणि शेतें नाहींत तें का माणसांना राहण्याचे ठिकाण असतें ? शहरांत नदीचें आणि जीवनाचें गटार झालेलें असतें. चाळीमध्यें आणि नळावर जीवन कसें भेटणार ? नळ सोयीस्कर असतील. पण त्यांतून जीवन वाहत नाहीं. पाणी वाहतें. जीवन फक्त झऱ्यांतून आणि नद्यांतूनच वाहतें.

म्हणून शहरी जीवनांत चैतन्य नसते; स्फूर्ति नसतें. दारासमोरचा पेट्रोलपंप अन् चहाचें दुकान बघून कशी स्फूर्ति येणार ? सात मजल्यांच्या इमारती आणि गिरण्यांचीं उंच उंच धुराडीं ध्येयवाद कसा जागृत करणार ? माणसांच्या शरीरांना हलावयाला जिथें जागा नाहीं, तेथें त्यांचीं मनें कशीं भराऱ्या मारणार ? जिथें अंगाला वारा झोंबत नाहीं अन् डोळ्यांना आभाळ दिसत नाहीं, तिथें अंतरात्म्यांतला विस्तव कसा प्रज्वलित होणार ? खेडे-गांवांत सकाळीं उठलें कीं डोंगराचें उंच शिखर पहिल्यानें दृष्टीस पडतें. तें माणसाच्या पौरुषाला आव्हान देतें. नदीच्या थंडगार आणि वाहत्या पाण्यांत आंघोळ करतांना चैतन्यरसांत डुंबल्यासारखें वाटतें. अन् शरिरांतला कणन् कण खडबडून जागा होतो. उन्हातान्हाच्या भट्टींत शरीर भाजून निघाल्याखेरीज का त्यांतला 'पुरुषोत्तम' कधीं प्रकट होईल ?

शहरांत राहावयाला आलों, तरी निसर्गाची संगत मीं सोडलेली नाहीं. मुंबईत समुद्र हा माझा सोबती आहे. त्याच्या लाटांची अहोरात्र चाललेली मर्मर हें माझ्या जीवनांतलें पार्श्वसंगीत आहे. भरतीच्या आणि ओहोटीच्या तालावर माझ्या मनोवृत्ति अक्षय नाचत असतात. किनाऱ्यावरच्या उंच उंच माडांच्या नि नारळींच्या झाडांप्रमाणें मीही वाऱ्याच्या सोसाटयामध्यें धुंद होऊन अष्टौप्रहर डोलत असतों. पहाटेच्या वेळीं अंगावर लाटांचे तुषार झेलीत ओल्या आणि भुसभुशीत वाळूवर अनवाणी पावलांनीं चालण्यांत केवढें काव्य आहे. पण पुष्कळ लोक पायांत बूट घालून अन् सारें अंग लोकरी कपडयांत पॅकबंद करून समुद्रावर हिंडायला येतात. मी त्यांना म्हणतों, "अरे, परमेश्वराचें तीर्थ उडूं द्या थोडें अंगावर. त्याचा श्वास शिरूं द्या तुमच्या नाकातोंडांत. निसर्गाच्या देवळांतही बाहेर जोडे ठेवून शिरायचें असतें !" पण कोण ऐकतोय् ? निसर्गाला कोणी संधीच देत नाहीं. समुद्र म्हणजे त्यांना शत्रु वाटतो. अंगांत 'चिलखतें' घालून त्याला भेटायला येतात.

मुंबईच्या सागराप्रमाणें, खंडाळ्याचा डोंगरही माझा मित्र आहे. मी बारक्यासारख्या लोकांशीं मैत्री करीतच नाहीं. ह्या डोंगरावर माझें एक घर आहे. पुष्कळदां मी तिथें राहतों. माझें सारें लेखन मी तिथेंच करतों. मला कांहीं 'योग' येत नाहीं. पण खंडाळ्याला गेलों कीं ताबडतोब माझी 'समाधि' लागते. माणसांचें जग मी पार विसरून जातों. उंच उंच डोंगरावर निळेंभोर आभाळ बसलेलें असतें. तास न् तास मी त्याच्याशीं गोष्टी करीत असतों. आभाळाच्या कापसांत बुबुळें गुंडाळून ठेवलीं म्हणजे उघडया डोळ्यांनीं झोपल्यासारखें वाटतें. झाडाझुडपांच्या आणि झऱ्यांच्या संगतींत दिवस कसा निघून जातो हें कळत नाहीं.

झाडांना हालतां येत नाहीं, बोलतां येत नाहीं. तीं एकाच जागेवर उभीं असतात. पण त्यांच्या जगांत नेहमीं कांहीं ना कांहीं उलाढाली चाललेल्या असतात. जुन्या झाडांचीं पानें गळत असतात. नवीन नवीन पानें फुटत असतात. कांहींना फुलें येतात; तर कांहींना मोहर येतो. झुडुपांवर तुरे डोलत असतात. वेलीवर कळया हसत असतात. हिरव्या सृष्टींतल्या ह्या लहानमोठ्या रहिवाशांना स्वस्थपणा कसा तो माहीत नसतो. उन्हाळ्यांत

वाऱ्यांच्या झुळुकांशीं ते थट्टामस्करी करीत असतात; तर पावसाळ्यांत मुसळधार पावसाशीं त्यांची दंगामस्ती चाललेली असते. अन् हिवाळ्यांत धुक्याची दुलई अंगावर ओढून आंतल्या आंत ते कांहीं तरी गडबड करीतच असतात.

खंडाळ्याला असलों म्हणजे अगदीं झुंजूमुंजू व्हायच्या आंत मी उठतों. बाहेर येऊन पहावें तर डोंगरावरची सर्व हिरवी मंडळी केव्हांपासूनच जागी झालेली असते, अन् पाखरांच्या बरोबर वटवट करीत बसलेली असते. मोठमोठीं झाडें पहाटेच्या वेळीं लहान लहान पांखरांबरोबर कसल्या गप्पा करीत बंसतात कोणास ठाऊक ? चिमुरड्या वेली नि छोटीं झुडपें, पण तीं देखील चांगलीं उठून बसलेलीं असतात.

मी त्यांना म्हणतों, "अरे निजा, इतक्या सकाळीं रे कशाला उठलांत?" पण तीं माझें थोडेंच ऐकतात ? वेली मला म्हणतात, "ह्या बघा, आम्हांला कशा कळ्या आल्या आहेत ?" रोपटीं म्हणतात, "हे पाहा, आम्हांला कसे कोंब फुटले आहेत ?" हातांत झारी घेऊन मी त्यांना पाणी घालूं लागतों, तेव्हां अंग घुसळून अशीं कांहीं तीं हंसतात अन् डोलतात म्हणतां ? जशा कांहीं मी त्यांना गुदगुल्याच करतों आहें. तासचे तास मी वेलींशी न् झुडुपाशीं असा खेळत बसतों.

झाडाझुडपांची नि पाखरांची सोबत तुकोबांनाही फार आवडत होती. वृक्षवल्लींच्या नि वनचरांच्या सहवासांत एकान्तवासाला रुचि येते, हें तर खरेंच; पण माणसांच्या संगतीमुळें त्यांचे गुणदोष आपल्या अंगाला चिकटण्याचें जें भय असतें, त्याचा तिथें मागमूसही नसतो. आकाशाच्या मंडपांत पृथिवीच्या आसनावर मांडी घालून आपणच आपल्या मनाशीं संवाद करीत आणि वाद घालीत बसणें, हीच माझी तरी निदान 'ब्रह्मानंदा'ची कल्पना आहे.

दिवसचे दिवस मी खंडाळ्याला एकटा असतों. एकान्तवासाचा मनसोक्त आनंद मला तिथें लुटावयाला मिळतो. आणि वाङमयाच्या भोजनानें तर त्या आनंदाची रुचि अधिकच वाढते. झाडें, पुस्तकें आणि मी असा आमचा सुंदर मेळ जमतो. सारखें वाचावयाचें. अन् स्वत:शीं संवाद करावयाचा ! वाहवा, त्या आनंदापुढें जगाची काय पर्वा ?

या इथें तरुतळीं सुरई एक सुरेची
खावया भाकरी आणि वही कवितेची।

ही उमर खय्यामच्या आनंदाची कल्पना आहे. पण गर्द झाडांच्या सावलींत फुलांच्या आणि पुस्तकांच्या ढिगांत धुंद होऊन पडणें, हें माझ्या जीवनाचे स्वप्न आहे.

निसर्गाइतकेंच मला वाङमयाचे वेड आहे. जीवनाच्या आनंदामधून तें निर्माण झालें आहे. वाङमयापेक्षां मला अधिक प्रिय कांहीं नाहीं. वाङमय म्हणजे जीवनांतला मधु. जीवनांत सर्वत्र मधु भरलेला आहे. विषही आहे. पण मधमाश्यांप्रमाणें वाङमयकार उत्तम मधूच गोळा करतात. वाङमय म्हणजे मधाचे पोळें. कोळयाचे जाळें नव्हे. मधाच्या पोळयापेक्षां कोळयाचें जाळें दिसतें सुदर. त्याचे धागे किती नाजुक. रचना किती कलात्मक. पण माश्यांना मारण्याचा तो फास आहे दुसरें काय ? त्या जाळयांत अडकणें म्हणजे मरण.

मधाच्या पोळयांत कला नसते असें नाहीं. त्याच्या रचनेंत केवढें कौशल्य असतें ? पण पोळयांतल्या कलेला महत्त्व नाहीं. मधाला महत्त्व. मध म्हणजे जीवन. जो तें पितो, तो जिवंत होतो. वाङमयांत शब्दांना महत्त्व नाहीं. कलेला नाहीं. तंत्राला नाहीं. त्यांत मधु आहे कीं नाहीं, हा प्रश्न महत्त्वाचा आहे.

भांड्याला किंमत नाहीं. त्यांत काय भरलें आहे ह्याला किंमत आहे. विनोबा म्हणतात, "ज्यानें चित्ताची शुद्धि होते, तें वाङमय." वाङमयानें जीवनांत माधुरी उत्पन्न झाली पाहिजे, हर्ष निर्माण केला पाहिजे, नवीन दृष्टि दिली पाहिजे. ज्ञानेश्वर, तुकाराम, विनोबा किंवा साने गुरुजी ह्यांचें वाङमय म्हणजे मधांचीं पोळीं. त्यांतला मध प्यावा नि अमर व्हावें. त्याच्या उलट, फडक्यांच्या कामुक कादंबऱ्या म्हणजे कोळयांचीं जाळीं. त्यांची कला सुंदर; पण वाचक त्यांत अडकले कीं मेलेच !

वाङमय म्हणजे जीवनाचा अनुभव. कलेचा विकास नव्हे. मधमाशी मध कशी गोळा करते ? तिला हिंडावें लागतें. फुलाफुलाकडे जावें लागतें. मध हें एक सत्य आहे, कल्पना नाहीं. तें शोधावें तेव्हां मिळतें. पण कोळी कांहीं हिंडत नाहीं. तो बसल्या बसल्याच जाळें विणतो. त्याच्या तोंडून तंतु निघतात. कोळयांचें जाळें म्हणजे निव्वळ कल्पना.

पुष्कळसे लेखक घरांतच वसतात. पुस्तकें वाचतात. आणि जाळीं विणतात. पण हें त्यांचें लेखन क्षणजीवी असतें. त्यांत सत्य नसतें. जीवनाचा शोध नसतो. वाङ्मयकारांनीं जीवनाकडे जायला पाहिजे. जीवनाचें संशोधन केलें पाहिजे. सेवेच्या कोणत्या ना कोणत्या तरी क्षेत्रामध्यें उडी घेतली पाहिजे. साहित्यांत जीवनाचा साक्षात्कार घडावयाला पाहिजे. जीवनाचा अनुभव असल्याखेरीज हें कसें होईल ?

विनोबा आणि सानेगुरुजी ह्यांच्या साहित्यामध्यें तेज आहे. त्याचें कारण आधीं ते सेवक आहेत. अन् मग साहित्यिक. आजकाल साहित्याची आणि सेवेची फाळणी झालेली आहे. म्हणून साहित्याचा अधःपात झाला आहे. हा कोण तर म्हणे कवि. तो कोण तर म्हणे कादंबरीकार. धंदा काय करतां ? तर म्हणे नुसत्याच कविता अन् कादंबऱ्या लिहितों.

पूर्वीचे संत हे काय नुसते साहित्यिक होते ? ते लोकसेवक होते. नुसतेंच कवित्व करायची तुकोबांना लाज वाटत होती. ते देवाला दुःखानें म्हणाले, "देवा, अजून मला पुरता अनुभव नाहीं. मग मी काय नुसता कवि होऊं अन् जगांत माझें हसू करून घेऊं काय रे ?"

कबिरानें तर शाईला न् कागदाला कधीं हातही लावला नाही. 'मसि कागज़ छूयो नहीं ! –' कबीर शेले विणायचा. आणि विणतां विणतां जीवनाचें तत्त्वज्ञान गायचा .

झिनि झिनि बिनि चदरिया
काहे कै ताना, काहे कै भरनी
कौने तारसे, बिनि चदरिया

बहिणाबाई चौधरी ह्यांचीं खानदेशी भाषेंत अलिकडेच प्रसिद्ध झालेलीं गाणीं म्हणजे प्रतिभेचा चमत्कार आहे. रोजचें घरांतलें आणि शेतांतलें काम करतां करतां त्यांचा जन्म गेला. त्यांना लिहितांही येत नव्हतें किंवा वाचतांही येत नव्हतें. चूल फुंकतां फुंकतां 'माय भिमाई माऊली। माझी आंब्याची साऊली ' किंवा दळतां दळतां ' माझ्या माहेराची वाट । माले वाटे मखमल। ' असलें जिवंत काव्य निःश्वासासारखें सहज त्यांच्या मुखामधून प्रकट होई. अन् मग त्यांतलें कांहीं थोडेसें कोणी तरी माणूस टिपून ठेवी. पुष्कळसें त्यांचें काव्य असें वाऱ्यावरच गेलें.

धरित्रीच्या कुशींत झोपलेलें बीं-वियाणें कसें प्रकट होतें ह्याचें त्यांनीं केलेलें हें वर्णन पहा.

उन-वाऱ्याशीं खेयतां
एका एका कोंबांतून
पर्गटले दोन पानं
जसे हात जोडीस न
टाया वाजविती पानं
दंग देवाच्या भजनीं

मातीच्या घटांतलें अमृत म्हणतात तें हें. जीवन खांडावें तेव्हां असे अमृताचे जिवंत झरे त्यांतून उचंबळतात. जीवनाकडे पाठ फिरवून नुसती कलेचीं आणि कल्पनेची 'जाळीं' विणीत बसलेले आजचे बहुतेक लेखक आणि कवि शाईचा नि कागदाचा विनाकारण व्यय करताहेत.

लेखन ही कांहीं वेठ नाहीं. लिहितां येतें म्हणून काय लिहिलेंच पाहिजे ? त्यापेक्षां वाचावें. वाङमयाच्या अमृतांत यथेच्छ डुंबावें. सर्वांगानें तें शोषून घ्यावें. अंतर्बाह्य शुद्ध व्हावें. कपड्याला कसर लागू नये म्हणून आपण त्यांत केवड्याचीं कणसें घालतों. वाङमयाचें हेंच काम आहे. तें जीवन सुगंधित करतें. जीवनाचा अध:पात होऊं देत नाहीं.

ह्या दृष्टीनें पुष्कळसें 'आधुनिक वाङमय' व्यर्थ आहे. जीवनावर परिणाम करण्याचें सामर्थ्य त्यांत नाहीं. मानवतेच्या कल्याणासाठीं प्राचीन काळांतील महापुरुषांनीं देवभाषेंत आणि लोकभाषेंत 'केवड्याचीं बेटें लावून ठेवलीं आहेत. त्यांचा सुगंध शतकानुशतकें दरवळतो आहे.

मी जीवनांत पुष्कळ हिंडलों. पण वाङमयाची सोबत सोडली नाहीं. जीवनाची सेवा मीं वाङमयानें केली. वाङमयाचा उगम सेवेंतून व्हावा, आणि सेवेंतच त्याचा विनिमय व्हावा. वाङमयांत रंजन तर हवेंच; पण त्यांत जागृति पाहिजे. समाजांत डोंगराएवढें अज्ञान आहे. लक्षावधि लोक झोपले आहेत. त्यांना कोण उठवणार ? जे निजले आहेत त्यांनाच जागें करावें. जे जागे आहेत त्यांना उठवण्यांत काय शहाणपणा आहे ?

पुष्कळसे लेखक अज्ञानांना सज्ञान करण्याऐवजीं, पंडितांना महापंडित करण्याच्या मागें लागलें आहेत. निर्वासितांना घरें नाहींत. आणि ज्यांना

घरें आहेत, ते मजले बांधताहेत, ' दरिद्रान् भर कौंतेय, मा प्रयच्छेश्वरे धनम् । ' गरिबांना धन द्यावें. श्रीमंतांना नाहीं. संस्कृताचा आणि पांडित्याचा दंभ माजला म्हणून बहुजनांच्या उद्धारासाठीं मराठी भाषेचें निशाण संतांनीं हातीं धरलें

मी उपदेशक नाहीं. उपासक आहें. सिद्ध नाहीं, साधक आहें. समाजांतील अनंत दुःखांची आणि दैन्यांची मला जाणीव आहे. जनतेचा कैवार घेण्यांत मीं माझें सामर्थ्य खर्च केलें आहे. जगांतील म्लानवदनें प्रफुल्लित कशीं होतील ह्याचीच मीं सदैव चिंता केली आहे. माझ्या दोषांची आणि चुकांची मला जाणीव आहे. माझ्या हातून अनेक अपराध घडले आहेत. पण असद्भावनेचा प्रचार करून जनगंगेचें जीवन गढूळ करण्याचा प्रयत्न मीं कदापि केलेला नाहीं.

मी संतुष्ट नाहीं. अनेकांशीं मी भांडलों आहें. पण माझ्या स्वतःशीं माझें सर्वांत मोठें भांडण आहे. तें भांडण संपतां संपत नाही. क्षुद्र गोष्टींचें मला अजून महत्त्व वाटतें. बाळासाहेब खेर काय बोलतात अन् फडके काय लिहितात हें मी मनाला उगाच लावून घेतों. माझे मोह मला सुटत नाहींत. त्यानें माझ्या वेळेचा नि बळाचा व्यय होतो.

माझ्या अंगीं पुरेशी नम्रता नाहीं. लोक जेव्हां माझी निंदा करतात, तेव्हा त्यांत माझा कांहीं दोष नाहीं असेंच मला वाटतें.

चंदन बघून कांहीं कोणी नाक धरीत नाहीं. सोनें सर्वांना आवडतें. साखरेची गोडी सगळ्यांना कळते. मग मलाच कां लोक नांवें ठेवतात ? माझें चित्त शुद्ध नाहीं. माझेंच कांहीं चुकतें म्हणून. तुकोबांनासुद्धां जी चित्तशुद्धि साधली नाहीं, ती तुम्हां आम्हांला काय साधणार ? पण आपल्या अशुद्ध चित्ताची जाणीव जरी आपण ठेवली तरी पुष्कळ आहे.

पण मी गुणांचा पूजक आहें, हें माझें सर्वांत मोठें सामर्थ्य आहे. भुंगे जसे फुलांवर झेप घेतात, तसे गुण मला दिसले रे दिसले, कीं मी त्यांजवर तुटून पडतों. कुठून सुवास आला की मी चाललोंच त्या बाजूला. कुठून चांगला सूर ऐकूं आला कीं मी धांवलोंच तिकडे. चांगल्या गोष्टींवर प्रेम करण्याची मजमध्यें उपजत प्रेरणा आहे, हें केवढें माझें भाग्य ? तुकोबा म्हणतात :—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 28890 वि: ...
क्रमांक 9228 नों: दि: ...


मुंगीचिया घरा कोण जाय मूळ ? देखोनियां गूळ धांव घाली.

जगांतल्या चांगल्या गोष्टी आपल्याला आमंत्रण पाठवतील, अशी वाट पाहात बसूं नये. आपण त्यांच्याकडे धांवत जाण्यामध्येंच आपलें हित आहे. जीवनांत माती आणि साखर ह्यांची विलक्षण भेसळ झालेली आहे कबीरजी म्हणतात, "हत्ती होऊन ही साखर खातां येणार नाहीं. मुंगी होऊनच ती खाल्ली पाहिजे." चांगल्या गोष्टींना शरण गेलें तरच त्यांचे चारदोन कण पदरांत पडतात. सद्‌गुणाच्या दारांशीं मीं जी माधुकरी मागितली, त्याच शिदोरीवर मी आजपर्यंत गुजराण करतों आहें.

गुणांची पूजा करतांना एक काळजी घ्यावी. विभूतिपूजक होऊं नये माझ्यामध्यें तो दोष आहे. मी मूर्तिपूजक आहे. आणि मूर्तिभंजकही आहे. माझ्या 'देवा'नें सदैव माझ्या नवसाला पावावें असा माझा हट्ट असतो. लहानपणीं क्रिकेटचा सामना पाहतांना, आम्ही एक 'म्हसोबा' तयार करीत असू. विरुद्ध बाजूचा खेळाडू बाद झाला कीं आम्ही त्या म्हसोबाच्या डोक्यावर गवत वहायचे आणि आमच्या बाजूचा खेळाडू 'आऊट' झाला कीं आम्ही त्या म्हसोबाची खेटरांनी पूजा बांधायचे. जीवनांत असेंच माझ्या हातून पुष्कळदां घडलें आहे. सदैव ज्यांची पूजा करतां येईल असे 'देव' माणसांच्या जगांत नसतात असें नव्हे. पण थोडे आढळतात.

मी जीवनाशीं कृतज्ञ आहें. काय काय चमत्कार करून मला दाखविले आहेत ? कुठें कुठें मला त्यानें नेलें आहे ? कोणाकोणाच्या भेटी मला त्यानें घालून दिल्या ? बालकवि अन् राम गणेश गडकरी जर मला भेटले नसते तर जीवनांतला प्रकाश मला कसा दिसला असता ? अच्युतराव कोल्हटकरांच्या प्रेरणेनें आणि काकासाहेब लिमयांच्या कौतुकानें मी येथवर येऊन पोहोंचलों. साने गुरुजींसारख्या सत्पुरुषाचा सहवास लाभला, म्हणून जीवनांतले कांहीं क्षण उजळून गेले. महामहोपाध्याय पोतदार आणि प्रा. कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी ह्यांच्या स्नेहाचा केवढा आधार आहे मला ? मजवर प्रेम करणाऱ्या असंख्य मित्रांचा तर डोंगरच उभा आहे माझ्यामागें. आणि जगद्‌गुरु श्री शंकराचार्य (डॉ. कुर्तकोटी) ह्यांचा आशीर्वाद आहे माझ्या डोक्यावर. मला काय कमी आहे ?

समतेचा मार्ग ममतेमधून आहे, असेंच मला वाटतें.

• • •

90C49

REFBK-0010861